# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

मा. महासभा दि. १९/०५/२०२१

मंगळवार दि. २०/०४/२०२१ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबित विषय क्र. १ ते १५ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा बुधवार, दि. १९/०५/२०२१ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता Video Conferencing द्वारे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | महापौर |
| २) | गेहलोत हसमुख मोहनलाल | उपमहापौर |
| ३) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सभागृह नेता |
| ४) | जैन दिनेश तेजराज | सभापती, स्थायी समिती |
| ५) | पाटील प्रविण मोरेश्वर | विरोधी पक्षनेता |
| ६) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ७) | शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ८) | तिवारी अशोक सूर्यदेव | सदस्य |
| ९) | पांडेय पंकज सूर्यमणि | सदस्य |
| १०) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| ११) | गोहिल शानू जोरावर सिंह | सदस्या |
| १२) | कांगणे मीना यशवंत | सदस्या |
| १३) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १४) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १५) | ढवण निलम हरीश्चंद्र | सदस्या |
| १६) | कदम अर्चना अरुण | सदस्या |
| १७) | नलावडे दिनेश दगडु | सदस्य |
| १८) | भोईर गणेश गजानन | सदस्य |
| १९) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २०) | गुप्ता कुसुम संतोष | सदस्या |
| २१) | पाटील धनेश परशुराम | सदस्य |
| २२) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| २३) | रावल मेघना दिपक | सदस्या |
| २४) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| २५) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| २६) | धृवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| २७) | जैन गीता भरत | सदस्या |
| २८) | जैन सुनिता रमेश | सदस्या |
| २९) | जैन राजेंद्र भवरलाल | सदस्य |
| ३०) | रॉड्रीकस मोरस जोसेफ | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३१) | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | सदस्या |
| ३२) | मोकाशी दिपाली आनंदराव | सदस्या |
| ३३) | व्यास रवि वासुदेव | सदस्य |
| ३४) | परेरा कॅटलीन एन्थोनी | सदस्या |
| ३५) | रकवी वैशाली गजेंद्र | सदस्य |
| ३६) | अग्रवाल सुशील गोपीकिशन | सदस्य |
| ३७) | खंडेलवाल सुरेश जगदीश | सदस्य |
| ३८) | परदेशी गिता हरीश | सदस्या |
| ३९) | शेख अमजद गफार | सदस्य |
| ४०) | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | सदस्य |
| ४१) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ४२) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४३) | शिर्के अनंत गेणू | सदस्य |
| ४४) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ४५) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| ४६) | डिम्पल विनोद मेहता | सदस्या |
| ४७) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| ४८) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ४९) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ५०) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ५१) | चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ५२) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| ५३) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ५४) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ५५) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ५६) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ५७) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| ५८) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ५९) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६०) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ६१) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ६२) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ६३) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ६४) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ६५) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| ६६) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ६७) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ६८) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६९) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ७०) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ७१) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ७२) | भट दीप्ती शेखर | सदस्या |
| ७३) | कासोदारिया अश्विन शामजीभाई | सदस्य |
| ७४) | भावसार वंदना संजय | सदस्या |
| ७५) | शाह सीमाबेन कमलेश | सदस्या |
| ७६) | दुबे मनोज रामनारायण | सदस्य |
| ७७) | विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ७८) | अहमद साराह अकरम | सदस्या |
| ७९) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ८०) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| ८१) | भोईर जयेश भानुदास | सदस्य |
| ८२) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| ८३) | भानुशाली वर्षा गिरधर | सदस्या |
| ८४) | म्हात्रे विनोद काशिनाथ | सदस्य |
| ८५) | बगाजी शर्मिला विन्सन्ट | सदस्या |

गैरहजर सदस्य -

| | | |
|---|---|---|
| १) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| २) | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | सदस्या |
| ३) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ४) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ५) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ६) | भोईर कमलेश यशवंत | सदस्य |
| ७) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ८) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ९) | बांड्या एलायस दुमिंग | सदस्य |

रजेचा अर्ज - निरंक

मा. महापौर :-

सचिव साहेब सभेला सुरुवात करा.

नगरसचिव :-

सन्मा. सदस्यांचे आजच्या ऑनलाईन व्हिडीयो कॉन्फरन्सींग द्वारे आयोजित केलेल्या महासभेमध्ये स्वागत आहे. मा. पिठासीन अधिकारीचा परवानगीने मंगळवार दि. २०/०४/२०२१ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबित विषय क्र. १ ते १५ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा बुधवार, दि. १९/०५/२०२१ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता Video Conferencing द्वारे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे.

दिनेश जैन :-

महापौर मॅडम मला सभा अगोदर काही बोलायचे आहे.

गिता जैन :-

महापौर मॅडम, मलाही सभा चालु व्हायच्या अगोदर काही बोलायचे आहे.

मा. महापौर :-

दिनेश जैन आपण बोला.

दिनेश जैन :-

महापौर मॅडम, मी आपल्याला विचारु इच्छीतो की आपण महासभेचा कार्यकाळ सुरु करत आहात तेव्हा मला असे विचारायचे आहे की आता महासभेमध्ये प्रश्न तास किंवा लक्षवेधी घेणे हे महासभेचा भाग आहे की नाही?

मा. महापौर :-

सचिव साहेब उत्तर द्या.

नगरसचिव :-

प्रश्न उत्तर आणि लक्षवेधी घेणे हा महासभेचा सभा कामकाजाचा एक भाग आहे.

दिनेश जैन :-

हीच बाब विधी मंडळात असेल सगळे ठिकाणी असतात.

नगरसचिव :-

मी महसभेच्या बद्दलच तुम्हाला सांगु शकतो.

दिनेश जैन :-

आता महासभेमध्ये असे महापौर मॅडम, मी गेल्या वेळेला महासभेमध्ये लक्षवेधी आणलेली होती मिरा भाईंदरच्या होत चाललेले नुकसाणच्या टेंडराबाबत. तरी मी लक्षवेधी इथे मांडली होती हा माझा अधिकार होता म्हणून मी इथे तुम्हाला दिली होती आणि आपण ती लक्षवेधी स्विकारली होती म्हणून त्याच्या वरती मी १०-१५ मिनिटे त्याच्यावरती भाष्य केले होते. परंतु महापौर मॅडम काही लोकप्रतिनिधींनी बाहेर जावून असे वक्तव्य करणे महासभेच्या गोष्टीला की कोणाला सदस्याला लाज वाटत नाही म्हणजे कसे कास आम्ही इथे लाज वाटायला येतो काय महापौर मॅडम? मी चुकिचे काय केले मला सांगा तुम्ही? मी नियमा प्रमाणे लक्षवेधी दिली आपण ॲक्सेप्ट केली त्याच्या नंतर मी बोललो आणि बाहेर व्हिडियो बनवून बसवायचे काय एक सदस्याला लाज वाटत नाही लक्षवेधी घ्यायला. मी टेंडर देण्यासाठी लक्षवेधी नाही आणली होती मी याच्यामध्ये जी चुकी झालेली होती त्यासाठी लक्षवेधी आणली होती. आणि दुसरी गोष्ट मॅडम की आपण मिरा भाईंदरमध्ये कुठले पण काम करतो तेव्हा जे चांगले काम की खराब काम झाले असेल कुठलेही तर आपले म्हणणे असे आहे की महापौर मॅडमने बरोबर केलेले नाही. जर महापौर मॅडमने बरोबर केलेले नाही जर मिरा भाईंदरमध्ये चांगले काम होत असेल जर चांगली कोविडची कामे होत असतील तर ते श्रेय महापौर मॅडमला द्यायला पाहिजे की नाही ? आणि महापौर मॅडम मी ही लक्षवेधी मांडली होती ही कशासाठी मांडली होती ............

निलम ढवण :-

महापौर मॅडम, हा विषय मागच्या वेळी लक्षवेधी वर एवढा वेळ चर्चा झालेली आहे. आणि ह्या संदर्भात असेल तर त्यांनी महापौर मॅडमला वैयक्तिक भेटून आपली व्यथा मांडावी. सभागृहाचा वेळ डवळू नये.

दिनेश जैन :-

मॅडम हा विषय वैयक्तिक नाही.

निलम ढवण :-

महापौर मॅडम हा विषय आता इथे घेऊ नये. आणि सभागृहाचा वेळ घालवू नये अशी आपणास विनंती आहे.

दिनेश जैन :-

महापौर मॅडम हा विषय वैयक्तिगत नाही आहे. ही एखाद्या सन्मा. सदस्यांच्या भावनांचा विषय आहे. सन्मा. सदस्या तुमच्या बद्दल कोणी बोलले................

मा. महापौर :-

ढवणताई तुम्ही जरा थांबा त्यांना बोलू द्या.

निलम ढवण :-

महापौर मॅडम पण कुठच्या विषयावर बोलता त्या विषयावर चर्चा झालेली आहे.

दिनेश जैन :-

महापौर मॅडम, मला पहिला बोलू द्या. कोणी पण सन्मा. सदस्य असु द्या त्यांनी जर लक्षवेधी मांडली आपण स्विकार केली आणि कोणी व्हिजीओ पसरवत असेल त्यांना लज्जा येत नाही काय जर लज्जाच येत नाही म्हणजे काय आहे महापौर मॅडम. तुम्ही काय चुकीचे केले होते मी काय चुकीचे केले आहे काय लज्जा देत नाही म्हणजे काय. आपण काय ह्या नगरपालिकेचे सन्मा. नगरसेवक नाहीत काय आपण काय सामान्य पदावर नाही काय, काही पण तुम्ही बोलणार काय ?

निलम ढवण :-

कोणी बोलले आहे ते स्पष्ट करा.

दिनेश जैन :-

आपले सन्मा. एम.एल.ले. मॅडम ने बोलले आहे. आणि कोविडच्या प्रादुर्भाव पाहता आपण मार्केटमध्ये किती काम करतात.

निलम ढवण :-

कोण बोलले स्पष्ट करा.

दिनेश जैन :-

महापौर मॅडम मी तुम्हाला सांगतो मी आपल्या सभागृहाचा कामकाजाचा भाग आहे नाही तर तुम्ही आजच्या नंतर लक्षवेधी कोणाची पण घेऊ नका. मी नियमा प्रमाणे केलेले काम आहे याच्यामध्ये कुठली लज्जा मला वाटायला पाहिजे? आणि महापौर मॅडम मी तुम्हाला एक बोलतो याच्यामध्ये आपण लक्षवेधी स्विकारलेली होती आपण मला बोलायला दिले होते मी किती मिनिट बोललो? १० मिनिट पण बोललो नाही. बाकी लोक बोलले त्याच्यात माझी काय चुकी. आणि दोन अडीच आपण वेळ घालवतो का याच्यामध्ये. कोविडची आम्हाला नाही का पडलेली? आम्ही सकाळ ते संध्याकाळ पर्यंत इथे येत नाही का काम करायला? आम्हाला जर नियमात काम करु द्यायचे नसेलना तर आम्हाला सगळ्यांना घरी बसवून द्या.

मा. उपमहापौर :-

दिनेशजी आपको महापौर मॅडमने दो तीन बार निवेदन किया हूवा है पुरा नाम बोलीये ।

दिनेश जैन :-

महापौर मॅडम आपले एम.एले. गिता जैन मॅडम यांनी व्हिडियो मध्ये अशी क्लिप व्हायरल केलेली आहे माझ्याकडे ती क्लिप आहे त्याच्यामध्ये असे म्हटलेले आहे की दोन अडीच तास मी लक्षवेधीमध्ये घालले होते त्यांना लज्जा वाटत नाही काय, लज्जा म्हणजे काय मॅडम? आमच्या वॉर्डामध्ये आमची किती बदनामी करणार?

गिता जैन :-

महापौर मॅडम, पहिला तर तहकुब करते वेळी आपण जे स्टेटमेंट दिलेले की प्रशासन कामकाज जोपर्यंत बरोबर करत नाही तोपर्यंत मी महासभा लावणार नाही. मी हे गृहीत धरुन चालते की आता प्रशासन बरोबर कामकाज करते म्हणून त्यांचे अभिनंदनही करते आपलेही अभिनंदन करते की आपण महासभा लावली आणि हे सिध्द केले की कोविडचे कामकाज इथुन बरोबर चालत आहे. दुसरे मला

वैयक्तिक जे वाटले ते सांगायचा अधिकार मला आहे मी लोकशाहीत इथे बसली आहे. आणि मला कुठेतरी असे वाटले की कोविडचे जे प्रकरण आहे किंवा जे सबजेक्ट आहे ते तुम्ही आधी घ्यायला हवे होते. मला आताही वाटते वैयक्तिक कोणाचे काहीही वाटू शकते. आणि ते बोलायला त्यांना तेवढी स्वतंत्रता आहे स्वतंत्र भारत मध्ये. इथे लोकशाही आहे.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्या आपण सुध्दा महापौर होत्या. आपल्यालाही माहीत असेल आपण माजी महापौर होत्या. आपल्याला महित असेल लक्षवेधी हा सभागृहाचा कामकाजाचा भाग आहे. आणि सन्मा. सदस्य दिनेश जैन यांनी जेव्हा लक्षवेधी मांडली आणि त्यांना मी परवानगी दिली त्यांना परवानगी दिल्या नंतर त्यांनी त्या विषयावरती चर्चा केली. सभागृहामध्ये जे काय कामकाज चालते त्याला आपण सर्वजन बांधिल आहोत. मग त्यामध्ये दिनेश जैन एकटे नाहीत तर आपण् सभागृहातील सर्व सदस्य बांधिल आहोत. तर सभागृहाच्या कामकाजाच्या संदर्भामध्ये बाहेर असे वक्तव्य आपण देता की त्यांना लाज वाटत नाही. लाज वाटण्यासारखे त्यांनी असे काय केले आहे की त्यांना लाज वाटली पाहिजे आपण याच्या संदर्भात खुलासा द्याल का?

गिता जैन :-

कोविड काळात एखाद्या टेंडरसाठी आपण एवढा वेळ आपण सर्वांनी चर्चा केली. म्हणजे जे जे बोलले २०-२० मिनिटे मला असे वाटले की आपण कोविड बाबतीत पहिला चर्चा करायला पाहिजे होती कारण तेव्हा कोविडची परिस्थिती खुप गंभीर होती.

मा. महापौर :-

मान्य आहे कोविडच्या संदर्भामध्ये लक्षवेधी नव्हती. लक्षवेधी ही त्यांनी ज्या संदर्भामध्ये दिली होती त्याच विषयावरती ते बोलणार मॅडम.

गिता जैन :-

मॅडम, माझे वैयक्तिक मत मांडायला मी सभागृहात बोलली नाही. मी सभागृहाच्या बाहेर काय बोलते ते माझे वैयक्तिक मत आहे.

मा. महापौर :-

तुम्ही वैयक्तिक मत मांडू शकतात त्याबद्दल दुमत नाही परंतु सभागृहाच्या कामकाजा बद्दल आपण तिथे म्हटलेले आहे की लक्षवेधी त्यांनी मांडली ती त्यांना लाज वाटली नाही का तर ती लक्षवेधी कोणीही मांडू शकते. उद्या तुम्ही मांडू शकतात आपण असे म्हणायचे का त्यावेळेला हे शब्द वापरायचे का कोणीही मांडू शकते.

गिता जैन :-

मॅडम मी परत एकदा सांगते, सभागृहाच्या बाहेर माझे मत मांडायला मी स्वतंत्र आहे. आणि ते मत मला काय मांडायचे आहे ते मला कोणालाही विचाराची गरज नाही. मला जे वाटले ते मी बोलली. तूम्हाला जे वाटले तुम्हाला खुलासा करायचा असेल ते पत्रकारा समोर किंवा कुठेही करु शकता. त्यांचे परसनल प्रॉब्लेम मला असे वाटते यावेळी यावेळीही महासभेत हे वस्तु मांडायची काही गरज नाही. मी परसनल बाहेर बोलली आहे, सभेत नाही. मग महापौरांनी त्याबद्दल इथे महासभेत काम्हणून दखल घ्यावी.

मा. महापौर :-

मी दखल नाही घेतली, दखल ज्यांनी लक्षवेधी मांडलेली आहे त्यांनी घेतलेली आहे.

दिनेश जैन :-

महापौर मॅडम हे महापौरांच्या कामाजावर बोलले आहे.

मा. महापौर :-

असे वक्तव्य आपण केलेले असेल हे चुकीचे आहे असे मलाही वाटते.

गिता जैन :-

महापौर मॅडम, त्यांचा सब्जेक्ट घेण्याचा त्या विषयावर बोलली आहे. तुमच्या कामकाजावर मी प्रश्न टाकलेला नाही. मी सांगितले कोविड काळात त्यांनी तो कोविडचा विषय घ्यायला हवे होते ते घेतले नाही.

दिनेश जैन :-

महापौर मॅडम मला लक्षवेधी मांडण्यासाठी कोणी मंजुरी दिली? आपण मंजुरी दिली होती.

मा. महापौर :-

सभा कामकाजाचा विषय असल्यामुळे आपण ही लक्षवेधीवर प्रथम चर्चा करु असे म्हटले होते.

दिनेश जैन :-

आता मी एक बोलतो मॅडम, आता जो महासभेचा भाग आहे त्याच्यामध्ये आपण पहिला लक्षवेधी घेतो नंतर आपण चर्चा करतो दुसऱ्या कामाला.

मा. महापौर :-

याच्या पुढे लक्षवेधी घ्यायची नाही का? असे ठरवायचे आहे का सभागृहामध्ये?

दिनेश जैन :-

तसे ठरवा आम्हाला चालेल.

मा. महापौर :-

सचिव साहेब सभागृहाच्या कामकाजातुन लक्षवेधी काढता येते का? नाही ना लक्षवेधी घ्यावीच लागणार.

गिता जैन :-

महापौर मॅडम ते काढता येत नाही. आणि मंजुरी द्यायचे तुमचा अधिकार आहे. मी तुमच्या अधिकाराबद्दल काही बोललीच नाही. ज्यांनी विषय मांडला मला असे वाटले चुकीचा मांडला, कोविड काळात हे मांडू नये. मी बोलली आणि स्वतंत्र आहे ते बोलायला. आणि मला वाटते आताही आपण वेळ घालवतोय ह्या विषयावर.

मा. महापौर :-

दिनेशजी तुम्हाला ह्या विषयावर काही बोलायचे आहे का?

दिनेश जैन :-

महापौर मॅडम मी एक सांगु इच्छीतो की आपण जेव्हा महासभेचे कामकाज करतो सन्मा. सदस्यांना माहित पडले पाहिजे की पहिला लक्षवेधी मांडतात नंतर विषयाला सुरुवात होते. त्याच्यामध्ये कोविडचा विषय होता पुर्ण दिवस आपण चर्चा करु शकलो होतो. पण आपण किती तास चर्चा केली ६ वाजेपर्यंत आपण चर्चा केली काय आपण एवढे खंभीर होते काय, का नाही केली ६ वाजेपर्यंत चर्चा आपल्याकडे पुर्ण दिवस होता मॅडम. मी ह्या मिरा भाईंदरमध्ये मला वाटले की हा विषय खोटा झालेला आहे त्याला मी तुमच्या माध्यमातुन तुमच्या समोर मांडले मग एवढे दु:ख कशाला?

गिता जैन :-

मॅडम आम्हाला कुठेही दु:ख नाही आम्हाला जे वाटले ते आम्ही बोलायला स्वतंत्र आहोत. मी आताही परंत सांगते मी बाहेर जावून काय बोलते ते स्वतंत्रता माझी आहे आणि कोणीच ते घेऊ शकत नाही.

मा. महापौर :-

वैतीजी तुम्ही बोला.

चंद्रकांत वैती :-

महापौर मॅडम, असे आहे की आताच आपला एक ठराव पास झालेला आहे. मा. स्थायी समिती सभापती साहेब ह्या शहराचे प्रचंड कामकाज करत आहेत. आणि सत्ता पक्षाकडून शक्यतो आपल्याला

लक्षवेधी मांडण्याची आवश्यकता नाही त्यातल्या त्यात ही आपली तहकूब सभा आहे. आणि त्यावेळेला एवढे भांडायचे कारण नाही. आपण मागच्या वेळेला ३ वाजेपर्यंत भयंकर चर्चा केलेली आहे. त्यासभेत अनेक मुद्दयांवर चर्चा करता आली असती. आजच्या सभेमध्ये ह्या शहराशी निगळीत अत्यंत महत्वाचे प्रश्न आहेत. त्या तौक्ते वादळामध्ये किती मोठे शहराचे नुकसना झाले पण आज आपण सगळेजन कनेक्ट झालो आहोत. आणि कोविडच्या पँडामिक टाईममध्ये आयुक्तांनी आणि आपण ह्या शहरामध्ये प्रचंड कामगिरी बजावलेली आहे. त्याच्यामुळे अनेक सदस्यांना अनेक गोष्टींवरती बोलायचे आहे. अशा वेळेला फक्त गटनेत्यांनी सांगितले आणि त्यात आम्हाला ग्राहय धरु नका. आमची व्यक्तिगत त्या संदर्भातली मते वेगळी असतील. आता नक्कीच २० नगरसेवकांसोबत मी बसलेलो आहे. त्याचामुळे तुम्ही जो ठराव घ्याल ते सगळेच ठराव गटनेत्यांनी मांडलेत म्हणून आम्ही मान्य करणार नाहीत. तर आमचे मत त्यात विचारात घेतले जावे ही आपल्याला विनंती आहे. धंन्यवाद मॅडम.

आणि अजुन ह्या शहरामध्ये ह्या पँडामिक टाईममध्ये ज्या पध्दतीचे कामकाज ह्या दुसऱ्या लाटेत झाला आहे त्याबद्दल ह्या शहराच्या प्रथम नागरीक आदरणीय महापौर जोत्स्ना हसनाळे मॅडम आणि ह्या शहराचे आयुक्त मा. दिलीप ढोले साहेब यांनी जे प्रचंड कामकाज केले आहे म्हणजे ह्या महाराष्ट्रातल्या २७ महानगरपालिकांमध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका ही सर्वप्रथम आहे असे मी माणतो ते कशासाठी तर आपले स्व:ताचे दोन टँकर ऑक्सीजनचे भाड्याने घेतले आहेत कराराने ठेवले आहेत आणि दोन ऑक्सीजन प्लांट मिरा भाईंदर महानगरपालिकेने उभे केले. रोज ५००-५०० केस आपल्याला भेटत असताना ह्या शहरामध्ये अत्यंत शिस्तबंध असे कामकाज आयुक्तांनी, महापौरांनी, डॉक्टरांनी, नर्सने, आरोग्य कर्मचाऱ्यांनी आणि महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी केले. सोबत ह्या शहराच्या नागरीकांनी देखील अत्यंत जबाबदारीने आपली वागणूक ठेवलेली आहे. आणि एक सुंदर काम सुरु आहे म्हणून आयुक्त साहेबांचे आणि आदरणीय महापौर मॅडमचे आम्ही मनपुर्वक अभिनंदन करत आहोत कौतुक करत आहोत.

दिनेश जैन :-

महापौर मॅडम, आयुकत साहेब आणि आपण दोघांनी मिळून ह्या मिरा भाईंदर महानगरपालिकेला जे आपण कोविडवरती नियंत्रण आणले त्याबदल आम्ही तुमचे दोघांचे पण अभिनंदन करतो. आणि उद्या आयुक्त साहेबांचा वाढदिवस होता त्यांना पण आम्ही खुप खुप शुभेच्छा देतो.

चंद्रकांत वैती :-

महापौर मॅडम, एक खंडेलवाल साहेबांचा अभिनंदानाचा ठराव आहे.

सुरेश खंडेलवाल :-

महापौर मॅडम तुम्ही मला पहिला बोलायला संधी दिल्या बद्दल तुमचे धंन्यवाद. महापौर मॅडम जसे आता चंद्रकांत वैती साहेबांनी जो विषय आता तुमच्या समोर मांडला की ह्या कोरोना काळामध्ये विशेष: मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सर्व पदाधिकारी आयुक्त महोदय, महापौर मॅडम तुम्ही स्व:त यात जातीने लक्ष घालुन काम केले प्रशासनाने काम केले त्यांचा अभिनंदनाचा ठराव मी मांडू इच्छीतो तो मी अभिनंदनाचा ठराव मी वाचत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे विद्यमान आयुक्त मा. श्री. दिलीप ढोले यांनी व मा. महापौर श्रीमती ज्योत्स्ना हसनाळे यांनी कोविड-१९ च्या प्रार्दुभावाच्या दुसऱ्या लाटेत अत्यंत जबाबदारीने व कुशलतेने मिरा भाईंदर शहरातील कोविडच्या पॅन्डमिक वेळेत अत्यंत चांगली सेवा उपलब्ध केली. कोविड उपचार करणारे सर्व डॉक्टर, नर्सेस सेवाकर्मी व महापालिकेचे आरोग्य कर्मचारी तसेच सेवारत असलेले सर्व अधिकारी कर्मचारी या सर्वांच्या कामाला आम्ही सलाम करतो. महाराष्ट्राच्या २७ महानगरपालिकांमध्ये आम्हाला असे वाटते की, मिरा भाईंदर महानगरपालिका स्वत:चे दोन ऑक्सीजन प्लांट तयार करणारी व आणीबाणीच्या प्रसंगी भाडेतत्वावर कराराने दोन टँकर

ऑक्जीजनची सप्लाय चालू ठेवणारी पहिली महापालिका असेल. या महापालिकेचे आम्ही सदस्य आहोत याचा आम्हला गौरव आहे.

मा. महापौर, मा. आयुक्त व सर्व सेवाकर्मी यांचे आम्ही अभिनंदन करीत आहोत. विशेषत: दुसऱ्या लाटेत सरासरी ४००-५०० कोविडचे रुग्ण भेटत असताना त्यांना स्वसुलभ सेवा मिरा भाईंदर महानगरपालिकेने ८ कोविड सेंटरच्या माध्यमातून केली आहे. या सर्व सेवांबाबत कधी वाद निर्माण झाला नाही तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेचे अग्निशमन दल देखील आपल्या प्रत्येक कोविड सेंटर समोर दक्ष ठेवल्याबद्दल आपले मन:पुर्वक अभिनंदन.

आपल्याकडून आमच्या मिरा भाईंदर शहरास दर्जेदार सेवा दिलीत व ती अशीच आपण देत राहाल असा विश्वास आहे. पुनश्च: अभिनंदन! असा मी ठराव मांडत आहे.

दौलत गजरे :-

माझे अनुमोदन आहे.

अभिनंदन ठराव क्र. ०२ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे विद्यमान आयुक्त मा. श्री. दिलीप ढोले यांनी व मा. महापौर श्रीमती ज्योत्स्ना हसनाळे यांनी कोविड-१९ च्या प्रार्दुभावाच्या दुसऱ्या लाटेत अत्यंत जबाबदारीने व कुशलतेने मिरा भाईंदर शहरातील कोविडच्या पॅन्डमिक वेळेत अत्यंत चांगली सेवा उपलब्ध केली. कोविड उपचार करणारे सर्व डॉक्टर, नर्सेस सेवाकर्मी व महापालिकेचे आरोग्य कर्मचारी तसेच सेवारत असलेले सर्व अधिकारी कर्मचारी या सर्वांच्या कामाला आम्ही सलाम करतो. महाराष्ट्राच्या २७ महानगरपालिकांमध्ये आम्हाला असे वाटते की, मिरा भाईंदर महानगरपालिका स्वत:चे दोन ऑक्सीजन प्लांट तयार करणारी व आणीबाणीच्या प्रसंगी भाडेतत्वावर कराराने दोन टँकर ऑक्जीजनची सप्लाय चालू ठेवणारी पहिली महापालिका असेल. या महापालिकेचे आम्ही सदस्य आहोत याचा आम्हला गौरव आहे.

मा. महापौर, मा. आयुक्त व सर्व सेवाकर्मी यांचे आम्ही अभिनंदन करीत आहोत. विशेषत: दुसऱ्या लाटेत सरासरी ४००-५०० कोविडचे रुग्ण भेटत असताना त्यांना स्वसुलभ सेवा मिरा भाईंदर महानगरपालिकेने ८ कोविड सेंटरच्या माध्यमातून केली आहे. या सर्व सेवांबाबत कधी वाद निर्माण झाला नाही तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेचे अग्निशमन दल देखील आपल्या प्रत्येक कोविड सेंटर समोर दक्ष ठेवल्याबद्दल आपले मन:पुर्वक अभिनंदन.

आपल्याकडून आमच्या मिरा भाईंदर शहरास दर्जेदार सेवा दिलीत व ती अशीच आपण देत राहाल असा विश्वास आहे. पुनश्च: अभिनंदन! असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. सुरेश खंडेलवाल अनुमोदन :- श्री. दौलत गजरे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

निलम ढवण :-

माझाही अभिनंदनाचा ठराव आहे. मी मागच्या महासभेतच सांगितले होते.

मा. महापौर :-

ढवण ताई तुम्ही बोला.

निलम ढवण :-

सध्या आपल्या मिरा भाईंदर शहरात कोरोना महामारीचे प्रमाण फार मोठया प्रमाणात वाढलेले होते. अशा वेळी मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा. आयुक्त श्री. दिलीप ढोले, मा. उपायुक्त साहेब व

महानगरपालिकेची संपूर्ण वैदयकीय टीम आपल्या जीवाची पर्वा न करता महामारीत उदभवलेली भीषण परिस्थिती फार चांगल्या प्रकारे हाताळत आहेत. मा. आयुक्त साहेबांनी मिरा भाईंदर शहरात कोव्हीडवर नियंत्रण आणण्यासाठी ज्या ज्या उपाययोजना केल्या, त्या संपूर्ण महाराष्ट्राला आदर्शदायक ठरल्या. त्यामुळे आपल्या मिरा भाईंदर शहराचे नाव देखील उंचावले गेले. मा. आयुक्त श्री. दिलीप ढोले साहेब व त्यांची संपूर्ण टीम रुग्णांना व्यवस्थितरित्या सर्व आरोग्य् सेवा मिळण्याकरिता अत्यंत जबाबदारीने आपले काम पार पाडत आहेत. त्यासाठी मा. आयुक्त श्री. दिलीप ढोले, मा. महापौर मॅडम, मा. उपायुक्त साहेब व महानगरपालिकेची संपूर्ण वैदयकीय टीम हयांचे मनपूर्वक आभार व अभिनंदन.

शर्मिला बगाजी :-

माझे अनुमोदन आहे.

अभिनंदन ठराव क्र. ०३ :-

सध्या आपल्या मिरा भाईंदर शहरात कोरोना महामारीचे प्रमाण फार मोठया प्रमाणात वाढलेले होते. अशा वेळी मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा. आयुक्त श्री. दिलीप ढोले, मा. उपायुक्त साहेब व महानगरपालिकेची संपूर्ण वैदयकीय टीम आपल्या जीवाची पर्वा न करता महामारीत उदभवलेली भीषण परिस्थिती फार चांगल्या प्रकारे हाताळत आहेत. मा. आयुक्त साहेबांनी मिरा भाईंदर शहरात कोव्हीडवर नियंत्रण आणण्यासाठी ज्या ज्या उपाययोजना केल्या, त्या संपूर्ण महाराष्ट्राला आदर्शदायक ठरल्या. त्यामुळे आपल्या मिरा भाईंदर शहराचे नाव देखील उंचावले गेले. मा. आयुक्त श्री. दिलीप ढोले साहेब व त्यांची संपूर्ण टीम रुग्णांना व्यवस्थितरित्या सर्व आरोग्य् सेवा मिळण्याकरिता अत्यंत जबाबदारीने आपले काम पार पाडत आहेत. त्यासाठी मा. आयुक्त श्री. दिलीप ढोले, मा. महापौर मॅडम, मा. उपायुक्त साहेब व महानगरपालिकेची संपूर्ण वैदयकीय टीम हयांचे मनपूर्वक आभार व अभिनंदन.

सुचक :- श्रीम. निलम ढवण          अनुमोदन :- श्रीम. शर्मिला बगाजी

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

निलम ढवण :-

गेले कित्येक महिने मिरा-भाईंदर शहरात पाणी टंचाई मोठया प्रमाणावर होती. मिरा-भाईंदर शहराचा पाणी प्रश्न लवकरच सुटावा म्हणून व मिरा-भाईंदर शहराला अपेक्षित पाणी पुरवठयापेक्षा MIDC कडून कमी पाणीपुरवठा होत असल्याने मिरा-भाईंदर संपर्क प्रमुख व मा. आमदार श्री. प्रतापजी सरनाईक यांनी दि. 12.10.2020 रोजी मा. खासदार श्री. राजनजी विचारे, मा. महापौर ज्योत्स्ना हसनाळे, पालिकेतील महत्वाचे पदाधिकारी, विरोधी पक्षनेता, गटनेता, आयुक्त साहेब, MIDC चे अधिकारी, स्टेम अधिकारी यांची एकत्रित बैठक मा. उदयोगमंत्री श्री. सुभाषजी देसाई यांच्याकडे घेण्यात आली होती व त्यावेळी सदर बैठकीत 125 दशलक्ष लिटर पाणीपुरवठा MIDC कडून केला जाईल असे ठरले होते. परंतु मिरा-भाईंदर मधील नागरिकांना प्रत्यक्षात 93 MIDC पाणी मिळत होते. शहराच्या वाढत्या लोकसंख्येमुळे शहरात होणा-या कमी पाणी पुरवठयाला नागरिकांना सामोरे जावे लागत होते.

तदनंतर दि. ०७ एप्रिल रोजी आदरनीय खासदार श्री. राजनजी विचारे यांच्या मागणीनुसार आदरनीय उदयोगमंत्री श्री. सुभाषजी देसाई यांच्या दालनामध्ये पाणी प्रश्न मार्गी लावण्यासाठी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे बैठक झाली. त्यामध्ये या मिरा-भाईंदरच्या प्रश्नाबाबत तत्काळ बैठकीचे आयोजन करा अशा सुचना करण्यात आल्या. तेव्हा मा. खासदार राजनजी विचारे यांनी कोणताही विलंब न लावता तत्काळ औदयोगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पी. अनबलगन यांच्या

दालनात बैठकीचे आयोजन केले. सदर बैठकीला आमदार गीता जैन, मुख्य अभियंता श्री. सुधाकर वाघ, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त श्री. दिलीप ढोले, कार्यकारी अभियंता श्री. दिपक खांबित, श्री. सुरेश वाकोडे, जिल्हाप्रमुख प्रभाकर म्हात्रे, शिवसेना गटनेत्या निलम ढवण, माजी विरोधी पक्षनेता राजू भोईर व इतर अधिकारी उपस्थित होते. या बैठकीमध्ये मिरा भाईंदर शहराला कमी दाबाने होणाऱ्या पाणीपुरवठा संदर्भात महत्त्वाच्या मुदयांवर देखील चर्चा करण्यात आली. या चर्चेमध्ये मिरा भाईंदर शहरास अपुरा पाणीपुरवठा होत असल्याने तो तत्काळ वाढवून नियमित पाणीपुरवठा करणे, तसेच आय.आय.टी. यांच्या अहवालानुसार ठाणे साकेत येथे बुस्टींगची क्षमता वाढविण्यासाठी मिरा भाईंदर महापालिकेस परवानगी देणे, एम.आय.डी.सी. पंपिंगच्या ठिकाणी कचरा साठल्याने पंपिंग बंद होते त्यासाठी स्क्रीनिंगची यंत्रणा बसविणे अशा प्रकारच्या चर्चा करण्यात आल्या. येत्या दोन दिवसांमध्येच 125 दशलक्ष लिटर पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात येइल असे आश्वासन यावेळी चर्चेदरम्यान अधिकाऱ्यांनी मा. खासदार राजनजी विचारे यांना दिले. त्यानुसार आता सद्यस्थितीत मिरा भाईंदर शहरास स्टेम व एम.आय.डी.सी या दोन्ही यंत्रणेकडून मिळून 200 प्लस MLD इतका पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे पाण्यापासून नागरिकांना दिलासा मिळालेला आहे. महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पी. अनबलगन व मुख्य अभियंता श्री. सुधाकर वाघ यांनी देखील यापुढे मिरा भाईंदर मधील नागरिकांना पाणी समस्येला सामोरे जावे लागणार नाही असे या चर्चे दरम्यान आश्वासित केले. तातडीने बैठकीचे आयोजन केल्याबददल मा. उदयोगमंत्री श्री. सुभाष देसाई, मा. खासदर श्री. राजनजी विचारे, मा. आमदार श्री. प्रतापजी सरनाईक, मा. आमदार गीताताई जैन, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त श्री. दिलीप ढोले साहेब व एम.आय.डी.सी. चे सर्व अधिकरी यांचे अभिनंदन व आभार.

शर्मिला बगाजी :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

सभागृहनेते तुम्ही बोला.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, सचिव साहेबांना सांगायचे की ही जी तहकुब सभा आहे त्या तहकुब सभेतले विषय विषयपत्रिकेतले विषय नघेता आजची तहकुब सभा ही अभिनंदनाचे ठराव मांडण्यासाठी सभा करावी महापौर मॅडम.....................

(सभागृहात गोंधळ)

चंद्रकांत वैती :-

ती नैतीक जबादारी आहे शहरामध्ये.

निलम ढवण :-

जेव्हा कोविड असताना टेंडरची चर्चा होऊ शकते तर हे केलेल्या कामाचे अभिनंदन आम्ही नक्की करणार.

प्रशांत दळवी :-

तुम्ही काय आम्हाला शिकवत आहेत, कोणाचे टेंडर ते टेंडर कोणाचे आहे? तो विषय का काढत आहेत. मी त्या विषयावरती बोल आहे का?

निलम ढवण :-

ज्यांनी कामे केली त्यांचे अभिनंदन झाले पाहिजे. अभिनंदन आम्ही केल्यामुळे तुम्ही बोलत आहेत.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, मी बोलत असताना आत मधी हे का बोलत आहेत?

मा. महापौर :-

ढवण ताई तुम्हाला वेळ दिली होती. तुमचा अभिनंदनाचा ठराव मांडून झालेली आहे.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम एवढाच विषय आहे मी बोलत असताना कोणी कृपया मधी बोलू नका.

मा. महापौर :-

ठिक आहे एक सदस्य बोलत असताना मधी कोणी बोलू नये.

प्रशांत दळवी :-

मॅडम ह्या शहराच्या प्रथम आपण नागरीक आहात. ह्या महासभेचा कारभार ह्या मिरा भाईंदरचा कारभार आपण करत आहात. आणि असे असताना कोणी तरी काहीही खोट बोलायचे पण रेटून बोलायचे. आता म्हणतात पाणी आणले. पाणी आणले कोविड संपला आता तुम्ही मृत्यु रेट बघाल तर २.३ आहे. आणि कव्हरेज रेट बघाल तर ९७ आहे. मग महापौर मॅडम मला हे पण सांगा ना की एखाद्या लहानच्या पहिलितला मुलाला जरी विचारले तर ८७ आणि २, ८९ झाले मग ११ कुठे गेले? मग त्यांची काय मर्डर केली का की त्यांना किडनॅप करुन ठेवले. एवढे जर तुम्ही अभिनंदनाचा ठराव करताय तर मग कुठे गेले? आणि महापौर मॅडम, आपल्या काही बैठका झाल्याच नाहीत का? सन्मा. सदस्य, विरोधी पक्षनेते, आणि गटनेत्यांना घेऊन सुध्दा आपण बैठकी घेतल्या पाणी प्रश्ना वरती. आम्ही आयुक्तांचे अभिनंदन करतोचना. ते आल्यापासुन कुठेतरी हा मार्ग सुरळीत झाला आहे. आणि कालच आपली त्या बाबत बैठक झाली. आपल्या सर्वानुमते तिकडे अभिनंदनाचा ठराव पारीत झाला. म्हणून ही सभा सुरळीत निट चालावी जे आपले प्रश्न आहेत महासभेचे ते निकाली काढावे म्हणून ही आपण सभा लावली. आणि हे मागचे तहकुब सभेचे अभिनंदनाचे ठराव कुठून आणतात? जे लोकप्रतिनिधी इकडे शहरात कुठे दिसत नाही त्यांचेही नाव घेऊन सांगतात की हे पाणी त्यांनी आणले ह्यांनी आणले मग आम्ही काही केलेच नाही का? महापौरांनी काही केले नाही का? बॉडीने काहीच केले नाही का? बॉडीला काही चिंता आहे की नाही ह्या शहराची आहेना. बॉडीमध्ये सर्व सन्मा. नगरसेवक आहेत. कोणी एकाने त्याचे श्रेय घेऊ नये. मग तुमच्या काळात पण तुम्ही होतात मग पाणी कमी का आले? एवढे वर्ष का कमी येत होते दिढ दोन वर्ष? आम्ही तर म्हणतो त्या मा. आयुक्तांचा पायगुणच चांगला आहे. आता बोला काय बोलता त्यांचा पायगुण चांगला आहे. आला आता त्या रिकव्हरी रेट बघा आता किती झाला आहे ते. जिथे ५००-५५० रुग्न येत होते तिकडे आता शंभरी फक्त पार करत आहेत. मग हे कोणाचे आहे ह्याला आता तुम्ही कोणाला श्रेय देणार ? जे लोकप्रतिनिधी इथे नाहीत त्यांना हे देतात का श्रेय? मग ज्यांनी कामे केली आहेत कोविड काळामध्ये त्या सन्मा. सदस्यांना त्यांची पण नावे ग्याना त्यांनाही त्याचे श्रेय द्या. मग तुम्ही त्यामध्ये सगळेच आले. पण महापौरांचे कुठेही महासभेमध्ये तुम्ही बोलत असताना ठराव करत असताना महासभेपुढे महापौरांच्या परवानगीने बोलत असताना त्यामध्ये ह्या मिरा भाईंदरच्या प्रथम नागरीक महापौरांचे सुध्दा तुम्ही त्याच्यामध्ये नाव घेत नाही म्हणजे काय किती किती बोलायचे. खोट बोलायचे पण रेटून बोलायचे. एवढी काय दुधखेळी जनता आहे का ह्या मिरा भाईंदर मध्ये की तुम्ही सगळे कामे करत आहेत. मग दिड वर्ष कुठे झोपा काढत होतात? दिड वर्ष पाणी कुठे मुरत होते की इकडे पाणी कमी पडले? एवढे काय झाले की २०१८-१९ च्या आमदारकीच्या एम.एले. च्या निवडणूका पार पडल्या आणि मग पाणी गेले कुठे? मग आता का सुरळीत आले. महापौर मॅडम, हे सगळे नौटंकी आहे मी तर सांगतो तुम्हाला आयुक्त साहेबांनी हा प्रश्न गंभीर पणे घेतला त्यानुसार आपल्या बॉडीने आपणही निर्णय केला आपणही वेळोवेळी अंधेरी एम.आर.डी.सी. ला आपणही बारोबर होतात आपणही सगळे गटनेत्यांना एकत्रित करुन सर्व सन्मा. सदस्यांना एकत्रित केले. उपमहापौरांनी त्यावेळेला एम.आर.डी.सी. ला पत्र व्यवहार केला. मुख्यमंत्र्यांपर्यंत पत्रव्यवहार केला. मंत्रालयात आपण किती फेऱ्या मारल्या. हेही आपणास ठावूक आहे महापौर मॅडम. आणि हा सगळा पत्रव्यवहार सर्व सन्मा. सदस्यानी हा प्रश्न मार्गी लावलेला आहे.

त्यामुळे कोणाला एखाद्याला श्रेय घेऊ नका. जे लोकांना पाण्या पासुन वंचित ठेवायचे अगोदर आणि नंतर त्याचे श्रेय घ्यायला उड्या मारायच्या. महापौर मॅडम हे लार्जिवाने आहे. आणि म्हणून मी सांगतो की महापौर मॅडम, ही सभा तहकुब झाली होती ती आता पुढे रितसर चालवा. आपल्याकडे खुप काही ह्या शहराशी निगडीत प्रश्न आहेत त्या विषयावर सभा घ्यावी महापौर मॅडम. धंन्यवाद.

मा. महापौर :-

मा. महासभा दि. २०/०४/२०२१ ची सभा आपण तहकुब केली होती.................

गिता जैन :-

महापौर मॅडम, प्रशांत दळवी साहेबांनी जो शब्द वापरला नौटंकी मला वाटते हे शब्द योग्य नाहीत. महापौर मॅडम सगळ्यांना माहित आहे जेव्हा व्हि.सी. झाली तेव्हा आपणही हजर राहू शकले नव्हते त्यात काय चुकीचे झाले आमदारांनी काम केले त्यात चुकीचे काय ह्यांना काय एवढा प्रॉब्लेम झाला की हे एवढ्या जोराने बोलत आहेत. ह्यांना काय प्रॉब्लेम आहे. मिटींगमध्ये कोणीच हजर राहू शकले नाही. त्यांचा जो पण प्रॉब्लेम असेल मला माहित नाही पण त्या व्ही.सी. मध्ये फक्त मी होती. तेव्हा आयुक्त साहेबांना दुसरी व्हि.सी. होती ते नव्हते. विचारे साहेब पोहोचु शकले नव्हते म्हणुन त्यांनी रिक्वेस्ट करुन तिथे परत आम्ही स्वयंम गेलेलो.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्या आपणालाही सांगु इच्छीते की जेव्हा मी बोलत असेल तेव्हा कृपया आपण कोणीही बोलू नका....................

गिता जैन :-

महापौर मॅडम, तुम्ही बिझी होता आणि आम्ही शहराचे काम करत होतो. आम्ही श्रेय घ्यायला बघत नाही.

मा. महापौर :-

सगळेच शहराचे काम करतात. त्याच्यामध्ये कोणी किती काम केला काय केला ते मोजमाप ठेवायचे का आता सगळेच शहराचे काम करतात.

गिता जैन :-

म्हणून मी तुम्हाला सांगते एकून घ्याना. कोणासाठी..................

मा. महापौर :-

राहिला प्रश्न कुठल्या पक्षाने क्रेडीट घ्यायचे, नाही घ्यायचे. ज्याच्या त्याच्या आपला प्रश्न आहे.

गिता जैन :-

पण ऐकू तर शकतात ना. तुमच्या तोंडातुन कधीच कोणाचे चांगले निघू शकत नाही. पण ऐका तरी.

मा. महापौर :-

कोणाच्या तोंडून चांगले निघत नाही मॅडम?

गिता जैन :-

प्रशांत दळवी साहेब कोणाचे चांगले ऐकूही शकत नाही का बोलू शकत नाहीतर.

मा. महापौर :-

मी काय सांगते आज भांडणासाठी सभा ठेवायची का?

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, मी अजुन पर्यंत कोणाचे नाव न घेता बोलत आहे. माझा याच्यावरती आक्षेप आहे.

मा. महापौर :-

आजची सभा भांडण्यासाठी ठेवायची तर चला भांडूया. दुसरे बालुला राहूदेत. आजची सभा भांडण्याची आहे का?

गिता जैन :-

तुमचे अभिनंदन जेव्हा झाले आम्ही सहमत आहोत. आयुक्तांचे झाले आम्ही सहमत आहोत, आम्ही ऐकतोय ना. मग कोणी तरी आमचे केले तर का ऐकू नये तुम्ही?

प्रशांत दळवी :-

व्हि.सी. वरती कोण नव्हते उपमहापौर साहेब व्हि.सी. वरती होते. नव्हते हे कसे बोलता येईल. उपमहापौर साहेब तुम्ही खुलासा करा. तुम्ही होते की नाही व्हि.सी.वर.

मा. उपमहापौर :-

मी व्हि.सी. वर होतो.............

मा. महापौर :-

ती कॅन्सल झाली ना.

मा. उपमहापौर :-

मी आलो सगळ्यांना नमश्कार केला.

गिता जैन :-

उपमहापौर साहेब उशीरा आले. जैन मॅडम ह्यांनाही नमश्कार केला होता. चुकीची माहिती देऊ नका.

मा. महापौर :-

मला असे वाटते गेल्या वेळेला आपण सभा तहकूब केली होती. त्याला काही कारण होते. सर्व लोकप्रतिनिधींनी कोरोनाच्या संदर्भात आपआपल्या समस्या ह्या सभेमध्ये मांडल्या होत्या. आणि प्रशासनावरती रोश व्यक्त केला होता. कारण तशी परिस्थिती मिरा भाईंदर शहरामध्ये होती. आणि सर्व नागरीक नगरसेवकांकडून अपेक्षा करत होते आणि नगरसेवक प्रशासनाकडून अपेक्षा करत होते की कामकाज चांगल्या पध्दतीने झाले पाहिजे. कोरोनाग्रस्त रुग्नांना वेळीच मदत मिळाली पाहिजे. आणि त्यांना मदत मिळत नव्हती म्हणून जो लोकप्रतिनिधींनी रोश व्यक्त केला होता ह्या करीता मागची महासभा आपण तहकुब केली होती. आणि प्रशासनाला काम करण्या करीता संधी उपलब्ध करुन दिली होती की तुम्ही बाकिच्या विषयामध्ये लक्ष देताच आहात त्याच बरोबर कोरोनाची परिस्थिती जी शहरामध्ये आहे ह्याकडे तुम्ही गांभीर्याने लक्ष द्यावे. आणि तसा रिझल्ट आम्हाला द्या मगच आम्ही महासभा लावू असे मी त्या महासभेमध्ये म्हटले होते. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने आणि लोकप्रतिनिधींनी सर्वांनी अतिशय चांगल्या पध्दतीने कामकाज ह्या दुसऱ्या लाटेमध्ये केलेले आहे. म्हणून मी महापौर ह्या नात्याने तुम्हा सर्वांचे अभिनंदन ह्या ठिकाणी करत आहे. की जे लोकप्रतिनिधी आपआपल्या प्रभागामध्ये अतिशय सुंदर पध्दतीने कामकाज करत आहेत. आणि प्रशासनाचा सुधांग त्याच बरोबरीला सहकार्य लाभत आहे. ह्या कालावधीमध्ये प्रशासनाने अतिशय चांगल कामकाज केले. त्यामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी व्हॅक्सीनमध्ये अतिशय चांगल्या पध्दतीने काम केलेले आहे. तसेच ऑक्सीजन प्लॅनमध्ये सुध्दा राज्यात महापालिकेचा आपला दुसरा क्रमांक आलेला आहे. लॉकडाऊनची जी आपण पध्दती अवलंबली होती सकाळी ७ ते ११ हे पॅटर्न आता महाराष्ट्रात सर्व राज्यभर सुरु केलेले होते. म्हणजे आपल्या पालिकेने जेव्हा बैठक घेतली आणि जेव्हा ठरवले की ७ ते ११ वाजेपर्यंतची जी लॉकडाऊनची सिस्टीम आहे ती सुरु ठेवावी तेच पॅटर्न आपल्या संपुर्ण राज्यभर सुरु करण्यात आले. तसेच कोविड फॅसिलीटीचे जे जे सेंटर आहेत तिथे आपण फायरच्या गाड्या उभ्या केल्या होत्या. आपल्या महापालिकेच्या आदर्श बघुन बाकीच्या महापालिकेने सुध्दा त्या पध्दतीने सर्व फायच्या गाड्या कोविड सेंटरच्या इकडे उभ्या केल्या. तसेच आपण

कोविडमध्ये अतिशय चांगल्या पध्दतीने मिरा भाईंदर शहराने चांगले काम केले, प्रशासनाने चांगले काम केले लोकप्रतिनिधीने काम चांगले केले, परंतु ह्या कोरोनाच्या प्रादुर्भावामध्ये तिसरी लाट येण्याचा संभव असु शकतो तो नाकारता येणार नाही. त्यामुळे आपल्याला अशाच पध्दतीने पुढेही कामकाज चालु ठेवायचे आहे. लोकप्रतिनिधी आपआपल्या परीने चांगल्या पध्दतीने काम तर करताच आहेत परंतु प्रशासन सुध्दा अशाच पध्दतीने पुढे चांगल्या पध्दतीने पाऊल टाकून काम करेल अशी अपेक्षा सुध्दा आजच्यादिनी आपण करतोय. मला वाटते झाली तेवढी चर्चा पुरीच झालेली आहे. इतर विषयही फार महत्वाचे आहेत. आपण त्या विषयाकडे जावूया. मी सचिव साहेबांना सांगते की विषयाला सुरुवात करा.

अभिनंदन ठराव क्र. ०४ :-

गेले कित्येक महिने मिरा-भाईंदर शहरात पाणी टंचाई मोठया प्रमाणावर होती. मिरा-भाईंदर शहराचा पाणी प्रश्न लवकरच सुटावा म्हणून व मिरा-भाईंदर शहराला अपेक्षित पाणी पुरवठयापेक्षा MIDC कडून कमी पाणीपुरवठा होत असल्याने मिरा-भाईंदर संपर्क प्रमुख व मा. आमदार श्री. प्रतापजी सरनाईक यांनी दि. 12.10.2020 रोजी मा. खासदार श्री. राजनजी विचारे, मा. महापौर ज्योत्स्ना हसनाळे, पालिकेतील महत्वाचे पदाधिकारी, विरोधी पक्षनेता, गटनेता, आयुक्त साहेब, MIDC चे अधिकारी, स्टेम अधिकारी यांची एकत्रित बैठक मा. उदयोगमंत्री श्री. सुभाषजी देसाई यांच्याकडे घेण्यात आली होती व त्यावेळी सदर बैठकीत 125 दशलक्ष लिटर पाणीपुरवठा MIDC कडून केला जाईल असे ठरले होते. परंतु मिरा-भाईंदर मधील नागरिकांना प्रत्यक्षात 93 MIDC पाणी मिळत होते. शहराच्या वाढत्या लोकसंख्येमुळे शहरात होणा-या कमी पाणी पुरवठयाला नागरिकांना सामोरे जावे लागत होते.

तदनंतर दि. ०७ एप्रिल रोजी आदरनीय खासदार श्री. राजनजी विचारे यांच्या मागणीनुसार आदरनीय उदयोगमंत्री श्री. सुभाषजी देसाई यांच्या दालनामध्ये पाणी प्रश्न मार्गी लावण्यासाठी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे बैठक झाली. त्यामध्ये या मिरा-भाईंदरच्या प्रश्नाबाबत तत्काळ बैठकीचे आयोजन करा अशा सुचना करण्यात आल्या. तेव्हा मा. खासदार राजनजी विचारे यांनी कोणताही विलंब न लावता तत्काळ औदयोगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पी. अनबलगन यांच्या दालनात बैठकीचे आयोजन केले. सदर बैठकीला आमदार गीता जैन, मुख्य अभियंता श्री. सुधाकर वाघ, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त श्री. दिलीप ढोले, कार्यकारी अभियंता श्री. दिपक खांबित, श्री. सुरेश वाकोडे, जिल्हाप्रमुख प्रभाकर म्हात्रे, शिवसेना गटनेत्या निलम ढवण, माजी विरोधी पक्षनेता राजू भोईर व इतर अधिकारी उपस्थित होते. या बैठकीमध्ये मिरा भाईंदर शहराला कमी दाबाने होणा-या पाणीपुरवठा संदर्भात महत्त्वाच्या मुदयांवर देखील चर्चा करण्यात आली. या चर्चेमध्ये मिरा भाईंदर शहरास अपुरा पाणीपुरवठा होत असल्याने तो तत्काळ वाढवून नियमित पाणीपुरवठा करणे, तसेच आय.आय.टी. यांच्या अहवालानुसार ठाणे साकेत येथे बुस्टींगची क्षमता वाढविण्यासाठी मिरा भाईंदर महापालिकेस परवानगी देणे, एम.आय.डी.सी. पंपिंगच्या ठिकाणी कचरा साठल्याने पंपिंग बंद होते त्यासाठी स्क्रीनिंगची यंत्रणा बसविणे अशा प्रकारच्या चर्चा करण्यात आल्या. येत्या दोन दिवसांमध्येच 125 दशलक्ष लिटर पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात येइल असे आश्वासन यावेळी चर्चेदरम्यान अधिकाऱ्यांनी मा. खासदार राजनजी विचारे यांना दिले. त्यानुसार आता सद्यस्थितीत मिरा भाईंदर शहरास स्टेम व एम.आय.डी.सी या दोन्ही यंत्रणेकडून मिळून 200 प्लस MLD इतका पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे पाण्यापासून नागरिकांना दिलासा मिळालेला आहे. महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पी. अनबलगन व मुख्य अभियंता श्री. सुधाकर वाघ यांनी देखील यापुढे मिरा भाईंदर मधील नागरिकांना पाणी समस्येला सामोरे जावे लागणार नाही असे या चर्चे दरम्यान आश्वासित केले. तातडीने बैठकीचे आयोजन केल्याबददल मा. उदयोगमंत्री श्री. सुभाष देसाई, मा. खासदर श्री. राजनजी विचारे, मा. आमदार श्री. प्रतापजी सरनाईक, मा. आमदार गीताताई

जैन, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त श्री. दिलीप ढोले साहेब व एम.आय.डी.सी. चे सर्व अधिकरी यांचे अभिनंदन व आभार.

सुचक :- श्रीम. निलम ढवण अनुमोदन :- श्रीम. शर्मिला बगाजी

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र.१, दि. १५/०९/२०२०, दि. ११/११/२०२०, दि. ०४/१२/२०२० व दि. ०७/१२/२०२० (दि. ०४/१२/२०२० रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

जुबेर इनामदार :-

सचिव महोदय, ११/११/२०२० च्या इतिवृत्तांतमध्ये माझी दुरुस्ती आहे. प्रकरण क्र.२९ ठराव १७ मध्ये मी काही सुचना केली होती. त्याच्या समावेश करण्यात यावा.

नगरसचिव :-

ठिक आहे.

निलम ढवण :-

जुबेरजीने सांगितलेली सुचना त्याच्यात आली नाही.

नगरसचिव :-

ठिक आहे.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य जुबेर इनामदार साहेब यांनी सुचविलेली दुरुस्ती करावी.

नगरसचिव :-

ठिक आहे.

प्रशांत दळवी :-

दि. १५/०९/२०२०, दि. ११/११/२०२०, दि. ०४/१२/२०२० व दि. ०७/१२/२०२० (दि. ०४/१२/२०२० रोजीची तहकुब सभा) रोजींच्या मा. महासभेचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

दिनेश जैन :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महपौर :-

ठराव मंजुर.

प्रकरण क्र. ०१ :-

दि. १५/०९/२०२०, दि. ११/११/२०२०, दि. ०४/१२/२०२० व दि. ०७/१२/२०२० (दि. ०४/१२/२०२० रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ०५ :-

दि. १५/०९/२०२०, दि. ११/११/२०२०, दि. ०४/१२/२०२० व दि. ०७/१२/२०२० (दि. ०४/१२/२०२० रोजीची तहकुब सभा) रोजींच्या मा. महासभेचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. दिनेश जैन

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. २, नागरी वाहतुक सेवेचा (मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसचा) वापर करणाऱ्या दिव्यांगा करीता प्रवासात सवलत देणेस मंजूरी मिळणेबाबत. (मा. परिवहन समिती सभा दि. २६/०२/२०२१ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. २१, ठराव क्र. २०)

प्रशांत दळवी :-

मा. परिवहन समिती सभा दि.26/02/2021 रोजीचे शिफारस केलेले प्रकरण क्र.21, ठराव क्र.20 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसेसचा नागरी वाहतुक सेवेचा वापर करणाऱ्या दिव्यांगाकरीता प्रवासात सवलत देणेकामी ठराव पारित करण्यात आला होता.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम 2016 मधील कलम 37 नुसार व दि.28/10/2015 रोजीच्या शासन निर्णयानूसार नागरीक वाहतुक व्यवस्थेचा वापर करणाऱ्या 40% व त्यावरील दिव्यांगांना प्रवासामध्ये 100% सवलत देवून व सवलतीमुळे होणारा खर्च अपंग कल्याण योजने अंतर्गत करण्यात येणाऱ्या तरतुदीमधुन सवलतीच्या रक्कमेची भरपाई बस ऑपरेटर यांना अदा करणेस, सदर कामी येणाऱ्या खर्चाची प्रतिपूर्ती अपंग कल्याण योजनेमधुन करणेस तसेच सदर प्रतिपूर्तीची रक्कम परिवहन उपक्रमाकडे हस्तांतरण करणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

दिनेश जैन :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव मंजुर.

प्रकरण क्र. ०२ :-

नागरी वाहतुक सेवेचा (मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसचा) वापर करणाऱ्या दिव्यांगा करीता प्रवासात सवलत देणेस मंजूरी मिळणेबाबत. (मा. परिवहन समिती सभा दि. २६/०२/२०२१ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. २१, ठराव क्र. २०)

ठराव क्र. ०६ :-

मा. परिवहन समिती सभा दि.26/02/2021 रोजीचे शिफारस केलेले प्रकरण क्र.21, ठराव क्र.20 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसेसचा नागरी वाहतुक सेवेचा वापर करणाऱ्या दिव्यांगाकरीता प्रवासात सवलत देणेकामी ठराव पारित करण्यात आला होता.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम 2016 मधील कलम 37 नुसार व दि.28/10/2015 रोजीच्या शासन निर्णयानूसार नागरीक वाहतुक व्यवस्थेचा वापर करणाऱ्या 40% व त्यावरील दिव्यांगांना प्रवासामध्ये 100% सवलत देवून व सवलतीमुळे होणारा खर्च अपंग कल्याण योजने अंतर्गत करण्यात येणाऱ्या तरतुदीमधुन सवलतीच्या रक्कमेची भरपाई बस ऑपरेटर यांना अदा करणेस, सदर कामी येणाऱ्या खर्चाची प्रतिपूर्ती अपंग कल्याण योजनेमधुन करणेस तसेच सदर प्रतिपूर्तीची रक्कम परिवहन उपक्रमाकडे हस्तांतरण करणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. दिनेश जैन

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र.३, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुख्य रस्त्यांवर पीपीपी (Public Private Partnership) तत्वावर दिशादर्शक फलक उभारणे कामाबाबत.

मनोज दुबे :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रमुख रस्त्यांवर MMRDA तर्फे मेट्रोचे काम सुरु आहे तसेच मेट्रो बरोबर काही ठिकाणी उड्डाणपुलही बांधण्यात येणार आहे. त्यामुळे कमानी उभारणे व फलक लावणे सद्यस्थितीत सोयीस्कर होणार नाही. त्यामुळे मेट्रो व उडडाणपुलाचे काम पूर्ण झाल्यानंतर महापालिकेतर्फे दिशादर्शक फलक उभारण्यात यावेत.

महापालिकेच्या इतर रस्त्यांवर कमानी व फलक उभारण्याची डिझाईन तयार करुन व पालिकेतर्फे या कमानी व फलक उभारल्यास किती खर्च येईल व त्यावर जाहिरात केल्यास त्यापासुन किती उत्पन्न महापालिकेस मिळू शकेल? या सविस्तर माहितीसह प्रस्ताव फेरसादर करण्यास ही मा. महासभा मान्यता देत आहे.

अनिल विराणी :-

माझे अनुमोदन आहे.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, थोडी प्रशासनाने आपली बाजु मांडावी.

मा. महापौर :-

ह्या विषयावरती?

जुबेर इनामदार :-

हो. प्रशासनाचा हा रेव्हेन्युचा विषय आहे. आणि रेव्हेन्यु हा प्रशासनाचा अधिकार आहे.

मा. महापौर :-

संबंधित अधिकारी यांनी उत्तर द्यावे.

सुरेश वाकोडे :-

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये काही पब्लिक प्राईव्हेट पार्टनरशिपच्या तत्वावर. म्हणजे मिरा भाईंदर महापालिकेच्या कुठलाही पैसा खर्च नकरता दिशादर्शक फलक लावण्याचा प्रस्ताव केलेला आहे. ह्यामध्ये विविध ठिकाणी आपला काही असे फलक लावायचे आहेत. आणि फलक लावून त्याला लागणारा खर्च आपण सव्:त कुठल्याही खर्चात करायचा नाही. बी.ओ.टी. तत्वावर करायचा असा आपण प्रस्ताव दिलेला आहे. पालिकेचा कुठलाही खर्च नाही.

जुबेर इनामदार :-

वाकोडे साहेब, आता हे तुम्ही जे स्थळ आहेत, जिथे आपल्याला दिशादर्शक फलक उभारायचे आहेत त्याची पाहणी केली असेलच. प्रशासकीय याची तांत्रिक बाबी त्याची चाचपणी केली होतीना?

सुरेश वाकोडे :-

साहेब, हे कसे आहे प्रायमरी मंजुरी आहे. कुठलाही प्रस्ताव आपण कुठल्या पध्दतीने घेतो हे प्रायव्हेट पार्टनरशिपमध्ये आपल्याला पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपमध्ये करायचे आहे. त्याची ही पहिली मंजुरी आहे. ही मंजुरी झाल्यावर ह्याची सविस्तर डिटेल्स ह्या गोष्टी आपण कशा करायच्या काय त्याचे प्रत्येक ठिकाणचे इस्टीमेट, कुठल्या ठिकाणी ह्या सगळ्या गोष्टी पुढे याच्यामध्ये येतील. एक प्रायमरी स्वरुपाची मान्यता आपण महासभेतुन आपल्याला मिळाली ह्या तत्वावर तुम्ही पुढे जा तर त्याप्रमाणे आपण पुढे जावून सगळे डिटेल्स सविस्तर आपल्याला करता येते.

जुबेर इनामदार :-

आता जो ठराव झाला त्याच्यामध्ये मेट्रोचा उल्लेख करण्यात आला. त्या दिशेने मेट्रो जात असताना किंवा त्याची अडचण आपल्याला होईल त्या कारनास्तव आपल्याला सध्या तिथे ते उभारले

नाही पाहिजे ते नंतर उभारावेत. मी प्रशासनाच्या बाजुने बोलत आहे ऐकून घ्या. हा तुमचा प्रमुख उत्पन्नाचा स्त्रोत आहे. उत्पन्न पालिकेचे वाढविण्याचा अधिकार किंवा ते विचार त्यापध्दतीने करणेचा अधिकार आयुक्तांचा म्हणजे प्रशासनाचा प्रमुखांचा. आता तुम्ही ह्याच्यामध्ये दाखविलेली जी जागा आहे त्याच्यात बरीच जागा अशी आहे त्या अंतर्गत शहरामध्ये जिथुन मेट्रो जाणार नाही मग त्या जागेवरती तुम्ही त्याची मंजुरी आज घेणार का किंवा तुम्हाला तसे काही त्याच्यामध्ये तुम्हाला तो काम करता येईल का तिथे? कारण ठराव जो आता सत्ताधाऱ्यांनी मांडला तो बहूमतांनी होईल मग त्याच्या मागचा उद्देश काय? फक्त मेट्रोचेच काम थांबवाचे मेट्रो जिथे जात आहे त्याच्यावरचे फक्त फलक थांबवायचे आहेत किंवा कसे.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर साहेब बोला.

जुबेर इनामदार :-

कोणाचेही संभाषन सुरु होण्याच्या अगोदर माझी त्यांना विनंती आहे विषय समजुन घ्या. मेट्रो सहीत बाकीचे बरेचशे अजुन ठिकाण ज्याच्या वरती कमाणी उभारता येईल जेणेकरुन महापालिकेच्या उत्पन्नामध्ये भर पडेल अशी वस्तु डोळ्याच्या समोर असताना आपल्याला त्याचा ठराव करताना कुठल्या विषयावर किती विरोध केला पाहिजे हे ठरवून घेतले पाहिजे. आणि आयुक्त महोदय आपल्याला महानगरपालिका अधिनियमाने अधिकार दिलेले आहेत तुम्हाला उत्पन्नाची बाजु महापालिकेच्या हितासाठी उत्पन्नाची बाजु दिसुन येत असेल असे विषय तुम्ही स्वतंत्रपणे हाताळू शकता. म्हणून अशा विषयाला साहेब मला तरी वाटत नाही हा सुचना घेणे अतिशय गरजेचे होते किंवा मेट्रो जिथुन आता सध्या जिथुन चाललेली आहे त्या क्षेत्रामधुन त्या क्षेत्रावर आता सध्या कमानी उभारणे हा विषय बाजुला ठेवून जे क्षेत्र जिथे कमानी उभारता येईल ते करुन घेतले पाहिजे. महापौर मॅडम हा एक आपल्या शहराचा उत्पन्नाचा भाग आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम, पहिली गोष्ट म्हणजे हा जो विषय आलेला आहे हा एक धोरनात्मक विषय आहे. आणि त्याच्यामुळे प्रशासनाला महापालिकेची मंजुरी घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे महापालिका प्रशासनाने आपल्या मंजुरी करीता हा विषय दिलेला आहे. एका बाजुने वाकोडे साहेब बोलतात की आपण बी.ओ.टी. वरती करुया. हे बी.ओ.टी. नाही हे पब्लिक प्राईव्हेट पार्टनरशिप वरती त्यांनी प्रस्ताव दिलेला आहे. आणि बी.ओ.टी. चा प्रस्ताव वेगळा असतो पी.पी.पी. चा प्रस्ताव वेगळा असतो. आणि याच बरोबर महापालिकेने जो प्रस्ताव दिलेला आहे २१ ठिकाण दिलेले आहेत. आणि ह्या २१ ठिकाणांमध्ये निम्म्या पेक्षा जास्त ठिकाणा वरती आपल्या मेट्रोचे काम चालु आहे. आणि हे मेट्रोचे काम एका वर्षात पुर्ण होईल का दोन वर्षात पुर्ण होईल का तीन वर्षात पुर्ण होईल हे अजिबात सांगता येणार नाही. आज आपण त्याची भुमिका डिसाईड करतोय. आणि पुन्हा ३० वर्षांनी त्याचे जर समजा कॉस्ट वाढले तर पुन्हा ठेकेदाराचा आणि प्रशासनाचा वाद निर्माण होईल. आणि आम्ही ठरावामध्ये क्लियरकट म्हटले आहे की महापालिकेने जर समजा महापालिकेतर्फे रस्त्यावरती कमानी उभारल्या आणि ॲरेंजमेंट केली तर आपला खर्च किती आणि रेव्हेन्यु किती लागतो. ह्या प्रस्तावाला मी विरोध केलेला नाही आम्ही फक्त प्रशासनाला सांगितले की तुम्ही ह्याच्यामध्ये आणखीन डिटेल्स अभ्यास करा की पी.पी.पी. बेसिसवरती तुम्ही जो प्रपोझल दिलेले आहे याच्याने महापालिकेचा फायदा किती होईल त्याच्या नंतर जर महापालिकेने स्व:तहून होर्डिंग उभारले त्याची कॉस्ट काय होईल ॲड दिली त्याच्या पासुन आपल्याला रेव्हेन्यु किती होईल त्याचा अभ्यास करा. दुसरी गोष्ट महापौर मॅडम, नुकतच प्रशासनातर्फे गेल्या ६ महिन्या पुर्वी मिरा भाईंदर परिसरामध्ये होर्डिंग उभारण्याचे टेंडर काढले होते. ॲप्रॉक्सीमेंटली कमित कमी ३ करोडची निविदा ती आली होती. मग ज्याला जी निविदा दिली मग त्याचे काम काय महापालिका बंद करणार आहे का? महापालिका प्रशासनाने याचा अभ्यास केला

आहे का? ह्या गोष्टी कुठल्या प्रकरणामध्ये दिल्या आहेत का? नाही. उद्या त्या माणसाने ३ करोडचे टेंडर घेतले आहे तो काम करणार की त्या कामाला थांबविणार प्रशासन याचा पण उहापोह महापालिकेच्या प्रशासनाने गोषवाऱ्यामध्ये केलेला नाही. आणि आपण त्याच्यामध्ये असे म्हटले आहे की महापालिकेने सदर कमानी उभारल्यास महापालिकेचे उत्पन्न काय होईल याचा सखोल अभ्यास करुन आपण प्रस्ताव फेर सादर करावा असा ठराव मी मांडलेला आहे मॅडम.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, माझे सन्मा. सुशिक्षीत मित्र ध्रुवकिशोरजी पी.पी.पी. तत्वावर ह्या कारणास्तव प्रशासनाने दिलेले आहे. प्रायव्हेट पब्लिक पार्टनरशिप बरोबर आहे, बी.ओ.टी. तत्वावर हा नाही कारण पालिका बांधणार नाही. दुसरं असा कुठेही याच्या आधी दिलेल्या निविदा म्हणजे ज्या ॲडव्हटाईजमेंटच्या निविदाकारक म्हणजे होर्डिंग उभारणारे जे आहेत त्यांना त्यांच्या ॲग्रीमेंटमध्ये पालिकेने असे कुठेही शास्वती दिलेली नसते. की मी ह्यांच्या पलिकडे जावून दुसरे होर्डिंग उभारणार नाही. शहरामध्ये जिथे तिथे जशी जशी जागा उपलब्ध होईल आणि ज्या जागेमधुन किंवा अशा कुठल्या प्रकल्पामधुन या अशा कुठलया प्रोव्हिजनमधुन आपल्याला पालिकेच्या आर्थिक बाबीला फायदा पोहचत असेल रेव्हेन्यु जनरेट होत असेल महसूल उत्पन्न होत असेल तर त्याला आपल्याला कुठल्याही प्रकारचा मला वाटते विरोध किंवा त्याच्यातुन उहापोह करायची गरज नाही.

(सभागृहात गोंधळ)

चंद्रकांत वैती :-

आदणीय महापौर मॅडम, ह्या शहरामध्ये जेव्हा जेव्हा आता अशा ह्या मिटींग होतील तेव्हा तेव्हा हा प्रॉब्लेम राहील. बघा तुम्ही आम्ही सर्व ह्या शहराचे विस्वस्त म्हणून निवडूण आलेलो आहोत. ह्या शहरामध्ये अनेक समस्सांवरती प्रत्येक नगरसेवकाला प्रत्येक नगरसेवकाला तिथला स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून तिथला जवाबदार नगरसेवक म्हूणन आपल्या भुमिका मांडायच्या असतात. ह्या अशा पध्दतीने जर काम होत असेल आणि एकच सदस्य दोनच सदस्य सारखे बोलतील किंवा खुप वेळ बोलतील तसे करु नका. जर प्रसंग पडला तर मा. आयुकतांनाही विनंती आहे सर्व नगरसेवकांना एका मोठ्या हॉलमध्ये पी.पी.ई. किट घालुन बसवा आणि समोर समोर चर्चा होऊ द्या. प्रत्येकाला आपले मत ठेवण्याचा अधिकार आहे. चार लोकांनी उठायचे आणि सारखे मी मी म्हणून बोलायचे ह्याला काही अर्थ नाही. मिरा भाईंदर महपालिकेचा आजचा विषय आहे की महापालिका क्षेत्रातील मुख्य रस्त्यावरती पी.पी.पी. तत्वावरती आपल्याला फलक जाहिरात फलक उभे करायचे आहेत. दिशादर्शक फलक उभे करायचे आहेत. त्याच्या वरती शहरातल्या विविध दिशा देखील दाखविल्या जातील. ह्या मिरा भाईंदर महापालिकेला उत्पनाचे स्त्रोत अत्यंत मर्यादेत राहील. आणि अशा वेळेला असा विषय आणलेला आहे तर ह्या विषयाच्या माध्यमातुन माझे असे मत आहे प्रशासनाला की आपल्याकडून एक असे व्यवस्थित नियोजनबध्य असे एक टीप पण यायला पाहिजे ज्याच्यामध्ये शहरात आता अस्तीत्वात असलेले जेवढे जाहिरात फलक आहेत त्याच्या मधले थकबाकीदार किती माझ्या माहिती प्रमाणे ४० करोड रुपयाची थकबाकी आजही आहे. मग अशा थकबाकीदारांना पुढच्या कुठच्याही टेंडरमध्ये तुम्ही सहभागी होऊन द्यायचे नाही. त्यांना कुठचाही बोली बोलून द्यायची नाही. त्यांना कुठचेही टेंडर भरुन दिले जायचे नाही. आजच्या सभेत आजच आयुक्तांना विनंती आहे की जे थकबाकीदार आहेत त्यांना आजच नोंटीसा द्या. नाही तर मग त्यांच्या इतर मालमत्तावरती तो बोझा लादा. आणि शहरामध्ये एकाच स्पॉट वरती १०-१०, १५-१५ होर्डिंग आहेत. त्यांची संख्या निश्चित करायची. एका स्पॉट वरती किती जाहिरात फलक पाहिजेत. जाहिरात फलकाची साईज नक्की करा. त्या तौक्ते वादळामध्ये संपुर्ण महाराष्ट्रामध्ये कुठे कुठे बोर्ड पडल्याच्या बातम्या आपण ऐकल्या. होर्डिंग पडल्याच्या बातम्या आपण ऐकल्या. आपल्या शहरात देखील होर्डिंग पडल्या. मग त्याचा त्याच्यामुळे झालेल्या मालमत्तेची आणि जीविताची जी हाणी होईल त्याला जबाबदार कोण राहील हे

देखील आपण ह्याच्यामध्ये आणले पाहिजे. हा विषय चालढकल करुन चालणार नाही. पुढच्याच सभेत आणा. पण त्यावेळेला तो आणताना हायवे वरती आपल्याला जर करायचे असेल तर हायवे ऑथॅरिटीची आपल्याला परवानगी लागेल. वाहतुक शाकेच्या बरोबर चर्चा करा. स्थानिक पोलीस आयुक्तालयातील चर्चा घ्या. आणि हा विषय आणा. हा विषय टाळू नका हा विषय पुढे नेवू नका. हे शहराचे उत्पन्नाचे स्त्रोत आहे. आणि बेकायदेशिर ज्यांचे ज्यांचे होर्डिंग आहेत त्यांच्यावरती दहा पटीने दंडात्मक कारवाई करावी आणि हा व्यवस्थित करुन जरा ठराव आजच केला असता तरी काही हरकत नाही आम्ही सुचनाच करणार आहोत त्याच्यामध्ये सुधारण्याचा. परंतु तसा ठराव मनोज दुबे साहेबांनी मांडला की तो पुढील सभेत आणण्यात यावा. तर प्रशासनाला आणि महापौरांना विनंती आहे की व्यवस्थित याचे नियोजन करावे आणि आज सर्व सदस्य सभा ऐकत आहेत त्यांना विनंती आहे की पुढची महासभा लागायच्या आत आपल्या सगळ्यांचा सुचना ह्या विषयात इथे सादर करा आणि नक्की हा विषय पुढच्या सभेत आणा. राहीली गोष्ट दुसरी पी.पी.ई. किट घालुन सभा करायची असेल तर सर्व नगरसेवकांनी मान्यता द्यावी सर्वांनी हाथ उंच करुन ह्या विषयाची मागणी करा. नाही तर चारच लोक बोलतील आणि चारजन सभा चालवतील अहो ह्या सभागृहावरती सर्व सदस्यांचा हक्क आहे. नाही तर मग पुढच्या सभेत आम्ही सर्व सदस्य येऊन महापालिकेच्या दालनात बसु. महापौरांच्या दालनात बसु, आयुक्तांच्या दालनात बसु, किंवा सचिवांच्या दालनात बसु, उपमहापौरांच्या दालनात बसु नाही बसायला कुठे दिले तर महापौर आणि आयुक्त साहेबांच्या समोरच्या लॉबीमध्ये बसुन आम्ही सभा अटेंड करणार. धंन्यवाद.

मा. महापौर :-

सचिव साहेब अशी शासनाकडून आपल्याला परवानगी आहे का? सभागृहात घेता येईल का याचा आपण खुलासा द्या. कारण मला सुध्दा अशी सभा घ्यायला भारी पडते.

नगरसचिव :-

मा. महासभेचे आयोजन सभागृहात करण्याकरीता सध्यातरी आपल्याला राज्य शासनाकडून निर्देश प्राप्त झालेले नाहीत. सध्या राज्य शासनाचे जे निर्देश आहेत त्यानुसार ऑनलाईनच महासभेचे आयोजन करावे असे निर्देश असल्यामुळे सध्यास्थितीत आपल्याला सभागृहात महासभा घेता येणार नाही. याकरीता आपण शासनाकडे निवेदन पण केलेले आहे की आम्हाला सभागृहात सभा घेण्यासाठी मान्यता मिळावी परंतु अद्याप आपल्याला त्या निवेदनावर देखील काही प्रतिसाद मिळालेला नाही.

मा. महापौर :-

ठिक आहे. विषय क्र.३ हा पुढच्या महासभेत घेण्यात येईल. पुढचा विषय घ्या.

गिता जैन :-

महापौर मॅडम, मला ह्या विषयी बोलायचे आहे. मला फक्त प्रशासनाकडून ही माहिती पाहिजे की अजुन पर्यंत होर्डिंगचे जी थकबाकी आहे ती किती आहे? कारण एखाद्या कॉमन पब्लिकला तुम्ही हजार दोन हजार चार हजारची थकबाकी असेल तर पाईप लाईन कापायला पोहोचतात. मग ह्या होर्डिंग वाल्यांची एवढी थकबाकी एवढे मोठे नुकसान जे महापालिकेचे होत आहे त्याचे काय? आणि प्रशासनाने तेवढे सांगावे की किती थकबाकी आहे. ४० करोड वैती साहेब बोलले माझेही मत तेच आहे. आणि दुसरे आता हा परत प्रस्ताव आणताना जेवढे इललिगल होर्डिंग म्हणजे हायकोर्टाचा निर्देश आहे फुटपाथ पासुन किती त्याची लांबी पाहिजे एक सिग्नलपासुन किती लांबी पाहिजे ते सगळेच निर्देश मला वाटते की शहराचे पुर्ण होर्डिंग एकदाचे काढून हा नविन एक साईजचे आणि हायकोर्टाचे निर्देशाचे पालन करुन नविन होर्डिंग बसविण्यात यावे. आणि सगळ्यात पहिला हे सगळी कंपनीला ब्लॅकलिस्ट करा ज्यांची अजुनपर्यंत थकबाकी आहे त्यांना त्यांच्यावर पॅनल्टी लावून त्यांची वसुली करा. आणि त्यांच्याकडून ती वसुली करुन पहिला आपण ४० करोडचा आपला रेव्हेन्यु बुडतोय त्यासाठी कोण जबाबदार? ते पहिला घ्या.

मा. महापौर :-

ठिक आहे. ठराव झालेला आहे. पुढच्या महासभेमध्ये सदरचा विषय घेण्यात येईल.

गिता जैन :-

मॅडम, प्रशासनाचा जवाब आला नाही.

मा. महापौर :-

हा पुढच्या महासभेमध्ये विषय घ्यायचा ठरलेला आहे तोपर्यंत तुम्ही जावून प्रशासनाकडून जवाब मागा. आता पुढचा विषय घ्या.

ध्रुवकिशोर पाटील :-

जी ह्याची माहिती मागितलेली आहे ही माहिती मी अपेक्षित केलेली आहे त्या माहितीस्तव विषय फेरसादर करावा.

मा. उपमहापौर :-

ऑलरेडी महापौर मॅडम जो ठराव मनोज दुबे यांनी मांडलेला आहे त्यामध्ये माहितीसह फेरसादर करावा असा ठराव मांडलेला आहे. पुढचा विषय सचिव साहेबांनी घेतलेला आहे.

प्रकरण क्र. ०३ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुख्य रस्त्यांवर पीपीपी (Public Private Partnership) तत्वावर दिशादर्शक फलक उभारणे कामाबाबत.

ठराव क्र. ०७ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रमुख रस्त्यांवर MMRDA तर्फे मेट्रोचे काम सुरु आहे तसेच मेट्रो बरोबर काही ठिकाणी उड्डाणपुलही बांधण्यात येणार आहे. त्यामुळे कमानी उभारणे व फलक लावणे सद्यस्थितीत सोयीस्कर होणार नाही. त्यामुळे मेट्रो व उडडाणपुलाचे काम पूर्ण झाल्यानंतर महापालिकेतर्फे दिशादर्शक फलक उभारण्यात यावेत.

महापालिकेच्या इतर रस्त्यांवर कमानी व फलक उभारण्याची डिझाईन तयार करुन व पालिकेतर्फे या कमानी व फलक उभारल्यास किती खर्च येईल व त्यावर जाहिरात केल्यास त्यापासुन किती उत्पन्न महापालिकेस मिळू शकेल? या सविस्तर माहितीसह प्रस्ताव फेरसादर करण्यास ही मा. महासभा मान्यता देत आहे.

सुचक :- श्री. मनोज दुबे          अनुमोदन :- श्री. अनिल विराणी

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र.४, महापालिका मुख्य कार्यालयात राष्ट्रध्वजाचे अवरोहण व निगराणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना भत्ता मंजूर करणेबाबत.

दिनेश जैन :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात राष्ट्रध्वजाचे अवरोहण व निगराणी करणाऱ्या दोन कर्मचाऱ्यांस मासिक रु. २०००/- प्रत्येकी विशेष भत्ता अनुज्ञेय करण्यास ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

रिटा शहा :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव मंजुर पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. ०४ :-

महापालिका मुख्य कार्यालयात राष्ट्रध्वजाचे अवरोहण व निगराणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना भत्ता मंजूर करणेबाबत.

ठराव क्र. ०८ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात राष्ट्रध्वजाचे अवरोहण व निगराणी करणाऱ्या दोन कर्मचाऱ्यांस मासिक रु. २०००/- प्रत्येकी विशेष भत्ता अनुज्ञेय करण्यास ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. दिनेश जैन        अनुमोदन :- श्रीम. रिटा शाह

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

(प्रकरण क्र.५, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून प्राप्त होणाऱ्या सदनिका दहिसर नदी लगतच्या झोपडपट्टीधारकांना तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन देणेबाबत निर्णय घेणे.

ध्रुवकिशोर पाटील :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध विकास कामांमार्फत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडील रेन्टल हाऊसिंग स्कीम योजनेतंर्गत बांधकाम परवानगी घेऊन चार चटईक्षेत्राच्या मर्यादेत सदनिका बांधण्यात येत आहेत. सदर योजनेतील एक चटई क्षेत्राच्या सदनिकेपैकी 50% सदनिका शासन अधिसुचनेनुसार मनपा क्षेत्रातील संक्रमण शिबिरासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेस हस्तांतर करण्यात येत असतात. सदर योजनेतून प्राप्त होणाऱ्या 50% सदनिका पैकी 97% सदनिका प्रकल्प बाधितांसाठी कायमस्वरूपी देता येतात तथापी सदर धोरणास शासनाची मंजुरी मिळालेली नसून या बाबत शासन स्तरावर पाठपूरावा सुरू आहे. त्यानुसार शासनाकडे पाठपुरावा करुन करण्यात यावा.

सद्यस्थितीत मिरा-भाईंदर महानगरपालिकेस उत्तन रस्ता रुंदीकरण जैसलपार्क घोडबंदर रस्ता व इतर रस्ता रुंदीकरणाची कामे विविध आरक्षणाचा विकास करताना तसेच धोकादायक इमारतीमधील रहिवाशांची पर्यायी व्यवस्था साठी सदनिकेची आवश्यकता असल्याने मनपाच्या कोट्यातील सदनिका मुंबई महानगरपालिकेस देण्यात येऊ नये.

अनिल विराणी :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

काका तुम्ही बोला.

रोहिदास पाटील :-

महापौर मॅडम आयुक्तांना, सभागृहांना विनंती आहे जसे आपण रुम देतो फ्लॅट देतो आज १०-१०, १२-१२ वर्षापासुन ज्या काही इमारती धोकादायक म्हणून महापालिकेने पाडल्या त्यातले राहणारे रहिवाशी सैरा वैरा फिरत आहेत. त्यातले अणेक कुटूंबातले प्रमुख मेले पण त्यांना आपण वर्षानुवर्ष मागणी करत आहोत की त्यांना भाड्याने तुम्ही रुम द्या. जसे इतरांना देतात तसे त्यांच्याकडून नॉमिनल चेक कमित कमी भरा असे ते भाडे घ्या पण त्यांना रुम द्या. जेणे करुन त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न दरवेळी ते भाड्याने इकडून तिकडे फिरवायचे मुर्धाहून खारीला, खारीहून घोडबंदरला,

घोडबंदरहून इंदिरा नगर, इंदिरा नगर वरुन मग विरार ला मुलांनी शिक्षण घ्यायचे ते कसे घ्यायचे. महापौर मॅडम माझी विनंती आहे सभागृहाला विनंती आहे आयुक्तांना विनंती आहे असे आपल्या ताब्यात असलेले रुम अन्य कोणालाही न देता तो ठराव झालेलाच आहे ठरावाला आमचे समर्थन आहे. पण त्याच्यात आमची सुचना आहे की १०-१०, १२-१२ वर्षापासुन जी लोक सैरावैरा इकडे तिकडे फिरत आहेत त्यांना रुम मिळाले नाही त्यांच्या बिल्डींगचे बांधकाम होत नाही एफ.एस.आय. मिळत नाही त्यामुळे बांधकाम होत नाही रोड वाईडींगमध्ये ज्या बिल्डींग तुटल्या त्यामुळे त्याठिकाणी बिल्डींग बनु शकत नाही. माझी सभागृहाला विनंती आहे की हा विषय अतिमहत्वाचा विषय आहे भावनात्मक विषय आहे. त्या संबंधिताना न्याय देण्यासाठी हे सभागृह एकमताने राहावे. आयुक्तांनी ते नियमात बसवावे आणि त्यांना रुम भाड्याने द्यायचे. रुम फुकट द्यायचे नाहीत नॉमिनल जे भाडे घ्यायचे आहे ते भाडे घ्यायचे आहे अशी माझी सुचना आहे. धंन्यवाद.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्या प्रभात ताई बोला.

प्रभात पाटील :-

मला मगाच पासुन ट्राय करत आहे मला बोलायला मिळाले नव्हते. मागचा जो एक विषय झाला की झेंडावंदन करणारा माणसाला वेतनवाढ आपण दिली त्याच्यामध्ये माझी एक सुचना आहे आणि जर सुचना तुम्हाला ग्राह्य वाटली तर असे आहे १५ ऑगस्ट, २६ जानेवारी आपल्याकडून अगदी दंडकवून आपले कार्यक्रम होतात. महापौरांच्या हस्ते ध्वजावरोहण, शिवरायांच्या पुतड्याला आणि बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतड्याला माळा अर्पन केली जाते. झेंडावंदन होते सगळे रितसर होते त्याच्या बद्दल काही दुमत नाही परंतु ह्या शहरामध्ये ह्या महापुरुषांचे असे किती पुतडे आहेत. नुकतेच एक दिढ वर्षापुर्वी आपण नवघर शाळेच्या प्रांगणामध्ये स्वातंत्र सैनिकांच्या स्मारक आपण उभारले आणि त्याची मोठी बातमी पण झाली १५ ऑगस्टला म्हणा किंवा ऑगस्ट क्रांती दिनाला म्हणा किंवा २६ जानेवारीला प्रशासनाकडून त्या स्मारका कडे किंवा शहरातील इतर पुतड्यांकडे अगदी दुर्लक्ष झाले म्हणजे काय फक्त त्या दोन गोष्टी ठरलेल्या आहेत त्याच कराच्या आपण त्याच्यामध्ये आपल्या परिपत्रकात काही बदल करायचे नाहीत का? मग कशासाठी करोडो रुपये खर्च करुन आपण पुतडे आणि स्मारके उभारायची. माझी सुचना आहे त्या माणसांना पगारवाढ दिलीच पाहिजे. त्यांचा योग्य तो सन्मान झालाच पाहिजे. परंतु शहरातले जे काही महत्वाची स्थाने आहेत ती दुर्लक्षीत राहता कामा नये माझी सुचना योग्य असेल तर नक्की त्या ठरावामध्ये तुम्ही मेन्शन करा. हा एक विषय झाला. दुसरा विषय जो आता चालु आहे की आपण ठिक ठिकाणी ह्यांना खोल्या द्या त्यांना रुम द्या त्या बाधितांना प्लॅट द्या मॅडम माझे दोन अडीच वर्षापुर्वी मी एक पत्र दिले आयुक्तांना आता हे आयुक्त नविन आहेत त्याबद्दल काही म्हणणे नाही पण माझा पत्राची महापालिकेमध्ये नोंद असेल. पत्र असे होते की आपण ह्याच्या अगोदर हाऊस व डिसहाऊसमध्ये जी घरे बांधली ती शहरातील बऱ्याच लोकांना आपण दिली. त्यांचे पुर्णवसन आपल्याला करायचेच होते त्याबद्दल दुमत नाही परंतु ज्यांना आपण ती घरे दिली ज्यांना आपण त्या जागा दिल्या त्यांच्या नावी केल्या ती लोक तिथे राहतात का? त्यांनी ती घरे विकलेली आहेत की भाड्याने दिली आहेत याचा आपण जरा तरी विचार करतो का? खरच त्यांना जर ते घरे आवश्यक असते तर ते घर विकले नसते. त्यांनी ते भाड्याने दिले नसते. परंतु ह्या जरा घरांचा सर्व्हे करा असे मी आयुक्तांना पत्र दिले होते की ही जी आपण घरे दिली. आपण त्यांचे पुर्नवसन करण्याच्या हिशेबाने दिली परंतु त्यांना जर त्याच्या उपभोगच घ्यायचा नसेल तर आपण दिलेली ही सगळी उहापोह जेवढा केला आहे तो सगळ फुकट आहे. आज ते आपले एक घर घेतात आणि दुसरीकडे झोपडे बांधतात. तो रस्ता पुन्हा बाधित झाला की त्यांना तिसरे घर घेण्याची आपण मुभा देतो. म्हणजे हे सगळे जे चालले आहे हे चालवणारी एक स्कीम आहे. हे स्कीमवाले लोक आहेत. आणि असे स्किमवाली माणसे आपल्या पालिकेत समाजकल्याण विभाग, आणि बऱ्याच

ठिकाणी चालत असतात. तुम्हाला मी नावाने नाही सांगेण तुम्हाला मी व्यक्ती नाही सांगेण तर हे जे चाललेली जी साखळी आहे याच्यामध्ये तूम्ही आम्ही मोठ्या उदार मताने सगळी घरे देत असतो सगळ्या मालमत्ता देत असतो. आपण त्यांच्यावर उपकृत होऊन सगळे देतो. परंतु त्याचा शेवट काय होतो याची माहिती काढणे आणि ह्याचा सगळा संदर्भ काढणे याचा सारांश काढणे आणि असे किती घरे आहेत अशा किती इमारती आहेत आपण हाऊस आणि डिसहाऊसमध्ये इंद्रलोकमध्ये जी घरे दिली त्याच्यामध्ये ते लोक असे आहेत की ते त्या बिल्डींगचे मेन्टेनन्स भरु शकत नाहीत. आता बिल्डींगचे मेंन्टेनस् हे सगळ्यांसाठी आवश्यक असते मग मेंन्टेनन्स जेव्हा घरे दिली तेव्हा आपण ठरवले होते काकांना माहित असेल आपली पॉलिसी होती की त्यांचे मेंन्टेनस महापालिकेने भरायचे. आता ते मेंन्टेनस् अभावी त्या सोसायट्या रळतात की त्यांना त्यांचा मेंन्टेनस् काढता येत नाही. तेव्हा ह्या सगळ्या गोष्टींसाठी काहीतरी विषय घ्या किंवा त्याचे काही तरी समारोप करा. त्याला काही तरी शेवट द्या त्याला आकार द्या. आणि हा प्रश्न ह्याच प्रश्नाशी निगडीत आहे. कारण आता सुध्दा आपण ही घरे द्यायला निघालो आहेत. ठराव झाला तो वेगळा भाग आहे. परंतु हे असेच होणार आहे ही साखळी आहे ही कुठेतरी ब्रेक झाली पाहिजे. आणि पालिकेच्या हितात ती ब्रेक झाली पाहिजे. तेव्हा ह्या गोष्टीचा विचार करावा अशी माझी विनंती आहे.

मा. महापौर :-

ताई आपण त्यांना घरे देत नाही.

प्रभाग पाटील :-

मी तुम्हाला बोलले की त्यांचा जो काही निर्णय घेतला तो वेगळी गोष्ट आहे. परंतु जे मागे झाले आहे त्याच्या सुध्दा विचार करण्याची वेळ आहे ही गोष्ट आपणाला टाळून चालणार नाही.

मा. महापौर :-

ठिक आहे. सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. ०५ :-

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून प्राप्त होणाऱ्या सदनिका दहिसर नदी लगतच्या झोपडपट्टीधारकांना तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन देणेबाबत निर्णय घेणे.

ठराव क्र. ०९ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध विकास कामांमार्फत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडील रेन्टल हाऊसिंग स्कीम योजनेतंर्गत बांधकाम परवानगी घेऊन चार चटईक्षेत्राच्या मर्यादेत सदनिका बांधण्यात येत आहेत. सदर योजनेतील एक चटई क्षेत्राच्या सदनिकेपैकी 50% सदनिका शासन अधिसुचनेनुसार मनपा क्षेत्रातील संक्रमण शिबिरासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेस हस्तांतर करण्यात येत असतात. सदर योजनेतून प्राप्त होणाऱ्या 50% सदनिका पैकी 97% सदनिका प्रकल्प बाधितांसाठी कायमस्वरूपी देता येतात तथापी सदर धोरणास शासनाची मंजुरी मिळालेली नसून या बाबत शासन स्तरावर पाठपूरावा सुरू आहे. त्यानुसार शासनाकडे पाठपुरावा करून करण्यात यावा.
सद्यस्थितीत मिरा-भाईंदर महानगरपालिकेस उत्तन रस्ता रुंदीकरण जैसलपार्क घोडबंदर रस्ता व इतर रस्ता रुंदीकरणाची कामे विविध आरक्षणाचा विकास करताना तसेच धोकादायक इमारतीमधील रहिवाशांची पर्यायी व्यवस्था साठी सदनिकेची आवश्यकता असल्याने मनपाच्या कोट्यातील सदनिका मुंबई महानगरपालिकेस देण्यात येऊ नये.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील　　　　अनुमोदन :- श्री. अनिल विराणी

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र.०६, मा. महासभा ठराव क्र. १३ दि. १८/०४/२००६ अन्वये लागू केलेल्या मालमत्ता हस्तांतरण फी बाबत फेरविचार होणेबाबत.

मा. महापौर :-

रिटा शहा मॅडम तुम्ही बोला.

रिटा शहा :-

महापौर मॅडम मला प्रकरण क्र.५ वर मला बोलायचे आहे. त्यात माझी सुचना आहे. आता जो विषय झाला घरे देण्या संदर्भात आता शिवसेना गल्लीमध्ये एक बिल्डींग पडली आणि त्याच्यामध्ये फॅमिलीला आपण लोकांना खाली उतरवून त्यांना आपण भाईंदर सेकेंडरीमध्ये त्यांना शिफ्ट केलेले आहे. परंतु मला असे समजले आहे की तिकडे अजित मुठे साहेबांची काही लोकांशी बाचाबाची झाली आणि त्या बिल्डींगच्या काही रहिवाशींवर काही तरी गुन्हा दाखल झालेला आहे. त्या संदर्भात मला माहिती पाहिजे की त्याच्यामध्ये खरे काय झालेले आहे. मॅडम एकतर ते लोक पॅनिक आहेत. त्यांची घरे गेली आहेत. त्यांचा सामान गेला आहे. आणि त्याच्यावर परत त्या तीन चार रहिवाशींवर गुन्हा दाखल झालेला आहे. त्याच्यामध्ये काय खरे आहे ते प्रशासनाने मला सांगायचे.

अजित मुठे :-

मा. महापौर मॅडम, काल जी इमारत कोसळली होती त्याबद्दल सकाळ पासुन अतिक्रमण विभाग आणि आपत्ती व्यवस्थापन विभाग हा सकाळ पासुन जवळ जवळ ६ वाजेपासून कार्यरत तिथे होता. यात आम्ही संपुर्ण लोकांना विशेषत: आपत्ती व्यवस्थापनच्या अग्निशमन दलाने ७२ लोकांना तिथे वाचविलेले आहे. असे असतानाही याव्यतिरिक्त वारंवार नागरीक आमच्या काही वस्तु घ्यायच्या आहेत म्हणून चार चार, पाच पाच, सहा सहा वेळा वरती जावून येत होते. काहीजन गोल्ड राहिले म्हणूनही जात होते. प्रत्येक्षात गोल्ड वगैरे न घेता ते घरातील सामान पंखे वगैरे हे उघडत होते, ए.सी. उघडत होते, किंवा फ्रीज आणि टीव्ही उचलुन आणायचा प्रयत्न करत होते. ह्याला आम्ही नकार दिला होता. मात्र याच्यात बाचाबाची अशी झोलेली आहे त्यावेळी एक व्यक्ती ही अर्धा तास गोल्ड घेण्यासाठी जातोय म्हणून वर जावून बसला. आणि प्रत्यक्षात तो पंखे वगैरे उघडत होता. खाली आला असताना पोलीसांनी त्याला जरा रागवले आपले चव्हाण सहा. आयुक्त हेही त्याला रागवले. तर त्यांचा राग मनात धरुन तो आणि त्याचे नातेवाईक यांनी पळत येऊन चव्हाण यांना धक्का बुक्की केली. आणि ही पोलिसां समोर झालेली होती. स्व:त ए.सी.पी. साहेब तिथे हजर होते. एवढे सहकार्य करुन जर माझा कर्मचाऱ्याला कोणी धक्काबुक्की करत असेल किंवा मारहाण करत असेल तर अशा व्यक्तींवर अतिक्रमण विभाग तर नक्कीच गुन्हा दाखल करेल की सहा. आयुक्त दर्जाच्या व्यक्तीला जर तुम्ही मारहाण करत आहेत सहाकार्य करुन आम्ही तुमचा जीव वाचवत आहोत असे असताना तुम्ही माझ्या सहा.आयुक्ताला मारहाण करत असाल तर ही बाब आम्ही खपवून घेणार नाही.

रिटा शहा :-

ठिक आहे साहेब तुम्ही खपवून घेणार नाहीत आणि ते आम्हालाही मान्य आहे.

अजित मुठे :-

आम्ही संपुर्ण यांना सामान आणन्यासाठी आम्ही संपुर्ण मदत करत होतो. मी स्व:त तिथे ११ वाजेपर्यंत थांबलेलो होतो. आयुक्त साहेब स्व:त तिथे हजर होते. असे असताना आम्ही पुर्ण सहकार्य करुन प्रत्येकाला हे केले होते. जेव्हा बिल्डींग कामकाज तोडणे सुरु झाले त्यावेळी काही नागरीक येऊन म्हणत होते की आम्हाला बिल्डींगमध्ये जावू द्या. हा जीवाला धोका असल्यामुळे याला आम्ही नकार दिला होता. आणि ही घटना ०८:३० वाजेची आहे.

रिटा शहा :-

साहेब आम्हाला मान्य आहे. मला सुध्दा मान्य आहे की आपण लोकांनी खुप चांगले काम केले आहे. ७४ लोकांना तुम्ही ट्रास्फर केले. पण साहेब ते लोक पॅनिक होते. सकाळी त्यांच्याकडे भरदळ होते आणि इथे ६ वाजेपर्यंत त्यांचे घरदार वगैरे सगळे काही त्यांचे गोले होते. ते लोक पॅनिक होते. ठिक आहे त्यांनी जीवाला महत्व नाही दिले वस्तुला महत्व दिले पण माझी तुम्हाला एक विनंती आहे की जे काही घडलेले आहे त्यांना काही माप करणे योग्य असेल तर तुम्ही माप करा. कारण ते लोक खुप पॅनिक आहेत. त्यांच्यावर कुदरत ने अन्याय केलेला आहे. ठिक आहे त्यांनी त्या पॅनिकमध्ये त्यांनी काही तरी केले असेल परंतु साहेब ते मला असे वाटते त्यांच्यावर आपण जो गुन्हा नोंद केलेला आहे ते काही तरी मागे घेता येत असेल तर घ्या साहेब. कारण ते लोक खुप पॅनिक आहेत. ते रस्त्यावर आलेली होक आहेत.

अजित मुठे :-

याबाबत आपण जे म्हणत आहेत की त्या बिल्डींग मधल्या लोकांवर ज्यांच्यावर आम्ही गुन्हा दाखल केला प्रत्येक्षात मॅडम अशी माहिती नाही. माहिती प्रत्येक्षात अशी आहे की तो बिल्डींगमध्ये राहत होता त्याच्या व्यतिरिक्त इतर बाहेरच्या लोकांनी येऊन जे मिरा भाईंदरचे रहिवाशी नाहीत मला मिळालेल्या माहिती नुसार आमचे कोणाचे तरी नातेवाईक आहेत असे ते लोक सांगत होते त्यांनी येऊन आपल्या अधिकाऱ्याला मारहाण केलेली आहे.

रिटा शहा :-

साहेब जे बाहेरचे लोक आहेत त्यांच्या बद्दल मी बोलत नाही. बाहेरची लोक असतील तर त्यांच्यावर तुम्ही नक्कीच गुन्हा दाखल करा.

अजित मुठे :-

त्या माणसाचे म्हणणे होते की माझे नातेवाईक आहेत असे म्हणणे होते.

रिटा शहा :-

तुम्ही गुन्हा दाखल करा जे बाहेरची लोक आहेत. पंरतु तिकडे कोणी रहिवाशी असेल त्यांच्यावर दया मया करा.

मा. महापौर :-

पण आता गुन्हा दाखल झालेला आहेना?

अजित मुठे :-

गुन्हा काल ऑलरेडी दाखल झालेला होता. ए.सी.पी. स्व:त तिथे होते. पोलिस अधिकारी होते ही बाब पोलीस अधिकाऱ्यांसमोर घडलेली आहे.

रिटा शहा :-

साहेब जो मुलगा आहे त्याची काल इंजिनियरची उद्या परिक्षा आहे. त्याच्यामध्ये तुम्ही चांगला मार्ग काढा साहेब. ठिक आहे तुम्ही पण पॅनिक होते तुम्हाला लोकांचे जीव वाचवायचे होते. आणि नो डाऊट प्रशासनाने खुप चांगले काम केलेले आहे. परंतु कुठे ना कुठे तो एक मुलगा आहे त्याची इंजिनियरींगची उद्या परिक्षा आहे. त्याच्या बद्दल काही तरी विचार करावा अशी मी तुम्हाला विनंती करते.

मा. महापौर :-

ठिक आहे प्रशासनाने याच्या वरती शांतता पुर्वक काहीतरी विचार करावा.

अजित मुठे :-

ठिक आहे.

प्रशांत दळवी :-

मिरा भाईंदर शहरातील झोपडपट्टी व गावठण विभागातील मालमत्तांचे हस्तांतरण करणेबाबत मा. महासभा दि.18/04/2006 ठराव क्र.13 अन्वये ठराव पारित केला होता. परंतु त्याची आजतागायत अंमलबजावणी झाली नाही. प्रशासनाने ठरावाची अंमलबजावणी करुन गावठण व झोपडपट्टी क्षेत्रातील मालमत्ता (सरकारी जागेवरील मालमत्ता असल्यास जागा मालक म्हणून "सरकारी जागा" व भोगवटादार म्हणून) हस्तांतरण करावयाच्या मालमत्ता धारकांची नोंद घेणेकरीता निवासी मालमत्तेस हस्तांतरीत शुल्क रु.1000/- व बिगर निवासी मालमत्तेस हस्तांतरीत शुल्क रु.1500/- आकारावे.

वारसा हक्क / कुटूंबातील अंतर्गत मालमत्ता हस्तांतरण करण्याकरीता रु.500/- शुल्क आकारावे.

मिरा भाईंदर शहरातील काही इमारती ग्रामपंचायत व नगरपालिका कालावधीपासून उभारण्यात आल्या होत्या. त्यामधील काही मालमत्ता धारकांचे करारनामा नोंदणीकृत नसल्याने महापालिकेचा मालमत्ता कर त्यांच्या नावावर हस्तांतरीत झालेला नाही. अशा मालमत्ता धारकांच्या मालमत्ता त्यांचे नावावर हस्तांतरण करणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य ठराव वाचत असताना इतर पदाधिकाऱ्यांनी आपसामध्ये बोलू नये. ठरावाचे वाचन इतरांना कळत नाही. म्हणून कृपया जे जे पदाधिकारी बोलत होते त्यांनी आपसामध्ये बोलू नये. आता विषय क्र.६ वर कोणाला बोलायचे आहे का? जैन मॅडम बोला.

गिता जैन :-

महापौर मॅडम, आपला एकतर साऊंडचा काय प्रॉब्लेम आहे हे मला माहित नाही मॅडम पण ठराव जेव्हा वाचला जातो तो नेमका आम्हाला कळत नाही की तुम्ही ठरावामध्ये आम्हाला अनुमोदन द्यायचे, विरोध करायचा तर त्यात काय मुद्दे आहेत कशावर विरोध करायचा तर प्लिज साऊंड जर क्लियर झाला तर आम्हाला माहित पडणार की नेमका ठराव वाचला काय आहे आणि आम्हाला काय करायचा आहे. मी वारंवार प्रयत्न करते सांगायचे मॅडम बिलकुल इथे ऐकू येत नाही. साऊंडचे काही तरी करा मॅडम.

मा. महापौर :-

ठराव वाचत असताना पदाधिकाऱ्यांनी आपआपसामध्ये बोलू नये. आता ते जेव्हा ठराव वाचत होते तेव्हा मधी कोणी तरी पदाधिकारी बोलत होते. त्यामुळे इतरांना तो ठराव ऐकू येत नाही. राज घरत साहेब तुम्ही जो कोणी इतर सदस्य ठराव जेव्हा वाचतात त्यावेळेला इतरांना म्युट करायचे. पदाधिकारी असले तरीही त्यावेळी तुम्ही त्यांना म्युटच करायचे. कारण तेच बोलतात मग ऐकायला येत नाही.

गिता जैन :-

ठराव झाल्या नंतर वाचल्या नंतर तुम्ही लगेच अनम्युट केले तरी चालेल. त्यावेळी म्युट करा आम्हाला काही हरकत नाही.

मा. महापौर :-

मॅडम, ठराव परत वाचायचा आहे का?

गिता जैन :-

प्लीज मॅडम.

मा. महापौर :-

प्रशांत दळवी साहेब परत एकदा वाचा.

प्रशांत दळवी :-

मिरा भाईंदर शहरातील झोपडपट्टी व गावठण विभागातील मालमत्तांचे हस्तांतरण करणेबाबत मा. महासभा दि.18/04/2006 ठराव क्र.13 अन्वये ठराव पारित केला होता. परंतु त्याची आजतागायत अंमलबजावणी झाली नाही. प्रशासनाने ठरावाची अंमलबजावणी करुन गावठण व झोपडपट्टी क्षेत्रातील मालमत्ता (सरकारी जागेवरील मालमत्ता असल्यास जागा मालक म्हणून "सरकारी जागा" व भोगवटादार म्हणून) हस्तांतरण करावयाच्या मालमत्ता धारकांची नोंद घेणेकरीता निवासी मालमत्तेस हस्तांतरीत शुल्क रु.1000/- व बिगर निवासी मालमत्तेस हस्तांतरीत शुल्क रु.1500/- आकारावे.

वारसा हक्क / कुटूंबातील अंतर्गत मालमत्ता हस्तांतरण करण्याकरीता रु.500/- शुल्क आकारावे.

मिरा भाईंदर शहरातील काही इमारती ग्रामपंचायत व नगरपालिका कालावधीपासून उभारण्यात आल्या होत्या. त्यामधील काही मालमत्ता धारकांचे करारनामा नोंदणीकृत नसल्याने महापालिकेचा मालमत्ता कर त्यांच्या नावावर हस्तांतरीत झालेला नाही. अशा मालमत्ता धारकांच्या मालमत्ता त्यांचे नावावर हस्तांतरण करणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

मा. महापौर :-

ठराव मंजुर पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. ०६ :-

मा. महासभा ठराव क्र. १३ दि. १८/०४/२००६ अन्वये लागू केलेल्या मालमत्ता हस्तांतरण फी बाबत फेरविचार होणेबाबत.

ठराव क्र. १० :-

मिरा भाईंदर शहरातील झोपडपट्टी व गावठण विभागातील मालमत्तांचे हस्तांतरण करणेबाबत मा. महासभा दि.18/04/2006 ठराव क्र.13 अन्वये ठराव पारित केला होता. परंतु त्याची आजतागायत अंमलबजावणी झाली नाही. प्रशासनाने ठरावाची अंमलबजावणी करुन गावठण व झोपडपट्टी क्षेत्रातील मालमत्ता (सरकारी जागेवरील मालमत्ता असल्यास जागा मालक म्हणून "सरकारी जागा" व भोगवटादार म्हणून) हस्तांतरण करावयाच्या मालमत्ता धारकांची नोंद घेणेकरीता निवासी मालमत्तेस हस्तांतरीत शुल्क रु.1000/- व बिगर निवासी मालमत्तेस हस्तांतरीत शुल्क रु.1500/- आकारावे.

वारसा हक्क / कुटूंबातील अंतर्गत मालमत्ता हस्तांतरण करण्याकरीता रु.500/- शुल्क आकारावे.

मिरा भाईंदर शहरातील काही इमारती ग्रामपंचायत व नगरपालिका कालावधीपासून उभारण्यात आल्या होत्या. त्यामधील काही मालमत्ता धारकांचे करारनामा नोंदणीकृत नसल्याने महापालिकेचा मालमत्ता कर त्यांच्या नावावर हस्तांतरीत झालेला नाही. अशा मालमत्ता धारकांच्या मालमत्ता त्यांचे नावावर हस्तांतरण करणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ७, महानगरपालिकेची परिवहन सेवासुरळीत चालविणेकरीता नविन धोरण ठरविणे बाबत.

ध्रुवकिशोर पाटील :-

मिरा भाईंदर महापालिका परिवहन उपक्रमातर्फे सन 2005 पासुन बस सेवा शहरातील नागरीकांकरीता सुरु करण्यात आली. सन 2005 ते 2010 पर्यंत महापालिकेतर्फे बसेस खरेदी न करता खाजगी तत्वावर ठेकेदारामार्फत 50 बसेस चालविण्यात येत होत्या.

निविदेची मुदत संपल्यानंतर पालिकेतर्फे पुन्हा धोरण बदलून पीपीपी तत्वावर ठेकेदाराकडून रॉयल्टी घेवून JNNURM अंतर्गत प्राप्त झालेल्या 50 बसेस व पूर्वीच्या ठेकेदाराच्या 50 बसेस अशा एकुण 100 बसेस चालविण्याचा 10 वर्षाकरीता ठेका देण्यात आला. परंतु ठेकेदाराने फक्त एकच वर्ष रॉयल्टीची रक्कम भरली त्यानंतर रॉयल्टी महापालिकेत भरावयाचे बंद केले व शासनाचा कर न भरल्याने, बसेस पुर्ण क्षमतेने न चालविल्याने, बसेस चे मेंटेनन्स केले नाही व लोकप्रतिनीधी/नागरीकांच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर सन 2015 साली त्यांचा ठेका रद्द करण्यात आला. तद्नंतर सदर ठेकेदार लवादात गेला, आजतागायत लवाद सुरु असून महापालिकेच्या सुमारे 50 बसेस लवादामुळे धुळ खात पडलेल्या आहेत.

तद्नंतर पालिकेतर्फे बस सेवा सुरु करण्यात आली, या दरम्यान JNNURM-2 या योजने अंतर्गत केंद्र शासनाकडून 100 बसेस मंजुर झाल्या परंतु त्यातील 85 बसेस महापालिकेस प्राप्त झाल्या. केंद्र सरकारकडून डेपो साधन सामुग्रीकरीता व ITS च्या अंमलबजावणीकरीता जागतिक बँकेकडून अनुदान मंजुर झाले. महापालिकेतर्फे बस सेवा सुरु झाल्यानंतर बस सेवेवर परिणाम होवून सुमारे 50 ते 60 टक्के बसेस रस्त्यावर ऑन रुट होत्या व खर्च प्रती किमी. जास्त होत असल्याने महापालिकेची मोठ्या प्रमाणात तुट होत होती.

सन 2016 साली पुन्हा पालिकेतर्फे व केंद्र शासनाचे नियुक्त सल्लागार व महापालिकेचे तांत्रिक सल्लागार यांचेशी अभिप्राय घेतल्यानंतर धोरण बदलून GCC तत्वावर बस सेवा सुरु करणेकरीता मा. महासभेची मंजुरी घेवून निविदा काढण्यात आली व ठेकेदाराला Letter of Acceptance देण्यात आले. परंतु काही कारणास्तव सदर ठेकेदारास दिलेले Letter of Acceptance मागे घेण्यात आले.

सन 2018 साली पुन्हा पालिकेतर्फे सल्लागार नियुक्त करुन त्यांच्या अभिप्रायानुसार धोरण बदलणेकरीता कार्यवाही सुरु करुन NCC with SMF Or VGF Basis वर किंवा GCC पध्दतीने बस सेवा सुरु करणेबाबत मा. महासभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात आला. मा. महासभेची मंजुरी घेवून निविदा प्रक्रिया करुन पात्र निविदाधारकास NCC with VGF Basis बस सेवा सुरु करणेकरीता करारनामा करुन कार्यादेश देण्यात आला. ठेकेदाराने बस सेवा सुमारे 1 वर्षभर सुरळीत चालविल्यानंतर कोविड-19 च्या प्रादुर्भावामध्ये लॉकडाऊन कालावधीत प्रशासन व ठेकेदार यांच्यात झालेल्या मतभेदामुळे ठेका रद्द करण्यात आला.

तद्नंतर पुन्हा पालिकेतर्फे बस सेवा सुरु करण्यात आली व काही महिन्यांनंतर तात्पुरता ठेकेदार नियुक्त करुन ठेकेदारामार्फत बस सेवा सद्यस्थितीत सुरु आहे. दरम्यान बस सेवा चालविणेबाबत पालिकेतर्फे पुन्हा धोरण बदलण्यात आले व NCC with SMF या तत्वावर निविदा काढण्यात आली. तीन वेळा निविदेस मुदत वाढ देवूनही निविदेला प्रतिसाद मिळाला नाही. वास्तविक ठेका रद्द केल्यानंतर तात्पुरता ठेकेदार नियुक्त केल्यानंतर मा. महासभेला निर्दशनास आणून देणे आवश्यक होते. तसेच परिवहन सेवेकरीता धोरण बदलून नविन निविदा काढणेकरीताही मा. महासभेची मंजुरी घेणे हे आवश्यक होते. महापालिकेच्या मंजुरी शिवाय प्रशासनाला धोरण बदलण्याचा अधिकार नाही. मा. महासभेच्या अधिकाराचा अवमान केल्याचे यावरुन स्पष्ट होत आहे.

DPR बनविणे Constultant नेमणे याकरीता लाखो रुपये महापालिकेने शुल्क देवून सुध्दा उपरोक्त परिस्थीतीवरुन असे दिसून येते की, महापालिकेची परिवहन सेवा आजतागायत सुरळीत झालेली नाही.

तरी महापालिकेच्या बस सेवेचे नविन धोरण ठरविणेकरीता मा. महापौरांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 31(1) अन्वये पदाधिकारी, गटनेते व परिवहन समिती सभापती यांची कमिटी नियुक्त करुन कमिटीने यावर निर्णय घेण्यास ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

अनिल विराणी :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव मंजुर.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, परिवहन सेवा आम्ही बरेच काही आटापीटा करतो ह्या विषयावर नेहमी ह्या शहरासाठी की बाबा ह्या शहराला एक चांगली परिवहन सेवा आम्ही उपलबध करुन देऊ शकू हा याच्या मागच्या नेहमी धोरण राहिलेले आहे. आणि मला ह्या विषयाचा गर्व आहे की कुठल्याही पक्षाने याचा विरोध नाही केला कारण प्रत्येकाला ह्या शहरामध्ये एक चांगली परिवहन सेवा पाहिजे. कुठलाही पक्ष कधिही सत्तेवर असताना कोणीही विरोधी असताना कोणीही आजपर्यंत परिवहन सेवेचा विरोध कोणी केलेला नाही. साहेब परिवहन सेवा पाहिजे योग चांगला आहे तत्कालिन आयुक्त सुरेश काकाणी साहेबांनी आपल्याला निशुल्क एक पैसा आपला लागला नाही. ८०-८५ बसेस आपल्याला नविन शासनाच्या माध्यमातुन आपल्याला देऊन दिल्या. आपण त्याला चालवू शकलो नाही त्याला विविध कारणे राहीलेली आहेत आजपर्यंत. आणि विशेषत: आयुक्त साहेब मी आपल्याला ह्या विषयावर विनंती करेल की ह्याच्या नंतर जो धोरण ठरेल तो असा खिळ बसल्या सारखा असायला पाहिजे महापौर मॅडम. आपण आजपर्यंत जे काही धोरण ठरविलेले आहे ते वेगवेगळे धोरण ठरविलेले आहे. शेवटचे धोरण आपण एन.सी.सी. तत्वावर मध्ये बायबिलिटी गॅप पेंडिंगच्या धरतीवर आपण त्यांना ह्या धोरणाला आपण ठरविले होते. ते भागिरथी एम.बी.एम.टी. प्रा.लि. ह्या कंपनीला आपण दिले तेही चालवू शकले नाहीत कोविड काळामध्ये त्यांच्या बरोबर आपले वाद झाले. तो विषय न्यायप्रविष्ठ झाला. जे काही व्हायचे ते झाले. आता परत मी आयुक्त महोदयांना विशेषत: विनंती करेल की ह्या समितीमध्ये त्यांनी स्व:त उपस्थित रहावे. तेवढेच नाही तर साहेब आम्हाला पुर्ण डिटेल काढा. म्हणजे आपल्याला झालेल्या आपल्याकडे उपलब्ध बसेस त्यांची परिस्थिती त्याच्या नंतर आपल्याला झालेल्या याच्यातुन तोटा मग ते आपल्याकडे आपण नेहमी सबसिडीच्या माध्यमातुनच आपण अनुदानाच्या माध्यमातुन ही परिवहन सेवा चालविलेली आहे. तर अशा परिवहन सेवेची खरी परिस्थिती आपल्याकडे आजच्या तारखेला काय आहे. साहेब गेल्या वेळी हा महासभेमध्ये बजेटच्या अर्थसंकल्पामध्ये मी ह्या विषयावर मी चर्चा केली होती की २० कोटी रुपयेची सबसिडीची मांग करण्यात आलेली आहे. काय खरोखर परिवहन सेवा अशा प्रकारे चालविणे महापालिकेला सोयिस्कर नाहील? म्हणून आयुक्त महोदय माझी आपणास विनंती आहे की ह्या कमिटी समोर टीपणी सादर करा असलेली परिस्थितीची. जी.सी.सी. तत्वावर एन.सी.सी. तत्वावर जे तत्वावर आपल्याला चालवायचे आहे त्याची खरी परिस्थिती आपल्या डोळ्या समोर आली पाहिजे. त्याच बरोबर त्या कमिटीमध्ये माझी आपल्याला एक सुचना आहे आपले मिनिस्ट्री ऑफ अर्बन डेव्हलपमेंटने आपल्याला जी.सी.सी. तत्वावर शिफारस केलेली आहे. त्यांचे कुठले परिष्ठ  अधिकारी यांच्या समितीमध्ये उपस्थित राहू शकले त्या सभेमध्ये तर आपल्याला चर्चा करणे सोयिस्कर होईल. त्यांचे मार्गदर्शन आपल्याला उपलबध होईल. म्हणून महापौर मॅडम मी तुमचे लक्षवेधु इच्छीतो आयुक्त महोदय तसे आपल्याला करता आले मिनिस्ट्री ऑफ अर्बन ट्रास्पोर्ट विंगचे अधिकारी ज्यांची आपल्याला शिफारीश आहे की ऑपरेशनसाठी जी.सी.सी. मॉडेल तुम्ही त्याचा वापर करा. त्यांचे अधिकारी इथे उपस्थित राहीले तर आपल्याला त्याच्यावर चर्चा करता येईल. ह्या वेळी महापौर मॅडम सविस्तर चर्चा पुर्ण दिवस गेला तरी चालेल मात्र ह्या वेळचा निर्णय असा खिळ

ठोकल्या सारखा निर्णय कायमस्वरुपी निर्णय परिवहन सेवेसाठी असावा ही माझी आपणास सुचना आहे. धंन्यवाद.

मा. महापौर :-

ठिक आहे आपण त्या समितीने तो निर्णय घ्यायचा आहे.

प्रविण पाटील :-

महापौर मॅडम गिता जैन मॅडमला जरा ह्या विषयावर बोलायचे आहे.

गिता जैन :-

महापौर मॅडम, सर्वप्रथम दरवेळी ह्या विषयावर प्रशासनाने गोषवारा दिला नाही की विषय आपण महासभा घेऊ नये असे आपले सर्वांचे मत होते. आणि ते एवढ्या वर्षानुवर्ष ते पाळतोय. आता परत ती प्रथा सुरु झाली आम्हाला दोन गोषवारे नाहीत आणि तरीही हा विषय आणला आहे. आणि त्याबद्दल चर्चा चांगला विषय आहे परिवनह खुप अगत्याचा विषय आहे. पण मला प्रशासनाचे त्यात काय मत आहे जोपर्यंत आम्हाला माहित नाही, आम्हाला वाटते की आता काठी ठराव नघेता पुढच्या वेळी हा विषय आणावा आणि त्यात प्रशासनाचे मत काय आहे हे झाल्या नंतरच ह्या विषयी चर्चा करणे असे चांगले राहणार आहे असे मला कुठेतरी वाटते. कारण प्रशासनाचा गोषवारा त्यांचे मत काय आहे ते आता सांगावे नाही तर माझाही ठरवा आहे की ह्या विषयावर गोषवारा आलेला नसुन हा ठराव रद्द करुन किंवा पुढच्या वेळी आणावा असे माझा ह्या विषयावर ठराव आहे.

मा. महापौर :-

प्रशासनाचा गोषवारा आहे मॅडम.

गिता जैन :-

नाही आहे.

मा. महापौर :-

आहे.

गिता जैन :-

मॅडम आम्हाला मिळाला नाही.

प्रशांत दळवी :-

सचिव साहेब स्पष्टिकरण द्या.

गिता जैन :-

सचिव साहेब तुम्ही गोषवारा दिला आहे का?

नगरसचिव :-

मॅडम, गोषवारा २० तारखेलाच प्राप्त झालेला होता सकाळी महासभेच्या दिवशी. ज्या दिवशी आपण ती सभा तहकुब केली होती.

गिता जैन :-

सचिव साहेब अजुन मला ते आलेले नाही.

नगरसचिव :-

कन्फर्म करावे लागेल.

गिता जैन :-

बाकी सगळ्यांना आलेला आहे का जे जे माझा आवाज ऐकू शकतात त्यांनी मला सांगावे. बघा मला वाटते स्नेहा मॅडम सांगते मला आले नाही, नयना मॅडम सांगते आले नाही, काका सांगतो आले नाही.

निलम ढवण :-

गोषवारा आलेला नाही.

मा. महापौर :-

प्रशासनाचा गोषवारा गेला आहे की नाही ?

गिता जैन :-

मॅडम बहूतेक हाथ नाही मध्ये मला दिसते.

मा. महापौर :-

ई-मेल वर पाठविलेले आहे.

गिता जैन :-

नाही मॅडम.

मा. महापौर :-

ठिक आहे तुमचा ठराव असेल तर मांडा.

गिता जैन :-

मी मांडले तो गोषवारा देऊन पुढच्या वेळी हा विषय आणा.

मा. महापौर :-

मतदान करा. सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील साहेब ह्यांनी सुध्दा ठरावात असेस म्हटलेले आहे की महापौरांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ३१ (१) अन्वये पदाधिकारी, गटनेते, परिवहन समिती सभापती यांची कमिटी नियुक्त करुन कमिटीने ह्यावर निर्णय घ्यावा. आता आपण म्हणताय की तुम्हाला गोषवारा आलेला नाही तर प्रशासनाने गोषवारा मेल वरती पाठविलेला आहे. तरी तुम्हाला ठराव करायचा असेल.....................

गिता जैन :-

ठिक आहे मॅडम जर ह्या विषयावर आता निर्णय नसेल तर माझे काहीच सांगणे नाही.

मा. महापौर :-

आता निर्णय नाहीच आहे.

गिता जैन :-

ठिक आहे. मी परत एक सांगते बाकी बहूतेक तुम्ही बघा ज्यांना ज्यांना विचारा त्यांनी एकच सांगितले आहे की आम्हाला गोषवारा मिळालेला नाही.

मा. महापौर :-

ठिक आहे मला असे वाटते की आपण गोषवारा त्यांना पुन्हा एकदा प्रत्येकाच्या ई-मेल वरती द्यावा. पुढचा विषय घ्या. आणि हा विषय महापौरांची कमिटी गठीत करुन हा निर्णय घेण्यात येणार आहे. वैती साहेबांना काही बोलायचे आहे वैती साहेब बोला.

चंद्रकांत वैती :-

महापौर मॅडम मला बोलायचे आहे.

मा. महापौर :-

बोला.

चंद्रकांत वैती :-

आमचा ठराव आहे. निला सोंस यांना अनम्युट करा त्या वाचत आहेत.

मा. महापौर :-

निला सोंस मॅडमला अनम्युट करा.

निला सोंस :-

महापौर महोदया, जैसा की यह जन सामान्य जीवन से जुडा हूवा विषय है और बहूत अच्छा विषय है । तो हमारा एक ठराव है । मिरा भाईंदर महानगरपालिकेची परिवहन सेवा सुरळीत चालविणेबाबतचे धोरण निश्चित करण्याचे नियोजन नक्कीच चांगले आहे. या विषयात मिरा भाईंदर

महानगरपालिकेच्या मा. परिवहन समितीने या धोरणाबाबत काय उपाययोजना निश्चित केल्या आहेत त्याची माहिती उपलब्ध आहे का? तसेच भागीरथी ट्रान्सपोर्ट ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर या परिवहन ठेकेदाराच्या काही नविन सुचना आहे का? त्या आपणांस प्राप्त झाल्या आहेत का? तद्वतच आपल्या महापालिकेच्या प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांच्या काही सुचना आहेत का किंवा तसा अहवाल त्यांनी दिला आहे का? याबाबत प्रवासी संघटनांच्या किंवा प्रवाशांच्या काही लेखी किंवा तोंडी सुचना आल्या आहेत का? तसेच मा. न्यायालयात काय निर्देश दिले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन सेवेच्या सेवेमध्ये अधिका अधिक सुसुत्रता यावी व मिरा भाईंदरच्या प्रवाशांना त्याचा लाभ मिळावा म्हणून खरतर असा प्रस्ताव अत्यंत महत्वाचा आहे. परंतु मा. आयुक्त साहेब किंवा प्रशासनाकडून याबाबत स्वयंस्पष्ट असा खुलासा किंवा धोरण असल्याबाबतचा गोषवारा सभेसमोर आला नाही. परिवहन सेवा अधिका अधिक लोकाभिमुख व्हावी व प्रवाशांना उत्तम दर्जेदार प्रवास सेवा देता येईल असा प्रस्ताव शासनाकडून महासभेसमोर विषय पटलावर आणून पुढील महासभेत मान्यतेकरीता ठेवावा असा मी ठराव मांडत आहे.

विनोद म्हात्रे :-

माझे अनुमोदन आहे.

मा. उपमहापौर :-

सचिव महोदय आता ठराव किती झाले आहेत दोन की तीन? बहूतेक माझा हिशेबाने दोन ठराव झालेले आहेत. आणि एका सदस्यांनी निवेदन केले आहे की पुढच्या मिटींगमध्ये हा विषय घेण्यात यावा. मला जरा स्पष्टीकरण देण्यात यावे. तुम्ही मतदान करत असाल तर दोन ठरावाचे करणार की तीन ठरावाचे करणार ?

निलम ढवण :-

महापौर मॅडम, आता जो आपल्या समोर हा प्रशन निर्माण झाला आहे. तर आपल्या पहिल्या पासुन आपल्या महासभेच्या धोरणानुसार किंवा ज्या महापौर असुदेत आयुक्त साहेब असुदेत पुर्वी पासुन ठरविलेले होते की जर गोषवारा नसेल तर तो विषय ह्या महासभेत घेऊच नये. महापौर मॅडम आपल्याला विनंती आहेक की हे गोषवारे जेव्हा परिपत्रक काढतात आणि गोषवारे देतात प्रत्येक नगरसेवकाला तेव्हाच आपण ह्याच्यावर लक्ष केद्रीत करावे. आणि दुसरी गोष्ट सचिव साहेब सांगतात की २० तारखेला आपण ह्याचा गोषवारा दिला आहे आणि तो गोषवारा बहूतेक जणांना मिहाला नाही. पण २० तारीख म्हणजे महासभेच्या दिवशी अशा विषयांवर गोषवारा देऊन त्या विषयावर नगरसेवक आपला अभ्यास किंवा जे काही म्हणणे असेल ते कसे मांडू शकतील? त्यामुळे अशा गंभीर विषयाचे जे गोषवारे असतील जेव्हा तुम्ही परिपत्रक आणि गोषवारे पाठवतात त्याच वेळी दिले जावेत नाकी आपण जी महासभा चालु करणार त्याच दिवशी असे गोषवारे देण्यात येऊ नयेत. आणि तसे विषय त्यावेळी घेण्यात येऊ नयेत असे मी पुन्हा एकदा आपल्याला विनंती करते आणि सुचना देते. याच्यावर महापौर म्हणून आपण लक्ष द्यावे.

मा. महापौर :-

ठिक आहे. दोन ठराव आलेले आहेत.

गिता जैन :-

महापौर मॅडम माझे ऐकून घ्या, बहुतेक निलाजीचे सांगणे पण तेच आहे थोडे बोत जे माझे सांगणे आहे तर तुम्ही ते क्लब करुन घ्यायला माझी काही हरकत नाही. शिवसेना पक्षा तर्फे पण त्यांना ते अनुमोदन दिलेले आहेच.

निलम ढवण :-

पण गिता जैन मॅडम आपण सांगितले अनुमोदन दिले आहे म्हणून क्लब करायला त्यांनी सत्ताधाऱ्यांनी जो ठराव मांडला आहे त्या ठरावामध्ये त्यांनी गटनेता आणि महापौर मॅडम आणि

गटनेता ह्यांच्यामध्ये मिटींग घेऊन त्याच्यावर निर्णय घेणे संदर्भातला ठराव आहे. आणि निला मॅडमने जो ठराव वाचलेला आहे त्याच्यामध्ये त्यांचे म्हणणे असे आहे की हा लोकांच्या अभिप्रेत जवळचा विषय असल्या कारणाने महासभेमध्ये ती चर्चा करण्यात यावी असा निला मॅडमने ठराव केलेला आहे. त्यामुळे क्लब करणार तर कशा पध्दतीने तुम्ही करणार.

गिता जैन :-

माझा ठराव तुम्ही ऐकला नाही. मी तेच सांगितले आहे पुढच्या महासभेला हा विषय परत घ्यावा. मी लिहीलेला आहे पुढची महासभेत हा विषय आणावा.

मा. उपमहापौर :-

ओके जैन मॅडम.

गिता जैन :-

मॅडम, मला वारंवार म्युट करण्यात येते. म्हणून माझ्या इथे ते पुर्ण पोहतच नाही. मी सांगितले आहे की परिवहन समिती आपण का फॉम केली आहे जर गटनेता आणि त्यांनी निर्णय घ्यायचा आहे तर परिवहन समिती आपण फॉम केली आहे त्यांना आपण इन्व्हॉल का करत नाही. म्हणजे ही सगळी चर्चा पुढच्या महासभेला घ्यायचे ते बोलायच्या आधी मला म्युट केले गेले. मी करणार काय/

निलम ढवण :-

क्लब नाही करायचा पण त्याच्यावर नक्की काय ते धोरण ठरवूदेत.

मा. महापौर :-

सचिव साहेब आता ठराव किती आले आहेत?

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम मी स्पष्टिकरण देतो ठराव टोटल तीन आलेले आहेत. एक सदस्य गिता जैन मॅडम, दुसरा निला सोंस मॅडम, आणि तिसरा आपले ध्रुवकिशोर पाटील पण खासबाब याच्यामध्ये महापौर मॅडम असे आहे की जैन मॅडम आणि सोंस मॅडम ह्या दोघांचा ठराव एकच आहे म्हणजे पुढच्या महासभेत फेर सादर करावा असे आहे. आणि प्लस त्या दोघांनी सांगितले आहे की ते एकत्र करा म्हणून चालेल. त्या ठरावासाठी महापौर मॅडम तुम्ही रुलींग द्या की याच्यावर मतदान करण्यात यावे.

मा. महापौर :-

निला सोंस मॅडमचा ठराव आहे आणि ध्रुवकिशोर पाटील यांचा ठराव हे मतदानाला टाका.

रिटा शहा :-

मॅडम तीन ठराव आहेत.

निलम ढवण :-

तीन नाहीत गिता जैन मॅडम आणि निला सोंस मॅडमचे त्यांनी मर्च करायला सांगितले आहे. त्यामुळे दोन ठरावावरच मतदान होईल.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम मला एक सांगा हा मर्च करायला कोणी कोणाला सांगितले? महापौरांना सांगायचे असते ना की आपआपसात मर्च करुन घेतला ठराव.

निलम ढवण :-

महापौरांनाच सांगितले सभागृहनेते.

मा. महापौर :-

सभागृहनेते गिता जैन मॅडम बोलून गेल्या की मी केलेला ठराव आणि निला सोंस मॅडमचा ठराव एकच आहे. त्या बोलल्या आणि गेल्या.

निलम ढवण :-

सभागृहनेते जरा व्यवस्थित ऐका. तुम्ही ऐवढे हायपर कसे होतात तुमची आम्हाला काळजी आहे. थोडे जरा ऐका आणि नंतर बोला.

प्रशांत दळवी :-

ज्यांनी ठरवा वाचलेत त्यांना बोलू द्या प्लिज.

गिता जैन :-

मॅडम, सॉरी मला दोन मिनिटे खुप अर्जंट काम होते मला जावे लागले. सॉरी मॅडम, पण मी माझा ठराव मांडते आणि मला वाटते शिवसेना तर्फे विरोधी पक्षनेत्यांनी मला सांगितले आहे की ते अनुमोदन देत आहेत आता माझा ठराव तुम्ही मांडून घ्या आणि मतदानाला ठेवा.

प्रशांत दळवी :-

निलम ताई ऐका.

निलम ढवण :-

गिता जैन मॅडम आपणच तो मर्च करायला सांगितला होता.

मा. महापौर :-

तुम्ही टाईम घालवू नका गिता मॅडमचा ठराव आहे. निला सोंस मॅडमचा पण ठरवा आहे आणि ध्रुवकिशोर पाटील यांना पण ठराव आहे.

गिता जैन :-

माझा ठरावाला हे करुन घ्या.

मा. महापौर :-

आता परत ते असे म्हणत आहेत की माझा ठराव आहे.

गिता जैन :-

शिवसेना तर्फे काय आहे ते मला सांगा.

मा. महापौर :-

अरे बाबा तुम्ही एकच आहात ना.

गिता जैन :-

ते तुम्ही मान्य करत नाहीत.

मा. महापौर :-

कोण मानत नाही?

गिता जैन :-

तुम्ही.

मा. महापौर :-

आम्ही कसे माणत नाही तुम्ही बोला इथे तुम्ही सभागृहात बोला की मी कुठल्या पक्षाची आहे तुम्ही बोला मी आजपासुन माणते.

गिता जैन :-

एका बाजुला मला तुम्ही लेटर दिले नाही तुम्ही मला गट मधुन काढत नाही. गटनेत्यांना सांगा लेटर द्यायला सांगा.

मा. महापौर :-

तुम्ही ठरवायला पाहिजेना.

गिता जैन :-

मी ठरवले पण मला गटनेत्यांनी लेटर दिले आहे की तुम्हाला काढण्यात येत आहे मग तुम्ही गट मधुन काढतही नाही. काय गोची झाली आहे माझी.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्या गिता जैन मॅडम आणि निला सोंस मॅडम ह्या दोन्ही सदस्यांना मी विनंती करते जर तुमचा दोघांचा ठराव एकच असेल तर तुम्ही मर्च करा. कारण तीन ठरावावर आपण मतदान कसे घेणार.

गिता जैन :-

मॅडम दोन मिनिटे द्या.

मा. महापौर :-

ठराव तीन आहेत सचिव साहेब आपण मतदानाची प्रक्रिया सुरु करा. कशी करता येईल ते तुम्ही तुमच्या पध्दतीने करा.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ७ करीता तीन ठराव प्राप्त आलेले आहेत. पहिला ठराव आहे सुचक ध्रुवकिशोर पाटील............

गिता जैन :-

महापौर मॅडम मला एकतर तुम्ही वारंवार मला म्युट करतात मी काय करणार.

मा. महापौर :-

सकाळ पासुन तुम्हीच तर बोलताय.

गिता जैन :-

ऐन वेळी तुम्ही मला म्युट करतात.

मा. महापौर :-

तुम्ही खरच सांगा तुम्ही मनावरती हाथ ठेवून सांगा की सकाळ पासुन कोण बोलत आहे आणि तुम्ही म्हणता म्युट करत आहेत.

गिता जैन :-

मी मनावर हाथ ठेवून सांगते की ऐन वेळी म्युट केले जाते.

मा. महापौर :-

ऐन वेळी का आता मतदानची प्रक्रिया चालु आहे आता बोलायचे नाहीच आहे आता हाथ वर करायचा आहे. आता सचिव साहेब बोलतील.

गिता जैन :-

मॅडम तुमचा टेक्निकल प्रॉब्लेम मी दुर करते.

मा. महापौर :-

मॅडम मतदानाची प्रक्रिया होऊ देत. तुम्ही बघा लोकशाही आहे सगळ्यांना आपआपला अधिकार आहे ठराव करण्याचा आणि तो आपण इथे प्रत्येकाने तसा केला आहे.

गिता जैन :-

महापौर मॅडम माझा अधिकार मला वापरु द्या.

मा. महापौर :-

तुमचाच अधिकार तुम्ही वापरत आहेत तुम्ही ठराव केला आहेना. तुम्ही ठराव केला आहे त्याच्यावर मतदान प्रक्रिया होते. तीन ठराव माझ्याकडे आलेले आहेत. त्याच्यामुळे आता मतदान प्रक्रिया करतोय.

गिता जैन :-

मला माझा ठराव परत घ्यायचा आहे तर तुम्ही का ऐकत नाही?

मा. महापौर :-

मग घ्या.

गिता जैन :-

घेतला.

मा. महापौर :-

मी मगाच पासुन तुम्हाला सांगत आहे ग्यायचे नाही घ्यायचे.

गिता जैन :-

मी सांगितले तुम्ही मला दोन मिनिटे द्या मी तुम्हाला सांगते.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम हे काय आहे एकतर लोकशाही आहे त्याचा वापर करायचा लोकांच्या फायद्यासाठी करायचा मत टाकायचे ठराव करायचा परत पाठीमागे घ्यायचा हे काय चालले आहे महापौर मॅडम? सदस्यांची दिशाभुल लोकांची....................

गिता जैन :-

ओ उपमहापौर लोकांची दिशाभुल होत नाही. आमच्या आपसात जे काही ठरले तसे आम्ही करतो त्यात काय दिशाभूल होते?

मा. महापौर :-

मॅडम जेव्हा आपण इथे बोलतात त्यावेळेला ते गांभीर्याने बोलत जा की मला ठराव मांडायचा आहे. कारण नंतर आपल्याला असे होते की इथे ठराव तीन तीन आल्यावरती त्याच्यावरती मतदान प्रक्रिया करावी लागणार आहे. तुम्ही जे काही बोलतात जे काही करतात त्याच्यामध्ये थोडेसे जबाबदारीनेच बोला.

मा. उपमहापौर :-

आता हे बोलत आहेत की त्यांचे आपआपसामध्ये ठरले तर अगोदर बोलून घ्या.

गिता जैन :-

मला माहित नव्हते की बीजेपी वरुन दुसरा ठराव येणार म्हणून तुमच्या बीजेपी मधुन दोन दोन ठराव येणार हे माहित नव्हतेना. माझ्या बोलण्या नंतर हे ठराव आलेत.

मा. उपमहापौर :-

आला ठराव दोन आले की तीन आले तुम्ही जे पाठीमागे घेत आहेत की आमचे आपसामध्ये बोलणे झाले बोलाना तुम्हाला कोणी नाही सांगितले तुम्हाला तुम्ही बोलताय की ओ महापौर................

गिता जैन :-

ओ उपमहापौर साहेब मला असे वाटले की निला मॅडमने मांडलेला ठरावामध्ये माझे मत होते. मी माझा ठराव परत घेते त्यात काय प्रॉब्लेम आहे?

रिटा शहा :-

काय मजाक चालली आहे का बाकी लोकांना टाईम नाही हे बघत आहेत का?

गिता जैन :-

महापौर मॅडम ही महासभा आहे.

मा. महापौर :-

मला माहित आहे मॅडम महासभा आहे. तुम्ही बोलू नका.

गिता जैन :-

तुम्ही ते मला शिकवू नका हो.

मा. महापौर :-

तुम्ही जे बोलत आहेत याचा अर्थ असा नाही की मी सगळ्यांचे ऐकेन. ३ ठराव आधी बोललात नंतर बोलले मला दोन मिनिटे द्या ते दोन मिनिटात तुम्ही मागे घेत नाहीत म्हणून मी

म्हटले ३ ठरावा वरती मतदान प्रक्रिया करा. पण आता तुम्ही मागे घेताय ठिक आहे दोन ठरावा वरती मतदान प्रक्रिया होईल.

गिता जैन :-

चालेल करा.

मा. महापौर :-

दोन ठरावा वरती मतदान प्रक्रिया करा.

नगरसचिव :-

प्रकरण क्र.७ करीता तीन ठराव आलेले आहेत त्यापैकी एक ठराव गिता जैन यांनी मागे घेतलेला आहे त्याला पिठासीन अधिकारी यांनी मान्यता दिलेली आहे. पहिला ठराव आहे ध्रुवकिशोर पाटील सुचक यांनी मांडले आणि दुसरा ठराव आहे सुचक निला सोंस अनुमोदन विनोद म्हात्रे. प्रथम मी दुसरा ठराव मतदानासाठी पुकारतोय सुचक निला सोंस अनुमोदक विनोद म्हात्रे यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने ज्यांना मतदान करायचे आहे त्यांनी आपल्या गटनेत्या मार्फत कृपया आपले मतदान घोषीत करावे.

मा. उपमहापौर :-

मी हस्मुख गहलोत भारतीय जनता पक्षाचा गटनेता म्हणून निला सोंस यांनी जो ठराव मांडलेला आहे त्यावर माझा विरोध आहे. आणि ध्रुवकिशोर पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने मत देत आहे.

निलम ढवण :-

महापौर मॅडम, विषय क्र.७ याच्यावर जे २ ठराव झाले आहेत त्यामध्ये आमच्या मताशी जो दुसरा ठराव झाला आहे निला सोंस मॅडमने जो ठराव केलेले आहे त्या मताशी आमचे सन्मा. नगरसेवक शिवसेनेच्या वतीने त्या ठरावाला आम्ही सपोर्ट करत आहोत.

जुबेर इनामदार :-

काँग्रेस लोकशाही आघाडी ह्या विषयावर तटस्थ असणार.

नगरसचिव :-

दोन्ही विषयावर का?

जुबेर इनामदार :-

हो.

नगरसचिव :-

ठिक आहे ह्याच्या व्यतिरिक्त कोणाला आपले मतदान द्यायचे असेल तर कृपया सांगायचे आहे.

गिता जैन :-

महापौर मॅडम जरा बी.जे.पी. च्या दोन ठरावामध्ये निला सोंसच्या ठरावाच्या बाजुने बी.जे.पी. चे किती आणि ध्रुवकिशोरजीच्या ठरावाच्या बाजुने किती याची माहिती द्याला का?

मा. उपमहापौर :-

मॅडम किती इच्छुक आहेत. मन फिर भी हिंदुस्थानी.

गिता जैन :-

अरे बाबा इच्छुक की बात क्या है यहा तो मेरा अधिकार हैना मतदान का............

मा. उपमहापौर :-

मॅडम मैने वो नही कहा फिर भी दिल है हिंदुस्तानी.

गिता जैन :-

उपमहापौर साहेब दिल तो हमेशा हिंदुस्तानी रहेगा

मा. उपमहापौर :-

मॅडम मैने वही कहा फिर भी दिल है हिंदुस्तानी.

नगरसचिव :-

अन्य कोणालाही आपले मतदान सांगायचे असेल तर कृपया सांगायचे आहे. एकदा नोंद घेतल्या नंतर पुन्हा मतदान घेता येणार नाही. अश्विन कासोदरीया यांचे मतदान कोणाच्या बाजुने आहे?

अश्विन कासोदरीया :-

माझे निला सोंस मॅडम यांच्या बाजुने आहे.

गिता जैन :-

माझे निला सोंस यांच्या बाजुने आहे.

मा. महापौर :-

रवी व्यास काही बोलत आहेत का?

रवी व्यास :-

महापौर मॅडम, इंडीव्हयुजल मतदान घ्या. याच्यामध्ये निला सोंसचा ठरावाला आमचे बरेचशे नगरसेवक समर्थन देत आहेत. आमचे मतदान तिथे नोंदणी झाली पाहिजे.

मा. महापौर :-

ठिक आहे.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम अॅस गटनेता ज्याला सचिव महोदयांनी ऑलरेडी सांगितलेले आहे कोणाला ह्या विषयावर मतदान करायचे असेल व्यक्ती विशेष किंवा बाजुने किंवा विरोधाने तर आपले हाथ वर करुन त्यांना अनम्युट करुन घ्यावे विषय संपला.

रवि व्यास :-

सचिव साहेब तुम्ही सर्वांचे इंडव्हयुजल वोटींग घ्या.

मा. उपमहापौर :-

आपली जी प्रथा आहे महापौर मॅडम त्या प्रथेचा अनुसार प्रत्येक गटनेते............

रवि व्यास :-

माझे मत निला सोंस यांच्या ठरावाला आहे.

मा. उपमहापौर :-

प्रत्येक गटनेते बोलतात आणि त्याऐवजी प्रत्येकाला संधी देण्यात येते की त्या बाजुने किंवा विरोधाने मतदान करायचे असेल तर आपण मांडू शकतात किंवा देऊ शकतात. आता सचिव महोदयांनी ऑलरेडी त्याबद्दल प्रत्येक सदस्यांना हे निवेदन केलेले आहे की जो ठराव मांडलेला आहे त्या ठरावा बद्दल कोणाला आपले मतदान बाजुने किंवा विरोधात करायचे असेल ते बोलू शकतात. आता सचिव महोदयांनी सांगितले विरोधात आहेत तर ते बोला आणि बाजुने म्हणजे निला सोंस बाजुने जे जे ठरावाच्या बाजुने जे मतदान करु इच्छुक आहेत त्यांनी सचिव महोदयांना सांगावे. नविन प्रथा मॅडम लागु नये.

रवि व्यास :-

महापौर मॅडम मग हे आम्हाला सांगा तरी किती लोक ऑनलाईन आहेत आणि किती लोकांनी कोणाला मत दिलेली आहेत? आम्हाला कळत नाही कोण कोणाला मतदान करतोय. कंफ्युझन कशाला.

मा. महापौर :-

स्क्रीन वरती दिसत आहे बघा.

रवि व्यास :-

आमचे जे सगळे लोक आहेत त्यांना अनम्युट कराना.

रवि व्यास :-

सचिव साहेबांना तर बोलू द्या मतदानाची कशी काय प्रक्रिया घ्यायची. महापौर मॅडम सचिव साहेबांनी सांगावे मतदानाची प्रक्रिया कशी घेऊ शकतात.

मा. उपमहापौर :-

सचिव महोदय बोला.

नगरसचिव :-

सन्मा. सदस्यांना सुचित करण्यात येत आहे कृपया आपण जेव्हा प्रत्यक्षात सभागृहात मतदान घेतो तेव्हा व्यक्ती विशेष प्रत्येकाचे आपण मतदानाची नोंद आपण घेत असतो. प्रत्येकाला हाथ वर करायला सांगत असतो. त्या प्रमाणे आपण केलेल्या मतदानाची नोंद घेऊन त्यानुसार पिठासिन अधिकारी हा त्यांचा निर्णय घोषीत करतात. ऑनलाईन सभा ही आपण घेत असल्यामुळे आपण सगळ्यांचे जे मतदान आहे हे गटनेत्यांमार्फत घेतो. त्याव्यतिरिक्त पहिल्या महासभेत ही अडचण आली नाही गटनेत्यांच्या मार्फत मतदान घेताना परंतु दुसऱ्या महासभेत काही सदस्यांनी सांगितले की आम्हाला आमचे मत वेगळे आहे एकाच पक्षाच्या तर त्यामुळे आपण प्रत्येक वेळेस म्हणजे मी प्रत्येक महासभेमध्ये कुठल्याही ठरावा वरती मतदान जेव्हा घेत असतो आपण त्यावेळी गटनेत्यांनी त्यांच्या पक्षाच्या उपस्थित सदस्यांच्या वतीने त्यांचे मत दिल्या नंतर देखील मी प्रत्येक वेळी विचारणा करतो की अन्य कोणत्याही सदस्याचे वेगळे मत आहे का असे असेल तर आपण त्याची नोंद घेतो. आणि हे आतापर्यंत केले आहे. परंतु आता जे काही सदस्य आज ऑनलाईन ह्या ठिकाणी उपस्थित आहेत त्या प्रत्येक व्यक्तीला तुम्ही जसे आता सांगितले किंवा मागणी केली त्याप्रमाणे प्रत्येक व्यक्तीला प्रत्येक ठरावा वरती इंडीव्हयुजवली विचारुन त्याचे मत नोंदविणे हे थोडे दुरापास्त ठरणार आहे. त्यामुळे आपण असे काही तरी एक त्याच्यात निर्णय घेऊ शकतो की ह्यांना म्हणूनच मी ह्या पुर्वी देखील बोललो की ज्यांना आपले स्व:तचे वेगळे मत द्यायचे असेल किंवा वेगळे मत मांडायचे असेल म्हणजे गटनेत्यांनी मांडलेल्या ठरावाच्या व्यतीरिक्त काही मत द्यायचे असेल तर ते आपण इंडीव्हयुजवली सांगा आम्ही त्याप्रमाणे नोंद घेतो. जस मी आता विचारल्या प्रमाणे गिता जैन मॅडमने सांगितलेले आहे अश्विन कासोदरीया यांनी देखील सांगितले आहे त्यांचे जे मत असेल ते त्यांनी सांगितलेले आहे. तसे जे कोणी सदस्य आता ह्या ठिकाणी ऑनलाईन आहेत त्या सदस्यांनी त्यांचे मत व्यक्तीश: सांगावे. वेगळे असेल तर. अदर दॅन गटनेत्यांनी दिलेल्या मतदानाच्या.

रवि व्यास :-

सचिव साहेब मी निला सोंस मॅडमला मतदान करतोय. माझ्या मतदानाची नोंद घ्या. तसे तुम्ही प्रत्येकांचे घ्या.

नगरसचिव :-

ठिक आहे जे हाथ वर करत आहेत त्यांना आम्ही अनम्युट करुन त्यांना प्रत्यक्ष व्यक्तीश: विचारुन घेतो. प्रत्येकाने आपआपला व्हिडिओ ऑन ठेवायचा आहे. जे व्हिडियो ऑन ठेवणार नाहीत त्यांचे कुठलेही मत ह्याठिकाणी नोंद घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्या दक्षता घ्या. धंन्यवाद. जयेश भोईर

जयेश भोईर :-

निला सोंस यांच्या बाजुने मत आहे.

नगरसचिव :-

ओके दौलत गजरे साहेब बोला.

दौलत गजरे :-

माझे मत निला सोंस मॅडमच्या बाजुने आहे.

नगरसचिव :-

ओके.

हेमा बेलानी :-

मेरा मत निला सोंस के बाजु मै है ।

नगरसचिव :-

हेमा बेलानी मॅडम यांचे मत निला सोंस यांच्या बाजुने आहे. मदनसिंग जी बोला.

मदन सिंग :-

माझे मत निला सोंस यांच्या बाजुने आहे.

नगरसचिव :-

ठिक आहे.

गिता जैन :-

सचिव साहेब काँग्रेसच्या गटनेत्यांनी सांगितलेले आहे.

नगरसचिव :-

त्यांचा मला फोन आला मॅडम म्हणून मी त्यांना विचारत आहे. विजयराय आपण बोला.

विजयराय सिथन :-

निला सोंस के साथ ।

नगरसचिव :-

ओके. अजुन कोण आहेत.

सुशिल अग्रवाल :-

निला सोंस मॅडम के मत से मै सहमत हूॅ ।

नगरसचिव :-

ओके.

गिता जैन :-

मॉरस रॉड्रीक्स यांना अनम्युट करा.

नगरसचिव :-

ते दिसत नाही मॅडम.

गिता जैन :-

ते मला दिसत आहेत तुम्हाला का दिसत नाहीत. त्यांनी हाथ वर केला आहे. दिपाली मोकाशी मॅडम बोला.

दिपाली मोकाशी :-

सचिव साहेब माझे अनुमोदन आहे निला सोंस मॅडमच्या ठरावाला.

नगरसचिव :-

मॉरस रॉड्रीक्स साहेब बोला.

मॉरस रॉड्रीक्स :-

माझे मत निला सोंस यांच्या बाजुने आहे.

नगरसचिव :-

ठिक आहे. मला वाटते सर्वांच्या मताची नोंद घेतलेली आहे.

निलम ढवण :-

राहिदास काका राहिलेले आहेत.

पंकज पांडे :-

सचिव साहब मैरा मतदान निला सोंस मॅडम के ठराव के बाजु मै है ।

नगरसचिव :-

ठिक आहे. काका तुम्ही बोला.

रोहिदास पाटील :-

माझे मत निला सोंस यांच्या बाजुने आहे.

नगरसचिव :-

ओके. सर्वांच्या मतदानाची नोंद घेतलेली आहे.

निलम ढवण :-

वैती साहेब हाथ वर करत आहेत. वैती साहेबांना अनम्युट करा.

चंद्रकांत वैती :-

माझे समर्थन निला सोंस मॅडम यांच्या ठरावाला आहे. आणि रकवी मॅडमचे मत घ्या. विनोद म्हात्रे बाकी आहेत.

मा. उपमहापौर :-

विनोद म्हात्रे यांचे अनुमोदन झाले.

नगरसचिव :-

रकवी मॅडम बोला.

वैशाली रकवी :-

निला सोंस यांच्या बाजुने आहे.

नगरसचिव :-

ठिक आहे. सुरेश खंडेलवाल बोला. सगळ्यांची मतदानाची नोंद घेतलेली आहे.

गिता जैन :-

सचिव साहेब परशुराम म्हात्रे यांना मतदान द्यायचे आहे.

नगरसचिव :-

परशुराम म्हात्रे साहेब बोला.

परशुराम म्हात्रे :-

माझे मत निला सोंस मॅडमला आहे.

नगरसचिव :-

ठिक आहे.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम प्रत्येक अशा विषयांवर एक एक त्यांना अनम्युट करा सचिवांना त्या कॅल्यकुलेशन मध्ये फार वेळ जात आहे. चुकीचा निर्णय येणार. किंवा त्यांना संधी देण्यात यावी त्यांना वेळ देण्यात यावा. नाही तर जसे वैती साहेबांनी सांगितले पीपीई किट घालून तुम्ही बोलावे इक तर त्यांना संधी देण्यात यावी कमित कमी ते वेळेच्या हिशेबाने सगळ्यांना बोलु शकतात. नाहीतर पाठीमागे कोणी आवाज देणार आमचे झाले नाही मी बाकी राहीलो.

मा. महापौर :-

मग काय करायचे लंच टाईम घ्यायचा का?

मा. उपमहापौर :-

त्यांना वेळ देण्यात यावी. म्हणजे प्रत्येकांना शांतता वाटेल की माझे फोनवर बोलणे झाले की सुरेश खंडेलवाल साहेबांनी ७ ते ८ फोन केले ते लाईन वर नाहीत. पण त्यांचे मत घेण्यात आलेले आहे. पण समजा असे कोणी चुकुन राहीले परत ते आपल्यावर किंवा सचिवांवर आरोप लावू नयेत तर

माझे निवेदन आहे महापौर मॅडम की सचिव महोदयांना वेळ देण्यात यावा अन्यथा जी आपली प्रथा आहे त्या हिशेबाने करण्यात यावे.

निलम ढवण :-

महापौर मॅडम हा ठराव पुर्ण करुनच तुमचा काही ब्रेक घ्यायचा असेल तर घ्यावा ही आपल्याला विनंती आहे.

मा. महापौर :-

ठराव तर पुर्ण करणार. मतदानाची प्रक्रिया पुर्ण करणार. पण बाकीचे जे सदस्य आहेत ते अजुन ऑनलाईन आलेले नाहीत तुम्ही सगळ्यांना बोलवून घ्या मतदानासाठी.

निलम ढवण :-

आता आहेत तेवढ्यांनाच तुम्ही घ्या. तुम्ही बोलवायचे कशाला.

मा. महापौर :-

तुम्ही बोलवा.

निलम ढवण :-

महापौर मॅडम तुम्ही सगळ्यांना अनम्युटच करा एकावेळी. मग कशाला हा प्रश्न येईल.

मा. महापौर :-

मतदानासाठी तुम्हाला कमी पडत असतील त्यांना येऊ द्या ऑनलाईन.

निलम ढवण :-

कशाला एकदाच सगळ्यांना अनम्युट करुन टाका आणि लवकर मतदान घेऊन टाका.

मा. महापौर :-

लंच नंतर सचिव महोदय ही प्रक्रिया पुर्ण करावी.

निलम ढवण :-

सचिव साहेब ही प्रकिया पुर्ण करा. आमा ज्यांनी ज्यांनी ओटींग केले आहे त्यांचे घ्या आणि पुर्ण करुन टाका. लंच नंतर परत कोणाला ऑनलाईन घ्यायला नको.

नगरसचिव :-

काऊंटींग अजुनही घेत आहोत. आणि महापौर मॅडमने सांगितले की आपण लंच नंतर घेऊया म्हणून. आणि ते घोषीत करुन जागेवरुन उठल्या आहेत.

निलम ढवण :-

त्यांनी जसे सांगितले आहे तसे त्यांना बोलवायचे आहे का? जे अनउपस्थित आहेत त्यांना?

नगरसचिव :-

आता महापौर मॅडम पीठासिन अधिकारी येतील तेव्हा उत्तर देतील.

निलम ढवण :-

परंतु सर मगाशीच सांगितले मॅडमने ही प्रक्रिया पुर्ण करुनच ब्रेक घेणार म्हणून.

गिता जैन :-

सचिव साहेब अजुन मतदानाची प्रक्रिया पुर्ण झाली नाही आणि पीठासिन अधिकारी आपली जागा सोडू कशी शकणार. सचिव साहेब मतदानाच्या प्रक्रिये आधी पीठासिन अधिकारी जागा कशी सोडू शकतात?

नगरसचिव :-

पीठासिन अधिकाऱ्यांचा निर्णय आहे त्या उठून गेलेल्या आहेत. त्यांनी सांगितले नोंद तुम्ही घ्या. नोंद घेऊन नंतर निर्णय देवू.

निलम ढवण :-

सचिव साहेब पण त्यांनी निर्णय दिला होता, आयुक्त साहेब तुम्ही थांबा ही प्रक्रिया पुर्ण होऊ देत. आयुक्त साहेब तुम्ही थांबा ही विनंती आहे. आणि सचिव साहेब तुम्हाला ही प्रक्रिया पुर्ण करायला सांगितलेले आहे. तुम्ही आतापर्यंत झालेल्या मतदाना नुसार प्रक्रिया पुर्ण करावी.

नगरसचिव :-

मतदानाची नोंद आपण मॅडम घेतच आहोत. प्रत्येकाला विचारत आहोत. मी प्रक्रिया करतोच आहे मी कुठे थांबलेलो आहे.

निलम ढवण :-

सचिव साहेब जेवढे आता झालेली आहे तेवढी घ्या. कारण मॅडम पण म्हणाल्या ही प्रक्रिया पुर्ण करुनच आम्ही ब्रेक देणार आहोत. तर त्यानुसार आतापर्यंत झालेल्याची नोंद आम्हाला सांगा.

प्रविण पाटील :-

सचिव साहेब ही कुठली पध्दत आहे? ही कुठली पध्दत आहे सभेची मतदान प्रक्रिया चालु असताना तुम्ही अर्धवट निघुन जातात.

निलम ढवण :-

पण काऊंटींग तरी सांगा.

प्रविण पाटील :-

सभागृहनेता ही कुठली पध्दत आहे? अर्धवट मतदान सोडून सगळे उठून गेले ही कुठली पध्दत आहे. सभा चालवता येत नसेल तर तुम्ही नका चालवू. मतदान चालु असताना आपण बाहेरच्या सदस्यांना आपण आतमध्ये घेत नाही आणि मतदान प्रक्रिया चालु असताना तुम्ही सगळे उठून जातात ही पध्दत कुठली आहे?

निलम ढवण :-

प्रशासनाचे हे कुठचे प्रकार आहेत, कामकाजाची कुठची पध्दत आहे?

प्रविण पाटील :-

सभागृहनेता तुम्ही सभा चालविण्यासाठी सक्षम नाहीत असे मान्य करा. असे जाहिर करा आम्ही सभा चालविण्यासाठी सक्षम नाही आहोत.

निलम ढवण :-

विरोधी पक्षनेते आता एक ठराव परत जर सभा चालु तर हा कामकाजाचा कुठचा प्रकार आहे त्यांची कुठचेही डिक्लरेशन दिलेले नाही आणि सभा बंद केली आहे.

प्रविण पाटील :-

जेव्हा मतदानाची प्रक्रिया चालु असताना सगळे सदस्य पीठासिन अधिकारी सहीत उठून जातात ही पध्दत कुठली आहे?

निलम ढवण :-

अपयशाला घाबरुन जात आहेत.

प्रविण पाटील :-

ते लपणार नाही ते बाहेर निघणार आहे.

मा. महापौर :-

मी सर्वांना संधी दिली होती की मतदानाच्या प्रक्रियेला आपण हजर हरा. कोणी पळून वगैरे गेले नाही. मी काय म्हटले मतदानाचा प्रक्रियेला सर्वजण हजर हरा असे म्हणून मी बोलून गेली. सचिव साहेब काय चालले आहे?

नगरसचिव :-

मॅडम एक एकाची नोंद घेत आहोत. काही लोकांचे मला इथे फोन येत आहेत तिथे त्यांचा फोनचा काही प्रोब्लेम असल्यामुळे ते मला वैयक्तिक फोन करत आहेत.

मा. महापौर :-

मी मगाशी हेच सांगुन गेली होती मतदानाची प्रक्रियेला कोणाला कोणाला यायचे आहे त्यांनी येऊ देत मग मी गेली मग काय बोंबाबोंब चालु होती?

नगरसचिव :-

मी त्यांना तेच सांगितले मतदानाची प्रक्रिया चालु आहे. आता मला त्यांचे फोन येत आहेत ते फोन अटेंड करत आहे.

मा. महापौर :-

करा फोन अटेंड करा. आता अशाच पध्दतीने चालणार आहे.

प्रविण पाटील :-

महापौर ही महासभा आहे. महासभेमध्ये आपण पीठासिन अधिकारी आहात. सचिव साहेब बसले आहेत मतदान प्रक्रिया चालु असताना पीठासिन अख्खे खाली होत आहे मॅडम ही कुठली पध्दत आहे? मतदान प्रक्रिया तुम्ही कायद्यात बघा चालु असताना आपण एखादा सदस्य जर बाहेर गेला असेल तर त्याला आपण आतमध्ये घेऊन शकत नाही सभागृहामध्ये मतदान प्रक्रिया सुरु असताना. मॅडम जर मतदान प्रक्रिया चालु असेल ठराव कोणी किती केला असेल जे येतील ते कायद्याप्रमाणे जे सचिवाकडे नोंद आहे माणतो ऑनलाईन असल्यामुळे काही डिस्टपन येते पण ही कुठली पध्दत आहे पीठासिन अधिकारी सगळे पीठासन सोडून यायचे? सचिव नाही येणार आम्ही ऑनलाईन आहोत.

मा. महापौर :-

ऐका सचिवांना फोन वर फोन येत आहेत की आम्हाला मतदान करायचे आहे मी म्हटले जे आहेत त्यांना बोलवून घ्या तोपर्यंत जावू नाही शकत का?

प्रविण पाटील :-

ते बाहेर उठून जातात. आयुक्त पण आणि तुम्ही पण.

मा.महापौर :-

ठराव करणारे पण उठून गेले होते ना. त्यांना विचारा. ठराव करणारे का उठून गेले.

प्रविण पाटील :-

सुचना तर द्यायला पाहिजे. आम्हाला काहीच मेसेज नाही. जेवणाची सुट्टी झाली आहे अर्धवट मतदान सोडून............

मा. महापौर :-

मी सांगुण गेली मतदानाच्या प्रक्रियेला जे सदस्य इच्छुक आहेत त्यांना बोलवून घ्या. ते त्यांना फोन करत आहेत.

प्रविण पाटील :-

मॅडम बघा ह्या सभाशास्त्रा प्रमाणे ह्या सभागृहाचे कामकाज चालु व्हायला पाहिजे.

मा. महापौर :-

सभाशास्त्रा प्रमाणेच कामकाज सुरु आहे.

प्रविण पाटील :-

महासभेचा महत्वाचा भाग आहे मतदान.

मा. महापौर :-

महासभेच्या सभा कामकाजा प्रमाणेच चालु आहे.

प्रविण पाटील :-

सभा कामकाज सभाशास्त्रा प्रमाणे होत नसेल तर हे चुकीचे आहे महापौर मॅडम.

मा. महापौर :-

अजिबात नाही मी सांगुण गेली होती.

प्रविण पाटील :-

आख्ख सभागृह खाली होत आहे. आज किती दिवस झाले आपण ऑनलाईन सभा घेतो आजपर्यंत त्यांना सभेचे मतदान कसे घ्यायचे ती पध्दत ठरवली नाही.

मा. महापौर :-

तुम्ही ठरवली होतीना गटनेत्यांनी सांगायचे.

गिता जैन :-

महासभेचा अधिकार आहे आपआपले मत मांडायचे असते.

प्रविण पाटील :-

मॅडम, ज्यांना मतदान करायचे आहे त्यांचे अजुन अनम्युट होत नाही.

मा. महापौर :-

हा टेक्निकल प्रॉब्लेम आहे.

प्रविण पाटील :-

मग सभा सोडून जायचे?

मा. महापौर :-

मी सोडून गेलो नाही हो.

गिता जैन :-

मॅडम तुम्ही खुर्ची सोडलेली.

प्रविण पाटील :-

तुम्ही गेले नंतर सचिव गेले आयुक्त साहेब गेले अख्खे सभागृह खाली झाले. ही कुठली पध्दत आहे? मतदानाची प्रक्रिया चालु आहे मॅडम. हा सभागृहाचा महत्वाचा भाग आहे.

मा. महापौर :-

मी सचिवांना सांगुण गेली. मी सांगुण गेली की त्यांना बोलवून घ्या.

प्रविण पाटील :-

सचिवही गेले मॅडम. त्यांची जबाबदारी होती.

मा. महापौर :-

तुम्ही सगळे जण कशाला गेले?

नगरसचिव :-

मी कुठे गेलो मी इथेच आहे.

मा. महापौर :-

सचिव कुठे गेले सचिव इथेच आहेत.

प्रविण पाटील :-

मॅडम गेलेले काय खोटे बोलत आहेत एकाही खुर्चीवर कोणीच नव्हते.

मा. महापौर :-

आता मी गेल्यावर मला काय माहिती कोण गेले कोण नाही गेले.

गिता जैन :-

महापौर मॅडम तुम्ही ह्या सभागृहाला जबाबदार आहात. ह्या महासभेची जबाबदारी तुमच्यावर आहे.

मा. महापौर :-

मी सांगुण गेली.

गिता जैन :-

मॅडम मतदान असताना मतदान चालु असताना जावू शकत नाही. सांगुणही जावू शकत नाही. आपली प्रक्रिया चालु झाली. मत देणे चालु झाले.

मा. महापौर :-

सचिव साहेब मतदान किती झालेले आहे ते जाहिर करा. मतदानाची प्रक्रिया पुर्ण झालेली आहे का?

नगरसचिव :-

बाकी आहे.

मा. महापौर :-

अजुन मतदानाची प्रक्रिया पुर्ण झालेली नाही.

प्रविण पाटील :-

सचिव साहेब ऑनलाईन किती सदस्य आहेत?

नगरसचिव :-

मला पाच मिनिटाने सांगता येईल मला आता सांगता येणार नाही.

प्रविण पाटील :-

ऑनलाईन सदस्य पण सांगु शकत नाही?

नगरसचिव :-

ते ऑनलाईन सदस्य तुम्हाला पण तिथे दिसत आहेत साहेब.

प्रविण पाटील :-

पार्टीसिपेट किती आहेत प्रत्येकाला विचारा. तुम्हाला नेमके काय करायचे आहे. ह्या मतदानामध्ये काय जबरदस्ती मतदान करायचे आहे का? करा नको करा असा तुमचा उद्देश आहे का?

नगरसचिव :-

जबरदस्तीचा विषय कुठे आहे साहेब. तुम्हीच सांगत आहेत की ह्यांना सांगायला सांगा ह्यांना फोन करायला सांगा.

प्रविण पाटील :-

जेव्हा आजचे हे मतदान तुम्हाला माहिती आहे की कशा प्रकारे होत आहे. महापौर मॅडम मगाशी बोलता बोलता बोलून गेले ह्यापुढे असेच चालेल. हे जर असेच चालू असताना जर प्रत्येक सदस्याला स्वतंत्र मतदान घ्यायचे असेल तर त्यांना इंडीव्हयुजल विचारा. दहा मिनिटे अजुन जातील. त्याच्यात काय फरक पडत नाही.

नगरसचिव :-

तेच चालु आहे. इंडीव्हयुजल विचारतोय. प्रत्येकाला विचारतोय ज्यांचे हाथ वर आहेत त्यांना विचारतोय. आणि ज्यांचे फोन येत आहेत त्यांनाही विचारतोय.

मा. महापौर :-

तेच चालु आहे.

प्रविण पाटील :-

ठिक आहे पाच मिनिटे घ्या पण स्वतंत्र प्रत्येकांचे मतदान त्यांचे हक्का मारु नका.

नगरसचिव :-

कोणाचा हक्क मारायचा विषय इथे नाही साहेब. तुम्हाला तुमच्या मोबाईलवर पण दिसत आहे किती पार्टीसिपेंट आहेत.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम ज्या पध्दतीने मी सभागृह सोडून गेलो.

मा. महापौर :-

पण तुमच्या मताची नोंद झालेली आहेना.

जुबेर इनामदार :-

हो पण सभागृह सोडून तसे जावू शकत नाही. तुम्ही गेले तरी उपमहापौरला त्या जागी बसवायला पाहिजे. अशी भुमिका तुम्ही घेऊ शकत नाही. याची नोंद घ्यावी.

मा. महापौर :-

ठिक आहे याच्यापुढे मी नोंद घेईन. मतदानाच्या प्रक्रियेतुन यापुढे मी जाणार नाही याची मी पुर्ण पणे नोंद घेईन.

प्रविण पाटील :-

सन्मा. सभागृहनेते सचिवांना जरा विचारा किती वेळ लागेल?

प्रशांत दळवी :-

ते महापौर मॅडम सांगतील.

प्रविण पाटील :-

साहेब तुम्ही सभागृह नेते आहात सभागृहाचे कामकाज कसे चालायला पाहिजे किती वेळ चालायला पाहिजे इथे सन्मा. सदस्य उपस्थित आहेत त्यांना कळूद्या सभागृहाचे कामकाज कसे चालते किती वेळ लागेल.

प्रशांत दळवी :-

सचिवांना वेळ दिला आहे तुम्ही पाच मिनिटे तुम्ही थांबा.

प्रविण पाटील :-

तुमच्या माध्यमातुन जावू देत प्रॉपर ती प्रोसिजर आहे. सभागृहनेत्यांनी ती सगळी माहिती सभागृहाला दिली पाहिजे. आता ऑनलाईन मतदान चालु आहे, मतदाना नंतर किती वेळाने मतदान घ्यायचे, ते डिक्लेअर किती वेळाने करायचे कारण वेळ महत्वाची आहे.

प्रशांत दळवी :-

ज्यांनी ठराव केला आहे ते काही बोलत नाहीत. तुम्ही एवढे का गरम होत आहेत.

प्रविण पाटील :-

आम्ही सन्मा. सदस्य आहोत ह्या सभागृहाचे आणि तुम्ही सन्मा. सभागृहनेते आहात. किती वेळ लागेल जरा आम्हाला सांगा. सगळ्या सदस्यांच्या माध्यमातुन तुम्हाला हा प्रश्न विचारतोय.

प्रशांत दळवी :-

तुम्ही सन्मा. विरोधी पक्षनेते आहेत आम्ही तुमचा मान राखला आहे.

प्रविण पाटील :-

आमच्या प्रश्नाचे जरा उत्तर द्या किती वेळ लागु शकतो ह्या मतदान प्रक्रियेला. मला वाटते ह्या मिरा भाईंदर मधल्या ह्या इतिहासातील ही पहिली अशी घटना असेल की मतदान झाल्या नंतर मतदान डिक्लेर करायला एवढा वेळ लागला.

प्रशांत दळवी :-

ऑनलाईन असल्यामुळे हे होते.

मा. महापौर :-

सचिव साहेब याचे उत्तर आपण द्यावे. ही मतदानाची प्रक्रिया जी आहे ही पारदर्शक आणि चांगल्या पध्दतीने झाली पाहिजे. मगाशी उठून गेली त्याला कारण वेगळे होते पण त्या टाईमाला उपमहापौरांना पीठासिन अधिकारी म्हणून बसवायला पाहिजे होते. परंतु तेही उठून गेले माझा मागे

तुम्ही सगळेच उठून गेले हे मला माहिती नव्हते. परंतु आता जी आपली प्रक्रिया सुरु आहे ती पारदर्शक असावी आणि लवकरच रिझल्ट जाहिर काय आहे तो.

नगरसचिव :-

प्रक्रिया पुर्ण पणे पारदर्शक आहे मॅडम. विरोधी पक्षनेत्यांनी सुध्दा आपल्याला सांगितले दोन मिनिटा पुर्वी की सचिवांनी पाहिजे तर अजुन पाच मिनिटे घ्यावीत.

प्रविण पाटील :-

त्याच्या नंतर १५ मिनिटे झाली.

नगरसचिव :-

१५ मिनिटे नाही झाली साहेब पाच मिनिटे झाली.

प्रविण पाटील :-

हे सांगुन १५ मिनिटे झाली.

निलम ढवण :-

ओटींग झाली असेल तर मग आता इतका वेळ का थांबले आहेत?

प्रविण पाटील :-

कोणी येत आहे का?

नगरसचिव :-

काऊंट करायला पाहिजे की नको? एक व्यक्ती मोजायचा म्हणून वेळ लागेल.

प्रविण पाटील :-

साधा विषय आहे जेवढे सदस्य ऑनलाईन आहेत त्यांचा हाथ वर असेल त्यांना तुम्ही मतदान विचारा. अजुन तुम्हाला कशाला वेळ लागत आहे?

नगरसचिव :-

तेच तर आहे मगाच पासुन तुमचे पण किती लोक आहेत इथे स्क्रीनवर व्हीडिओ वर माणसे दिसत नाहीत.

प्रविण पाटील :-

आमचा विषय नाही आमच्या गटनेत्यांनी सांगितले आहे.

नगरसचिव :-

ज्यांचे हाथ वर नाहीत ते मला फोन करतात. ज्यांचे आहेत वर दिसत नाहीत ते मला फोन करतात. आता अश्विन कासोदरीयां ऑनलाईन नाही परंतु माझे मत तिथे आहे म्हणून माझी नोंद घ्या म्हणून.

प्रविण पाटील :-

सचिव साहेब तुम्ही निपक्षपाती प्रमाणे काम करा.

नगरसचिव :-

हंडरेड परसेंट. निपक्षपातीच मी करत आहे साहेब.

प्रविण पाटील :-

ओके जेवढे सदस्य आहेत त्यांचे मतदान घ्या.

मा. महापौर :-

यापुढे मी सचिव साहेबांना सुचना दिलेली आहे.

प्रविण पाटील :-

बऱ्याच सदस्यांना तुम्ही अनम्युट केले आहे ते स्व:त आम्हाला फोन करुन सांगतात की निला सोंस मॅडमला प्लिज त्यांचया ठराव आहे त्यांना काहीतरी बोलायचे आहे त्यांना थोडे दोन मिनिटे अनम्युट करा जर वेळे असेल तर.

मा. महापौर :-

सर्वांनी निट ऐका सचिव साहेब आताच्या ह्या प्रक्रियेमध्ये काय गोंधळ झाला आहे तो सांगा.

प्रविण पाटील :-

महापौर मॅडम ज्यांनी ठराव मांडला आहे निला सौंस मॅडम त्यांना अनम्युट करा त्यांना काही ठरावा बद्दल सांगायचे आहे.

मा. महापौर :-

पंरतु आता ठराव झालाना.

प्रविण पाटील :-

त्यांना जास्त बोलायचे नाही त्या सदस्या आहेत.

मा. उपमहापौर :-

अरे बाबा ठराव मांडलेला आहे. मतदान होऊ द्या. आता मतदान प्रक्रिया होत आहे.

प्रविण पाटील :-

वेळ आहे तर सदस्यांना बोलू द्या. त्याच्या बद्दल त्यांचे मत वेगळे असेल तर ठरावा बद्दल.

मा. महापौर :-

ठराव मागे घ्यायचा आहे?

प्रविण पाटील :-

ठरावा बद्दल त्यांची सुचना असेल तर काय. ठरावा बद्दल त्यांची सुचना असु शकते. तुम्ही ठरावा नंतर एवढा वेळ घेऊ शकता मतदानाचा तर सदस्यांना म्हणणे मांडू नाही शकतो.

प्रशांत दळवी :-

तुम्ही मधी कसे बोलता हो महापौर मॅडम सचिवांशी चर्चा करत असताना का बोलत आहात.

मा. महापौर :-

मतदानाची प्रक्रिया झाल्या वरती निला सौंस मॅडमला जे बोलायचे आहे ते बोलू शकतात.

प्रविण पाटील :-

त्या सदस्या आहेत. एवढा वेळ तर तुम्ही घेत आहेत. मॅडम ही चुकीची पध्दत आहे.

मा. उपमहापौर :-

विरोधी पक्षनेते महापौरांनी सांगितले परत परत तुम्ही का बोलत आहेत. महापौरांनी परवानगी दिलेली आहे.

प्रविण पाटील :-

महापौर मॅडम एखाद्या सदस्याला बोलायचे असेल तर बोलू देऊ शकतो.

मा. महापौर :-

एखाद्याला नाही ते ठराव मांडणारे सदस्या आहेत. त्याच्यावरती प्रक्रिया सुरु आहे. मतदान सुरु आहे. मगाशी मी गेली तेव्हा तुम्ही गोंघाट घातला.

प्रविण पाटील :-

गोघाट नाही त्या सभागृहाच्या विरोधात काम झाले म्हणून बोललो गोंघाट नाही घातला.

मा. महापौर :-

मला काय वाटले की उपमहापौर साहेब बसतील तर मला माहित नाही की माझा मागे सगळेच उठून गेले.

प्रविण पाटील :-

मॅडम सभा चालु असताना तो सभाशास्त्रा प्रमाणे पीठासिन अधिकारी पर्यायी द्यायला पाहिजेना कोणी तरी? इथे तर सचिव पण गायब, कमिश्नर पण गायब अख्खा सभागृह खाली होते

कोणीच नव्हते. आणि सभा चालु आहे. विशेष त्यामध्ये मतदान प्रक्रिया चालु आहे. हे चुकीचे आहे हे तुम्हाला मान्य करावे लागेल.

दिनेश जैन :-

मॅडम मतदानाची प्रक्रिया सुरु करा.

निलम ढवण :-

महापौर मॅडम डिक्लेर करुन मोकळे व्हा. काय तिच तिच चर्चा करुन सभागृहाचा वेळ घालवताय.

मा. उपमहापौर :-

ढवण मॅडम आम्ही चर्चा करत नाही आम्ही मार्गदर्शन करतोय तुमच्यामुळे. आणि तुम्हाला समाधान व्हावे प्रत्येक सदस्याला समाधान व्हावे म्हणून सचिव महोदय तुमच्यासाठी प्रक्रिया चालु केलेली आहे आणि आता संपवत आहेत.

निलम ढवण :-

आम्ही पण तेच म्हणत आहेत संपवा.

मा. महापौर :-

तुमचे आणि माझे काम आहे की त्यांना सहभागी करुन त्यांना सहाय्यता करावी आणि आपले प्रत्येक सदस्यांचे समाधान त्यांना भेटावे.

निलम ढवण :-

उपमहापौर साहेब, महापौर मॅडम, असे आता किती संध्याकाळ पर्यंत फोनच घेत राहणार का एक काही तरी लिमीट असते.

मा. उपमहापौर :-

शंभर ट्क्के आता आपण नेकस्ट टाईम आपण् वेळ नक्की करु. तुम्ही कामाला आम्हाला लावले.

निलम ढवण :-

मी नाही कामाला लावले तुमच्याच सदस्यांनी ठराव मांडलेला आहे. आम्ही थोडी मांडलेला आहे. आम्ही आमच्या गटनेत्यांच्या हिशेबाने आम्ही ओटींग केले आहे. आमच्या पक्षाच्या पतीने सगळ्या सदस्यांचे मतदान उपमहापौर साहेब मला बाकी काही म्हणायचे नाही उगाचच वेळ जात आहे त्यांना काही तरी लिमिट द्या. आता एवढ्या वेळातच आता जे झाले आहे ज्यांचे फोन आलेले आहेत त्यांचे ओटींग घ्या आणि कम्प्लीट करा म्हणून. असे संध्याकाळ पर्यंत फोन येतच राहतील. आम्ही आमच्या सदस्यांचे जसे दिले आता तुमच्या सदस्यांचे ओटींग चालु आहे.

नगरसचिव :-

सर्व सदस्यांच्या वैयक्तिक रित्या मतदानाची नोंद घेण्यात आलेली आहे. किती तरी लोकांनी वारंवार फोन करुन मला सांगितलेले आहे. अश्विन कासोदरीया यांचा पण फोन होता, खंडेलवाल साहेबांचा पण होता, वैती साहेबांचा पण होता, दिप्ती भट मॅडमचा होता, सुनिता पाटील मॅडमचा होता, अरविंद शेट्टी यांचा होता, अनिल सावंत साहेबांचा होता, इत्यादी सगळ्या सदस्यांचे ज्यांना इथे जॉईंट आहेत परंतु त्यांच्या टेक्निकली अडचणीमुळे ज्यांनी मतदान करु शकले नाहीत त्यांनी फोन द्वारे मला मतदान कोणाच्या बाजुने आहे ते सांगितलेले आहे. मतदानाची आकडेवारी मी मा. महापौर मॅडम यांच्याकडे सुपुर्द करतो.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील साहेब यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने ४२ नगरसेवकांनी मतदनान केलेले आहे. आणि विरोधामध्ये ३१ नगरसेवकांनी मतदान केलेले आहे. तटस्थ ७ आहेत. हा ठराव बहूमताने मंजुर करण्यात येत आहे.

प्रकरण क्र. ०७ :-

महानगरपालिकेची परिवहन सेवासुरळीत चालविणेकरीता नविन धोरण ठरविणे बाबत.

ठराव क्र. ११ :-

मिरा भाईंदर महापालिका परिवहन उपक्रमातर्फे सन 2005 पासुन बस सेवा शहरातील नागरीकांकरीता सुरु करण्यात आली. सन 2005 ते 2010 पर्यंत महापालिकेतर्फे बसेस खरेदी न करता खाजगी तत्वावर ठेकेदारामार्फत 50 बसेस चालविण्यात येत होत्या.

निविदेची मुदत संपल्यानंतर पालिकेतर्फे पुन्हा धोरण बदलून पीपीपी तत्वावर ठेकेदाराकडून रॉयल्टी घेवून JNNURM अंतर्गत प्राप्त झालेल्या 50 बसेस व पूर्वीच्या ठेकेदाराच्या 50 बसेस अशा एकुण 100 बसेस चालविण्याचा 10 वर्षाकरीता ठेका देण्यात आला. परंतु ठेकेदाराने फक्त एकच वर्ष रॉयल्टीची रक्कम भरली त्यानंतर रॉयल्टी महापालिकेत भरावयाचे बंद केले व शासनाचा कर न भरल्याने, बसेस पुर्ण क्षमतेने न चालविल्याने, बसेस चे मेंटेनन्स केले नाही व लोकप्रतिनीधी/नागरीकांच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर सन 2015 साली त्यांचा ठेका रद्द करण्यात आला. तद्नंतर सदर ठेकेदार लवादात गेला, आजतागायत लवाद सुरु असून महापालिकेच्या सुमारे 50 बसेस लवादामुळे धुळ खात पडलेल्या आहेत.

तद्नंतर पालिकेतर्फे बस सेवा सुरु करण्यात आली, या दरम्यान JNNURM-2 या योजने अंतर्गत केंद्र शासनाकडून 100 बसेस मंजुर झाल्या परंतु त्यातील 85 बसेस महापालिकेस प्राप्त झाल्या. केंद्र सरकारकडून डेपो साधन सामुग्रीकरीता व ITS च्या अंमलबजावणीकरीता जागतिक बँकेकडून अनुदान मंजुर झाले. महापालिकेतर्फे बस सेवा सुरु झाल्यानंतर बस सेवेवर परिणाम होवून सुमारे 50 ते 60 टक्के बसेस रस्त्यावर ऑन रुट होत्या व खर्च प्रती किमी. जास्त होत असल्याने महापालिकेची मोठ्या प्रमाणात तुट होत होती.

सन 2016 साली पुन्हा पालिकेतर्फे व केंद्र शासनाचे नियुक्त सल्लागार व महापालिकेचे तांत्रिक सल्लागार यांचेशी अभिप्राय घेतल्यानंतर धोरण बदलून GCC तत्वावर बस सेवा सुरु करणेकरीता मा. महासभेची मंजुरी घेवून निविदा काढण्यात आली व ठेकेदाराला Letter of Acceptance देण्यात आले. परंतु काही कारणास्तव सदर ठेकेदारास दिलेले Letter of Acceptance मागे घेण्यात आले.

सन 2018 साली पुन्हा पालिकेतर्फे सल्लागार नियुक्त करुन त्यांच्या अभिप्रायानुसार धोरण बदलणेकरीता कार्यवाही सुरु करुन NCC with SMF Or VGF Basis वर किंवा GCC पध्दतीने बस सेवा सुरु करणेबाबत मा. महासभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात आला. मा. महासभेची मंजुरी घेवून निविदा प्रक्रिया करुन पात्र निविदाधारकास NCC with VGF Basis बस सेवा सुरु करणेकरीता करारनामा करुन कार्यादेश देण्यात आला. ठेकेदाराने बस सेवा सुमारे 1 वर्षभर सुरळीत चालविल्यानंतर कोविड-19 च्या प्रादुर्भावामध्ये लॉकडाऊन कालावधीत प्रशासन व ठेकेदार यांच्यात झालेल्या मतभेदामुळे ठेका रद्द करण्यात आला.

तद्नंतर पुन्हा पालिकेतर्फे बस सेवा सुरु करण्यात आली व काही महिन्यांनंतर तात्पुरता ठेकेदार नियुक्त करुन ठेकेदारामार्फत बस सेवा सद्यस्थितीत सुरु आहे. दरम्यान बस सेवा चालविणेबाबत पालिकेतर्फे पुन्हा धोरण बदलण्यात आले व NCC with SMF या तत्वावर निविदा काढण्यात आली. तीन वेळा निविदेस मुदत वाढ देवूनही निविदेला प्रतिसाद मिळाला नाही. वास्तविक ठेका रद्द केल्यानंतर तात्पुरता ठेकेदार नियुक्त केल्यानंतर मा. महासभेला निर्देशनास आणून देणे आवश्यक होते. तसेच परिवहन सेवेकरीता धोरण बदलून नविन निविदा काढणेकरीताही मा. महासभेची मंजुरी घेणे हे आवश्यक होते. महापालिकेच्या मंजुरी शिवाय प्रशासनाला धोरण बदलण्याचा अधिकार नाही. मा. महासभेच्या अधिकाराचा अवमान केल्याचे यावरुन स्पष्ट होत आहे.

DPR बनविणे Constultant नेमणे याकरीता लाखो रुपये महापालिकेने शुल्क देवून सुध्दा उपरोक्त परिस्थीतीवरुन असे दिसून येते की, महापालिकेची परिवहन सेवा आजतागायत सुरळीत झालेली नाही.

तरी महापालिकेच्या बस सेवेचे नविन धोरण ठरविणेकरीता मा. महापौरांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 31(1) अन्वये पदाधिकारी, गटनेते व परिवहन समिती सभापती यांची कमिटी नियुक्त करुन कमिटीने यावर निर्णय घेण्यास ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. धृवकिशोर पाटील          अनुमोदन :- श्री. अनिल विराणी**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | अ.क्र. | तटस्थ |
|---|---|---|---|---|---|
| १ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | १ | व्यास रवि वासुदेव | १ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम |
| २ | गेहलोत हसमुख मोहनलाल | २ | जैन गीता भरत | २ | मेहरा राजीव ओमप्रकाश |
| ३ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ३ | कासोदारिया अश्विन शामजीभाई | ३ | सावंत अनिल दिवाकर |
| ४ | पाटील प्रभात प्रकाश | ४ | सोंस नीला बर्नाड | ४ | इनामदार जुबेर अब्दुल्ला |
| ५ | भानुशाली वर्षा गिरधर | ५ | भोईर जयेश भानुदास | ५ | शेख रुबिना फिरोझ |
| ६ | यादव मिरादेवी रामलाल | ६ | गजरे दौलत तुकाराम | ६ | डिसा मर्लिन मर्विन |
| ७ | शाह रिटा सुभाष | ७ | बेलानी हेमा राजेश | ७ | परदेशी गिता हरीश |
| ८ | गोहिल शानू जोरावर सिंह | ८ | सिंह मदन उदितनारायण | | |
| ९ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | ९ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | |
| १० | मेहता डिंपल विनोद | १० | अग्रवाल सुशील गोपीकिशन | | |
| ११ | भोईर सुनिता शशिकांत | ११ | मोकाशी दिपाली आनंदराव | | |
| १२ | पाटील वंदना मंगेश | १२ | रॉड्रीकस मोरस जोसेफ | | |
| १३ | रावल मेघना दिपक | १३ | पांडेय पंकज सूर्यमणि | | |
| १४ | जैन सुनिता रमेश | १४ | पाटील रोहिदास शंकर | | |
| १५ | अरोरा दीपिका पंकज | १५ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | |
| १६ | नाईक विविता विवेक | १६ | वैती चंद्रकांत सिताराम | | |
| १७ | भावसार वंदना संजय | १७ | रकवी वैशाली गजेंद्र | | |
| १८ | सोनार सुरेखा प्रकाश | १८ | खंडेलवाल सुरेश जगदीश | | |
| १९ | मुखर्जी अनिता बबलू | १९ | म्हात्रे परशुराम पदमाकर | | |
| २० | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २० | भोईर राजू यशवंत | | |
| २१ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | २१ | पाटील प्रविण मोरेश्वर | | |
| २२ | शाह राकेश रतिशचंद्र | २२ | ढवण निलम हरीश्चंद्र | | |
| २३ | शेट्टी अरविंद आनंद | २३ | नलावडे दिनेश दगडु | | |
| २४ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | २४ | शिर्के अनंत गेणू | | |
| २५ | तिवारी अशोक सूर्यदेव | २५ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | | |
| २६ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | २६ | कदम अर्चना अरुण | | |
| २७ | शाह सीमाबेन कमलेश | २७ | पांडे स्नेहा शैलेश | | |
| २८ | कांगणे मीना यशवंत | २८ | गुप्ता कुसुम संतोष | | |
| २९ | परमार हेतल रतिलाल | २९ | भोईर भावना राजू | | |
| ३० | दळवी प्रशांत ज्ञानदेव | ३० | पाटील वंदना विकास | | |
| ३१ | म्हात्रे नयना गजानन | ३१ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | | |
| ३२ | शेट्टी गणेश गोपाळ | | | | |
| ३३ | थेराडे संजय अनंत | | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३४ | जैन राजेंद्र भवरलाल | | |
| ३५ | विराणी अनिल रावजीभाई | | |
| ३६ | जैन दिनेश तेजराज | | |
| ३७ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | |
| ३८ | दुबे मनोज रामनारायण | | |
| ३९ | भोईर गणेश गजानन | | |
| ४० | पारधी सुजाता यशवंत | | |
| ४१ | दिप्ती शेखर भट्ट | | |
| ४२ | अनिता जयवंत पाटील | | |

**ठराव बहूमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ०८, मिरा भाईंदर शहरातील घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २०१६ अन्वये दैनंदिन वॉर्ड साफसफाई करणेकरीता धोरण ठरविणेबाबत.

गणेश भोईर :-

घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती निहाय दैनंदिन वॉर्ड साफसफाई करणेकरीता दि.19/05/2017 रोजीच्या मा. महासभेत सविस्तर प्रकल्प अहवाल DPR तयार करुन मंजुरीकरीता पुन:श्च मा. महासभेत ठराव पारित करण्यात आला होता.

सन 2017 ते 2022 या 5 वर्षातील शहराची लोकसंख्या तसेच शहरात नव्याने निर्माण होणाऱ्या इमारती, रस्ते, गटारे, व्यवसायिक आस्थापना आदी बाबी विचारात घेवून साफसफाई करण्याकरीता लागणारे सफाई कर्मचारी, कचरा संकलन व वाहतुक करणेकरीता आवश्यक वाहनांची संख्या गृहित धरुन ठराव पारित केला होता. परंतु आजतागायत निविदेबाबत अंतिम निर्णय झालेला नाही.

प्रशासनाने दिलेल्या गोषवारा परिपूर्ण नाही हे खालील बाबींवरुन स्पष्ट होत आहे.

- सन 2021 ते 2029 या आठ वर्षाच्या कालावधीत वाढणारी लोकसंख्या, शहरात नव्याने निर्माण होणाऱ्या इमारती, रस्ते, नाले यांचा विचार करुन साफसफाईकरीता आवश्यक असणारे कर्मचारी व कचरा वाहतुक करणेकरीता आवश्यक वाहने यांची माहिती देणे गरजेचे असताना ती दिली नाही.
- उत्तन येथील घनकचरा प्रकल्पात संपूर्ण मिरा भाईंदर शहराचा कचऱ्यावर प्रक्रिया होत असल्याने तेथील नागरीकांनी अनेकवेळा आंदोलन केले होते त्यामुळे मिरा भाईंदर शहरात विविध ठिकाणी कचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरीता सुमारे 8 ते 10 ठिकाणी 10 ते 20 टनाचे सुमारे 60 कोटी रुपये खर्च करुन छोटे प्रकल्प उभारण्यात येत आहेत याचाही गोषवाऱ्यात कोठेही उल्लेख केलेला नाही.
- दैनंदिन वॉर्ड साफसफाई व घनकचरा वाहतुक करणेकामी येणाऱ्या अंदाजित खर्चाच्या रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मागितली नाही.

शहरातील दैनंदिन रस्ते, गटार, साफसफाई करणेस आवश्यक मजुर व घनकचरा वाहतुक करणेकामी वाहनांचे ऑपरेशन मेंटेनन्स करीता निविदा मागविणेच्या कामास मंजुरी

देण्याकरीता मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 31 (1) अन्वये महापालिकेचे पदाधिकारी व गटनेत्यांची समिती गठीत करावी. घनकचरा व्यवस्थापन 2016 व स्वच्छ भारत अभियान यांच्या मार्गदर्शिक निकषानुसार व उपरोक्त बाबी विचारात घेवून प्रशासनाने सविस्तर माहिती समितीस सादर करुन समितीने निर्णय घेणेस मा. महासभा मंजुरी देत आहे.

अनिल विराणी :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठरवा मंजुर. पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. ०८ :-

मिरा भाईंदर शहरातील घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २०१६ अन्वये दैनंदिन वॉर्ड साफसफाई करणेकरीता धोरण ठरविणेबाबत.

ठराव क्र. १२ :-

घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती निहाय दैनंदिन वॉर्ड साफसफाई करणेकरीता दि.19/05/2017 रोजीच्या मा. महासभेत सविस्तर प्रकल्प अहवाल DPR तयार करुन मंजुरीकरीता पुन:श्च मा. महासभेत ठराव पारित करण्यात आला होता.

सन 2017 ते 2022 या 5 वर्षातील शहराची लोकसंख्या तसेच शहरात नव्याने निर्माण होणाऱ्या इमारती, रस्ते, गटारे, व्यवसायिक आस्थापना आदी बाबी विचारात घेवून साफसफाई करण्याकरीता लागणारे सफाई कर्मचारी, कचरा संकलन व वाहतुक करणेकरीता आवश्यक वाहनांची संख्या गृहित धरुन ठराव पारित केला होता. परंतु आजतागायत निविदेबाबत अंतिम निर्णय झालेला नाही.

प्रशासनाने दिलेल्या गोषवारा परिपूर्ण नाही हे खालील बाबींवरुन स्पष्ट होत आहे.

- सन 2021 ते 2029 या आठ वर्षाच्या कालावधीत वाढणारी लोकसंख्या, शहरात नव्याने निर्माण होणाऱ्या इमारती, रस्ते, नाले यांचा विचार करुन साफसफाईकरीता आवश्यक असणारे कर्मचारी व कचरा वाहतुक करणेकरीता आवश्यक वाहने यांची माहिती देणे गरजेचे असताना ती दिली नाही.
- उत्तन येथील घनकचरा प्रकल्पात संपूर्ण मिरा भाईंदर शहराचा कचऱ्यावर प्रक्रिया होत असल्याने तेथील नागरीकांनी अनेकवेळा आंदोलन केले होते त्यामुळे मिरा भाईंदर शहरात विविध ठिकाणी कचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरीता सुमारे 8 ते 10 ठिकाणी 10 ते 20 टनाचे सुमारे 60 कोटी रुपये खर्च करुन छोटे प्रकल्प उभारण्यात येत आहेत याचाही गोषवाऱ्यात कोठेही उल्लेख केलेला नाही.
- दैनंदिन वॉर्ड साफसफाई व घनकचरा वाहतुक करणेकामी येणाऱ्या अंदाजित खर्चाच्या रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मागितली नाही.

शहरातील दैनंदिन रस्ते, गटार, साफसफाई करणेस आवश्यक मजुर व घनकचरा वाहतुक करणेकामी वाहनांचे ऑपरेशन मेंटेनन्स करीता निविदा मागविणेच्या कामास मंजुरी देण्याकरीता मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 31 (1) अन्वये महापालिकेचे पदाधिकारी व गटनेत्यांची समिती गठीत करावी. घनकचरा व्यवस्थापन 2016 व स्वच्छ भारत अभियान यांच्या मार्गदर्शिक निकषानुसार व उपरोक्त बाबी विचारात घेवून प्रशासनाने सविस्तर माहिती समितीस सादर करुन समितीने निर्णय घेणेस मा. महासभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. गणेश भोईर अनुमोदन :- श्री. अनिल विराणी

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र.९, मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागातील प्राथमिक शिक्षकांना व सेवानिवृत्तीधारक शिक्षकांना तसेच कुटूंब निवृत्तीधारकांना दि. ०१/०१/२०१६ पासून सातव्या वेतन आयोगानुसार वेतन तथा सेवानिवृत्ती वेतन व इतर भत्ते लागू करणेबाबत.

निलम ढवण :-

महापौर मॅडम, तो विषय डायरेक्ट सर्वांनी हे केले म्हणून सागंत आहेत त्याच्यावर मला एक सुचना द्यायची आहे.

मा. महापौर :-

सुचना द्या.

निलम ढवण :-

महापौर मॅडम, मागच्या अकरा तारीखच्या मिटींगला असाच साफसफाई कामगार ह्या संदर्भात एक विषय होता. आणि त्यावेळी देखील मी माझी सुचना आणि त्यावेळी मी आपले मत मांडले होते आपल्याला विनंती केली होती आयुक्त साहेब हे आयुक्त साहेब नव्हते तर मागच्या कोविडमध्ये ज्या साफसफाई कामगारांनी काम केलेले आहे आपल्या जीवाची पर्वा न करता देखील तर त्यावेळी त्यांना कोविड भत्ता जो जाहिर केला होता तो अद्यापी त्यांना मिळालेला नाही. तर कृपा करुन आयुक्त साहेब तो कोविड भत्ता त्यांना लवकरात लवकर देण्यात यावा ही एक सुचना मी मांडत आहे. महापौर मॅडम आपण देखील याचा पाठपूरावा करावा.

मा. महापौर :-

ठिक आहे. सुचना नमुद करुन घ्या.

निलम ढवण :-

धंन्यवाद.

गिता जैन :-

महापौर मॅडम जरी ह्या विषयी नसेल तरी एक दुसरा प्रॉब्लेम आहे आता आपल्याकडे तरतुद नसल्याने आपली औषध फवारणी आणि ते सगळे बंद केलेले आहे. ती ह्या कोविडच्या काळात फवारणी बंद ते सॅनिटायजेशन करतात तेही बंद हे किती चुकीचे आहे.

मा. महापौर :-

तो विषय आता नाही आहे. तुम्ही पुढच्या विषयामध्ये बोला. पुढे विषय आहे तेव्हा बोला.

प्रशांत दळवी :-

दि.02/08/2019 रोजीच्या शासन निर्णयानूसार मिरा भाईंदर महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या आस्थापनेवरील स्थायी कार्यरत शिक्षकांना, सेवा निवृत्तीधारक शिक्षकांना तसेच कुटूंब निवृत्ती धारकांना दि.01/01/2016 पासुन सातवा वेतन आयोगानूसार वेतन तथा निवृत्ती वेतन देणेकरीता रु.12 कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

मनपा शिक्षकांना वेतन व निवृत्ती वेतन देताना 50% रक्कम राज्य सरकार व 50% रक्कम महापालिकेकडून अनुदान शिक्षण विभागास प्राप्त होत असते.

सातवा वेतन आयोगानुसार वेतन व फरकाची रक्कम शिक्षकांना देणेकरीता शासनाकडून मंजुरी आल्यानंतर त्यांना सातवा वेतन आयोगानुसार वेतन देण्यात यावे व शासनाकडून फरकाची रक्कम पालिकेच्या शिक्षण मंडळास वर्ग झाल्यानंतर पालिकेने देय्य असलेल्या फरकाची रक्कम पालिकेच्या

शिक्षण मंडळास वर्ग करण्यात यावी व याकामी येणाऱ्या रु.12 कोटी इतक्या खर्चास ही सभा मंजुरी देत आहे.

दिनेश जैन :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव मंजुर. पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. ०९ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागातील प्राथमिक शिक्षकांना व सेवानिवृत्तीधारक शिक्षकांना तसेच कुटूंब निवृत्तीधारकांना दि. ०१/०१/२०१६ पासून सातव्या वेतन आयोगानुसार वेतन तथा सेवानिवृत्ती वेतन व इतर भत्ते लागू करणेबाबत.

ठराव क्र. १३ :-

दि.02/08/2019 रोजीच्या शासन निर्णयानूसार मिरा भाईंदर महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या आस्थापनेवरील स्थायी कार्यरत शिक्षकांना, सेवा निवृत्तीधारक शिक्षकांना तसेच कुटूंब निवृत्ती धारकांना दि.01/01/2016 पासुन सातवा वेतन आयोगानूसार वेतन तथा निवृत्ती वेतन देणेकरीता रु.12 कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

मनपा शिक्षकांना वेतन व निवृत्ती वेतन देताना 50% रक्कम राज्य सरकार व 50% रक्कम महापालिकेकडून अनुदान शिक्षण विभागास प्राप्त होत असते.

सातवा वेतन आयोगानुसार वेतन व फरकाची रक्कम शिक्षकांना देणेकरीता शासनाकडून मंजुरी आल्यानंतर त्यांना सातवा वेतन आयोगानुसार वेतन देण्यात यावे व शासनाकडून फरकाची रक्कम पालिकेच्या शिक्षण मंडळास वर्ग झाल्यानंतर पालिकेने देय्य असलेल्या फरकाची रक्कम पालिकेच्या शिक्षण मंडळास वर्ग करण्यात यावी व याकामी येणाऱ्या रु.12 कोटी इतक्या खर्चास ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. दिनेश जैन

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १०, मा. विशेष महासभा ठराव क्र. ३ दि. १३/०८/२०२० अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेस दैनिक, वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षीके, दिवाळी अंक व मासिके इत्यादी एकाच ठिकाणी सुरू करणेबाबत घेतलेला निर्णय फेरनिर्णयास्तव सादर.

प्रशांत दळवी :-

गोषवाऱ्यात दिलेल्या माहितीनुसार परिशिष्ट - अ मधील महानगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये त्यांच्या आवश्यकते प्रमाणे 10 दैनिक वृत्तपत्रे पुरवठा करण्यात यावीत तसेच महापालिकेतर्फे उभारण्यात आलेल्या वरीष्ठ नागरीकांच्या विरंगुळा केंद्रास दैनिक वृत्तपत्रांकरीता मासिक रु.2000/- रोख देणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

रिटा शहा :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव मंजुर.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, हा ठराव मांडत असताना महापौर मॅडम, आयुक्त महोदय, हा ठराव आपल्याला परत ह्याठिकाणी का घेण्यात आला ॲक्च्युअली  अगोदर कसे आहे की आम्ही जे काही म्हटले होते महासभेने निर्णय जो घेतला होता त्या निर्णयानुसार वर्तमानपत्र सगळ्याच ठिकाणी बंद करण्यात आली होती. लॉकडाऊनचा काळ होता त्यामुळे आपण विरंगुळा केंद्र ही बंद करण्यात आली होती. परंतु महापौर मॅडमने जेव्हा आयुक्तांना पत्रव्यवहार केला त्यानुसार तत्कालिन कमिश्नर विजय राठोड साहेब असताना त्याठिकाणी परंत आपण ते वृत्तपत्र विरंगुळा केंद्र  सुरु करण्यात आली. परंतु आयुक्त महोदय आता काही दिवस झाले १५-२० दिवस झाली जे पदाधिकारी आहेत मग ते महापौर असतील उपमहापौर असतील पदाधिकाऱ्यांच्या कार्यालयात देखील वृत्तपत्र येत नाही. ही बाब अतिशय गंभीर आहे आणि मी त्याच्या अगोदरही सांगितले होते की दैनंदिनी ज्या पत्र येतात त्यामधल्या काही मिरा भाईंदरशी निगडीत बातम्यांच्या कटींग त्या रजिस्टरला मेंटेन करतो. आणि त्या केलेल्या असताना त्यातील पदाधिकारी, महापौर, उपमहापौर त्या कटींगच्या अनुशंगाने जे काही सुचवायचे असेल ते सुचवून मा. आयुक्त महोदयांना तशा सुचना केल्या जातात. आणि आयुक्तांच्या नोटींगसाठी पण त्या ठेवल्या जातात. परंतु असे असताना आयुक्त महोदय, एवढा काय प्रॉब्लेम होता की ह्यांना वृत्तपत्र देणेसाठी पण महासभेची मंजुरी हवी होती का मग कुठे घोड अळले होते मला हे कळत नाही. साधारणत: विषय होता तत्कालिन कमिश्नरला सांगुन जर चालु झाले होते मग हे बंद करण्यामध्ये महापौर मॅडम टाईम लागायला नव्हता हे माझे म्हणणे आहे. परंतु आम्ही जेव्हा विचारणा करतो अधिकाऱ्यांना त्यावेळेला अधिकारी वर्ग म्हणतात की कोणी टेंडर भरायला तयार नाही हे नाही मॅडम हे कुठेतरी न पटण्यासारखे आहे. कुठे काय आम्ही ५०-६० पेपर मागत नाही आणि जो कोणी पदाधिकारी किंवा कुठल्याही अधिकाऱ्यांकडे जर हा पेपर जात असेल आयुक्त महोदय तर तो अधिकारी काय आपल्या घरी घेऊन जात नाही पेपर. त्यामुळे महापौर मॅडम यापुढे अशाच ह्या वृत्तपत्रांबाबत कमित कमी महापालिकेच्या पदाधिकाऱ्यांनी आपले अधिकारी वर्ग आहेत त्यांच्या पर्यंत ह्या बातम्या जाव्यात आणि सुरळीत हा पेपर सुरु रहावा एवढीच विनंती मी आपल्या माध्यमातुन करेल. धंन्यवाद.

मा. महापौर :-

ठिक आहे. ठराव मंजुर पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. १० :-

मा. विशेष महासभा ठराव क्र. ३ दि. १३/०८/२०२० अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेस दैनिक, वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षीके, दिवाळी अंक व मासिके इत्यादी एकाच ठिकाणी सुरू करणेबाबत घेतलेला निर्णय फेरनिर्णयास्तव सादर.

ठराव क्र. १४ :-

गोषवाऱ्यात दिलेल्या माहितीनुसार परिशिष्ट - अ मधील महानगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये त्यांच्या आवश्यकते प्रमाणे 10 दैनिक वृत्तपत्रे पुरवठा करण्यात यावीत तसेच महापालिकेतर्फे उभारण्यात आलेल्या वरीष्ठ नागरीकांच्या विरंगुळा केंद्रास दैनिक वृत्तपत्रांकरीता मासिक रु.2000/- रोख देणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत दळवी        अनुमोदन :- श्रीम. रिटा शाह

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ११, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०७-अ अन्वये स्थानिक निधी लेखापरिक्षा विभाग यांचेकडील सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ चा लेखा परिक्षण अहवाल मा. महासभे पुढे सादर करणेबाबत.

प्रशांत दळवी :-

स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्या विविध विभागाचे सन 2015-16, 2016-17 व 2017-18 या आर्थिक वर्षांचे लेखापरिक्षण पूर्ण केले असून त्यांचे लेखापरिक्षण अहवाल महानगरपालिकेस प्राप्त झाले आहेत. यापूर्वी सुध्दा महापालिकेस लेखा परिक्षण अहवाल प्राप्त झाले आहेत. परंतु अहवालातील आक्षेप व परिच्छेदांची पूर्तता संबंधीत विभाग प्रमुख, अधिकाऱ्यांकडून झालेली नाही. अनेक आक्षेप वर्षानूवर्षे प्रलंबित आहेत. विभाग प्रमुखांनी व संबंधीत अधिकाऱ्यांनी यावर कोणतीही कार्यवाही केली नाही.

मा. आयुक्त यांनी प्रलंबित असलेल्या सर्व आक्षेपांची व परिच्छेदांची तसेच सन 2015-16, 2016-17 व 2017-18 या आर्थिक वर्षांचे लेखापरिक्षण अहवालातील आक्षेप व परिच्छेदांची संबंधीत अधिकाऱ्यांकडून पूर्तता करुन तीन महिन्यात मा. महासभेसमोर संपूर्ण अहवाल सादर करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

रिटा शहा :-

माझे अनुमोदन आहे.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम आपल्याला विनंती आहे लेखा परीक्षणावर एक विशेष सभा बोलवा

मा. महापौर :-

ठिक आहे. नक्की.

ध्रुवकिशोर पाटील :-

माझे समर्थन आहे.

जुबेर इनामदार :-

विशेष सभा बोलविण्याची.

मा. महापौर :-

नक्की.

जुबेर इनामदार :-

आणि ह्यावर चर्चा करुया. ह्याची मंजुरी महासभे समोर आणली ह्याला स्थायी समितीने मंजुरीच दिलेली नाही. प्रशासनाला विचारा स्थायी समितीने ह्याला मंजुरी दिली होती का? त्यांनी महासभे समोर हा विषय मांडला.

मा. महापौर :-

ठिक आहे तुमची सुचना मान्य करण्यात येत आहे. पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. ११ :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०७-अ अन्वये स्थानिक निधी लेखापरिक्षा विभाग यांचेकडील सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ चा लेखा परिक्षण अहवाल मा. महासभे पुढे सादर करणेबाबत.

ठराव क्र. १५ :-

स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्या विविध विभागाचे सन 2015-16, 2016-17 व 2017-18 या आर्थिक वर्षांचे लेखापरिक्षण पूर्ण केले असून त्यांचे लेखापरिक्षण अहवाल महानगरपालिकेस प्राप्त झाले आहेत. यापूर्वी सुध्दा महापालिकेस लेखा

परिक्षण अहवाल प्राप्त झाले आहेत. परंतु अहवालातील आक्षेप व परिच्छेदांची पूर्तता संबंधीत विभाग प्रमुख, अधिकाऱ्यांकडून झालेली नाही. अनेक आक्षेप वर्षानूवर्षे प्रलंबित आहेत. विभाग प्रमुखांनी व संबंधीत अधिकाऱ्यांनी यावर कोणतीही कार्यवाही केली नाही.

मा. आयुक्त यांनी प्रलंबित असलेल्या सर्व आक्षेपांची व परिच्छेदांची तसेच सन 2015-16, 2016-17 व 2017-18 या आर्थिक वर्षांचे लेखापरिक्षण अहवालातील आक्षेप व परिच्छेदांची संबंधीत अधिकाऱ्यांकडून पूर्तता करुन तीन महिन्यात मा. महासभेसमोर संपूर्ण अहवाल सादर करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्रीम. रिटा शाह

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र.१२, वैद्यकीय विभागाकरीता आवश्यक उपकरणे, फर्निचर औषधे, सर्जिकल मटेरीयल व लॅब मटेरीयल, डासनाशके, अळीनाशके खरेदी करणे व औषध फवारणीकरीता १० मिनी टेम्पो भाडेतत्वावर घेणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम ठराव वाचायच्या आधी हा विषय आला आहे म्हणून चला ठिक आहे ह्या मुद्यावर चर्चा करता येईल. महापौर मॅडम शहरामध्ये सध्या डास निर्मूलन...............

मा. महापौर :-

पहिला ठराव वाचु देत नंतर तुम्ही चर्चा करा. बऱ्याच अजुन नगरसेवकांना बोलायचे आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

वैद्यकीय विभागाकरीता आवश्यक उपकरणे, फर्निचर औषधे, सर्जिकल मटेरीयल व लॅब मटेरीयल, डास नाशके, अळी नाशके खरेदी करणेस मा. आयुक्त यांनी मा. महासभेच्या कार्योत्तर मंजुरीच्या अधीन राहून निविदा मागविणेस दि.29/05/2020 रोजी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली होती. त्याअनुषंगाने औषधे, सर्जिकल मटेरीयल व लॅब मटेरीयल प्राप्त निविदेतील दरास मा. स्थायी समिती सभा दि.09/07/2020 रोजी ठराव क्र.23 अन्वये रु.5 करोड पर्यंत व डास नाशके, अळी नाशके खरेदी करणेकरीता मा. स्थायी समिती सभा दि.09/07/2020 रोजी ठराव क्र.24 अन्वये रु.3.50 लाख रुपयांस मंजुरी दिली होती.

अत्यावश्यक बाब म्हणून वैद्यकीय विभागाकरीता औषधे, सर्जिकल मटेरीयल, लॅब मटेरीयल व उपकरणे खरेदी करणेच्या प्रस्तावास मा. महासभेच्या कार्योत्तर मंजुरीच्या अधीन राहून नविन निविदा मागवून खरेदी करणेकरीता मा. आयुक्त यांनी दि.25/11/2020 रोजी मंजुरी दिलेली होती. त्याप्रमाणे रु.1 कोटीच्या कामास दि.08/04/2021 रोजी मंजुरी दिली होती.

एकात्मिक डास योजने अंतर्गत औषध फवारणीकरीता लागणारे 10 मिनी टेम्पो खरेदी करणे ऐवजी 5 वर्षाच्या कालावधीकरीता 10 मिनी टेम्पो (इंधन, जेट स्प्रे मशिन, वाहन चालकासहित) भाडे तत्वावर घेणेबाबत मा. स्थायी समिती सभा दि.16/03/2020 रोजी ठराव पारित करण्यात आला होता.

त्याप्रमाणे मा. आयुक्तांची मंजुरी घेवून निविदा मागविण्यात आल्या, त्या प्राप्त निविदेतील कमी देकार रक्कमेच्या निविदाकाराची निविदा मा. स्थायी समितीने मंजुर केलेली असुन उपरोक्त सर्व प्रस्तावास हि मा. महासभा कार्योत्तर आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

अनिल विराणी :-

माझे अनुमोदन आहे.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, डास निर्मुलनाचा कार्यक्रम ह्या शहरामध्ये राबविला जात होता. आता ह्या केलेल्या ठरावाला पारीत होण्यासाठी त्याचे कामकाज सुरु होण्यासाठी टेंपो विकत घेतले जातील त्याचे टेंडर दिले जाईल आधी स्थायी समितीमध्ये जाणार. हा सगळा प्रकार पुर्ण होण्यासाठी अवधी लागणार आहे. डास निर्मुलनाचा कार्यक्रमासाठी आयुक्त महोदय ८ कोटी रुपये आयुक्ताने अर्थसंकल्पामध्ये तरतुद केली होती. आपल्याला महिन्याला कमित कमी ४० लाख रुपये त्याचा खर्च आहे. आता त्याची तरतुद स्थायी समितीच्या विद्वानांनी आर्थिक विद्वानांनी त्याची तरतुद फक्त एक कोटी रुपये ठेवली. हा अंध दृष्टीचा कार्यक्रम...........

(सभागृहात गोंधळ)

दिनेश जैन :-

स्थायी समितीने तरतुद कमी केलेली नाही. ह्या विदवानाला तुम्ही सांगा.

जुबेर इनामदार :-

साहेब तुम्हाला वाईट बोललो नाही तुम्हाला आर्थिक विद्वान बोललो. अर्थशास्त्राचे विद्वान बोललो.

(सभागृहात गोंधळ)

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, सदस्य दिनेश जैनला जरा आम्ही बोलल्या नंतर बोला आम्ही त्यांना चांगलाच शब्दाचा वापर केला आहे.

मा. महापौर :-

ठराव झालेला आहे.

जुबेर इनामदार :-

ठराव झाला असेल तर त्याच्यावर चर्चा करायची आहे. महापौर महोदय, आयुक्त महोदय माझी आपणास विनंती आहे तत्कालिन आयुक्ताने अर्थसंकल्प तेव्हा सादर केला होता. तेव्हा ८ कोटी रुपयाची तरतुद ठेवली होती. त्या धर्तीवर आपण हे डास निर्मुलनाचा कार्यक्रम फेर सुरु करावा. अन्यथा कोविड मुळे ह्या शहराचे लोक त्रस्त आहेत. ह्या देशाला ते त्रस्त झालेले आहेत. उद्या ह्या शहरामध्ये डासामुळे कारण आपले क्षेत्र २५ टक्के फक्त रहिवाशी क्षेत्र आहे आणि बाकीचा फॉरेस्ट आणि सी.आर.झेड बाधित आहेत. सी.आर.झेड ने बाधित असल्यामुळे डासची जो उत्पत्ती आहे ती जास्त प्रमाणात असल्यामुळे सर आपल्याला हा डास निर्मुलनाचा कार्यक्रम बंद करुन चालणार नाही. कोणाचाही जिद्दीवर किंवा चुकीच्या निर्णयावर आपल्याला साहेब तुम्ही बळी पडू देऊ नका.

मा. महापौर :-

साहेब तुम्ही केलेली सुचना मान्य करण्यात येत आहे. हा विषय पुढच्या महासभेमध्ये घेणार आहोत.

निलम ढवण :-

पुढच्या महासभेमध्ये विषय घ्या परंतु उत्तरे तर द्या.

मा. महापौर :-

पुढचे नियोजन करुन पुढच्या महासभेमध्ये आपण हा विषय आणणार आहोत.

निलम ढवण :-

महापौर मॅडम, पुढच्या महासभेत आणाच पण आता तुम्ही विषय आणला आहे तर बोलायला द्याना.

प्रविण पाटील :-

महापौर मॅडम मला ह्या विषयावर बोलायचे आहे.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम पुर्नविनियोजन करता येणार नाही. महापौर मॅडम तांत्रिक बाब आहे. दिनेश जी जरा सुनिये आपको जानकारी नही है ।

मा. महापौर :-

आपण् पुढच्या महासभेमध्ये घेणार.

(सभागृहात गोंधळ)

जुबेर इनामदार :-

त्रेमासिक जमा खर्चाचा आढावा आधी स्थायी समिती समोर देण्यात गेलेला नाही.

मा. महापौर :-

त्रेमासिक अहवाल का दिला गेला नाही? त्रेमासिक अहवाल जो आहे तो स्थायी समितीपुढे देण्यात यावा आणि आपला हा जो विषय आहे पुढचा महासभेमध्ये पुर्नविनियोजनासाठी आणतोय.

जुबेर इनामदार :-

लेखा परीक्षकाला विचारा................

प्रविण पाटील :-

१५ दिवस झाले शहरामध्ये फवारणी होत नाही.

मा. महापौर :-

मी माझा पध्दतीने काम करेल. प्रशासनाला काम सुरु करायला सांगितलेले आहे. माझे पत्र मी दिलेले आहे. औषध फवारणी सुरु करायला सांगितलेले आहे.

प्रविण पाटील :-

आवश्यक विषय आपण जवाबदार नागरीक आहेत आपण करताय काय लोक कोरोना अगोदर लोक मलेरीयाने मरत आहेत.

मा. महापौर :-

मी प्रशासनाला काम सुरु करायला सांगितलेले आहे.

निलम ढवण :-

महापौर मॅडम, तुम्ही ऑर्डर दिली म्हणून सांगत आहेत पण त्यांच्याकडे स्टॉक नाही औषधाचा स्टॉक नाही ते कामगार कामावर नाहीत.

मा. महापौर :-

म्हणून लवकरच महासभा लावतोय पुर्नविनियोजनासाठी. त्रैमासिक अहवाल स्थायी समितीला देण्यात येईल.

प्रकरण क्र. १२ :-

वैद्यकीय विभागाकरीता आवश्यक उपकरणे, फर्निचर औषधे, सर्जिकल मटेरीयल व लॅब मटेरीयल, डासनाशके, अळीनाशके खरेदी करणे व औषध फवारणीकरीता १० मिनी टेम्पो भाडेतत्वावर घेणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

ठराव क्र. १६ :-

वैद्यकीय विभागाकरीता आवश्यक उपकरणे, फर्निचर औषधे, सर्जिकल मटेरीयल व लॅब मटेरीयल, डास नाशके, अळी नाशके खरेदी करणेस मा. आयुक्त यांनी मा. महासभेच्या कार्योत्तर मंजुरीच्या अधीन राहून निविदा मागविणेस दि.29/05/2020 रोजी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली होती. त्याअनुषंगाने औषधे, सर्जिकल मटेरीयल व लॅब मटेरीयल प्राप्त निविदेतील दरास मा. स्थायी समिती सभा दि.09/07/2020 रोजी ठराव क्र.23 अन्वये रु.5 करोड पर्यंत व डास नाशके, अळी नाशके

खरेदी करणेकरीता मा. स्थायी समिती सभा दि.09/07/2020 रोजी ठराव क्र.24 अन्वये रु.3.50 लाख रुपयांस मंजुरी दिली होती.

अत्यावश्यक बाब म्हणून वैद्यकीय विभागाकरीता औषधे, सर्जिकल मटेरीयल, लॅब मटेरीयल व उपकरणे खरेदी करणेच्या प्रस्तावास मा. महासभेच्या कार्योत्तर मंजुरीच्या अधीन राहून नविन निविदा मागवून खरेदी करणेकरीता मा. आयुक्त यांनी दि.25/11/2020 रोजी मंजुरी दिलेली होती. त्याप्रमाणे रु.1 कोटीच्या कामास दि.08/04/2021 रोजी मंजुरी दिली होती.

एकात्मिक डास योजने अंतर्गत औषध फवारणीकरीता लागणारे 10 मिनी टेम्पो खरेदी करणे ऐवजी 5 वर्षाच्या कालावधीकरीता 10 मिनी टेम्पो (इंधन, जेट स्प्रे मशिन, वाहन चालकासहित) भाडे तत्वावर घेणेबाबत मा. स्थायी समिती सभा दि.16/03/2020 रोजी ठराव पारित करण्यात आला होता.

त्याप्रमाणे मा. आयुक्तांची मंजुरी घेवून निविदा मागविण्यात आल्या, त्या प्राप्त निविदेतील कमी देकार रक्कमेच्या निविदाकाराची निविदा मा. स्थायी समितीने मंजुर केलेली असुन उपरोक्त सर्व प्रस्तावास हि मा. महासभा कार्योत्तर आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशार पाटील अनुमोदन :- श्री. अनिल विराणी

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र.१३, ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातून लाचलुचपत प्रकरणी अटक करण्यात आलेले महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचेवर मा. न्यायालयात अभियोग दाखल करणेकरीता मा. आयुक्त यांनी दिलेल्या मंजूरी प्रकरणाचे अवलोकन करणे.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम प्रकरण क्र. १३ प्रशासनाचे अवलोकनासाठी आलेले आहे.

(सभागृहात गोंधळ)

मा. उपमहापौर :-

ज्यावेळी महापौर मॅडम बोलतात त्यावेळी सगळ्यांना म्युट करण्यात यावे. राजभाऊ ज्यावेळी महापौर मॅडम बोलतात त्यावेळी महापौर मॅडमचे सगळ्यांनी ऐकून घ्यावे. हे निवेदन पण आहे आणि माझी विनंती पण आहे महापौरांना आणि टेक्निकल बंधु तुम्हालाही. सगळ्यांना म्युट करण्यात यावे.

मा. महापौर :-

मी आधिच सांगितले की हा विषय आपण पुर्नविनियोजनासाठी पुढच्या महासभेत लवकरच महासभा लावतोय आणि घेतोय. तत्पुर्वी माझे पत्र देऊन काम सुरु करण्या संदर्भामध्ये आयुक्तांना सुचना दिलेल्या आहेत. आणि त्रेमासिक अहवाल स्थायी समितीमध्ये प्रशासनाने सादर करावा अशाही सुचना मी प्रशासनाला दिलेल्या आहेत. आणि मला वाटते हा विषय आपण मंजुर केलेला आहे. आणि पुढचा विषय सचिव साहेब वाचतील.

नगरसचिव :-

प्रकरण क्र.१३, ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातून लाचलुचपत प्रकरणी अटक करण्यात आलेले महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचेवर मा. न्यायालयात अभियोग दाखल करणेकरीता मा. आयुक्त यांनी दिलेल्या मंजूरी प्रकरणाचे अवलोकन करणे.

मा. महापौर :-

अवलोकन मंजुर.

(सदर विषयाचे अवलोकन करण्यात आले.)

नगरसचिव :-

प्रकरण क्र.१४, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) अन्वये कोविड-१९ अंतर्गत केलेल्या खर्चाचे प्रतिवृत्त सादर करणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग)

मा. उपमहापौर :-

सचिव महोदय १४ आणि १५ ते प्रतिवृत्त आहे महापौर मॅडम ते पुढच्या महासभेमध्ये हे विषय घेण्यात यावे अशी विनंती आहे.

नगरसचिव :-

प्रकरण क्र.१५ प्रतिवृत्त सादर करणे वैद्यकिय विभाग कोविड खर्चाची दोन्ही प्रतिवृत्त ही एक सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेले आहे आणि एक वैद्यकिया विभागाने दिलेले आहे.

मा. महापौर :-

पुढच्या महासभेमध्ये विषय क्र.१४ आणि १५ दोन्ही घेण्यात यावेत. आजची ही महासभा अतिशय खेळीमेळीच्या वातावरणामध्ये झालेली आहे. सर्वांकडून अपेक्षा आहे की चांगल्या पध्दतीचे सहकार्य आपण केले असेच सहकार्य सर्व लोकप्रतिनिधींचे राहावे. धंन्यवाद.

(प्रकरण क्र १४ व १५ पुढील सभेत घेण्याचे ठरले.)

मा. महापौर :-

आजची सभा संपली असे जाहिर करते.

नगरसचिव :-

राष्ट्रीय गीता साठी सर्वांनी उभे रहायचे आहे.

सभा समाप्त वेळ : ०३:००

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका